ISSN 2320-0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३६
(जानेवारी-जून २०१५/ खंड ८, अंक १)

❑ प्रमुख संपादक ❑
दि.व्यं.जहागिरदार

❑ सल्लागार मंडळ ❑
श्रीनिवास खांदेवाले
वनिता चोरे
आर.बी.भांडवलकर
एस.बी.कटमुसरे

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑
दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)-२६६१८५१
email:jahagirdardigambar@gmail.com

## अनुक्रमणिका


- महाराष्ट्रातील जलसंपत्ती व सिंचन सुविधांच्या प्रगतीचा प्रादेशिक असमतोल
  - संजय धनवटे ......................... १
- Uncertain Glory - India and its Contradictions (Jean Dreze and Amartya Sen यांच्या पुस्तकाचा परिचय) - अंजली कुळकर्णी .................... ८
- Jean Tirole: Nobel Prize Winner for Economics 2014
  - Mrunalini Fadnavis ............... १३
- Participatory Budgeting - New Trend in Local Governance
  - Manjusha Musmade ............ १६
- समतोल प्रादेशिक विकास -एक विवेचन
  - मुक्ता जहागिरदार.................... २४

**महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल, २०१२**

- Disparities in Human Development of Maharashtra : Cluster Analysis
  - Samit Mahore ..................... ३४
- महाराष्ट्रातील मानव विकास देशनांकाद्वारे आरोग्य आणि पोषणातील असमतोलाचे अध्ययन
  - वनिता चोरे.......................... ४२
- महाराष्ट्रातील पिण्याचे पाणी, स्वच्छता व आरोग्य : संदर्भ अमरावती जिल्हा
  - गजानन भारती....................... ४९
- महाराष्ट्राचा मानव विकास : समानता आणि समावेशनाची व्युहनीती
  - प्रशांत हरमकर....................... ५९
- अमरावती महसूल विभागातील मानव विकास - एक टीप - महादेव रिठे..................... ६९
- मानव विकासाचा पायाभूत घटक : शिक्षण
  - राजश्री रायभोग...................... ७३
- मानव विकास कार्यक्रम : यवतमाळ जिल्हा
  - आर.बी.भांडवलकर................. ७८
- भारतातील प्रांतनिहाय मानव विकासाची तुलनात्मक स्थिती- वैभव अर्मळ ............ ८३

**ग्रंथ परिचय**

- बालकामगार समस्या व समाधान
  - उमेश घोडेस्वार .................... ९०
- अर्थमंथन
  - सोनल जनबंधू ..................... ९२
- विदर्भातील आर्थिक आणि सामाजिक विचार
  - वर्षा गंगणे .......................... ९६
- ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल .......९८

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी
## (२०१४-१५)

- कार्याध्यक्ष
  डॉ.सौ. मुक्ता जहागिरदार
- अध्यक्ष
  डॉ. वनिता चोरे
- उपाध्यक्ष
  डॉ. सुनिल शिंदे
- कोषाध्यक्ष
  डॉ. गौतम कांबळे
- सचिव
  डॉ.आर.बी.भांडवलकर (अमरावती परिक्षेत्र)
  डॉ. एस.बी.कटमुसरे (नागपूर परिक्षेत्र)
- प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'
  डॉ. दि.त्र्यं. जहागिरदार
- जिल्हानिहाय प्रतिनिधी :
  डॉ. प्राची देशपांडे (नागपूर शहर)
  डॉ. संगीता टक्कामोरे (नागपूर ग्रामीण)
  डॉ. पी.बी.तिलरे (चंद्रपूर)
  प्रा. आर.बी.महेशकर (गडचिरोली )
  डॉ. वर्षा गंगणे (गोंदिया)
  प्रा. एस.बी.भुरे (भंडारा)
  प्रा. एस.बी.बोडे (वर्धा)
  प्रा. राजश्री रायभोग (अमरावती )
  प्रा. दिलीप महाजन (बुलढाणा)
  डॉ. उषा पाटील (यवतमाळ)
- अक्षर जुळवणी व मुद्रक :
  कॉम्प्यूटर-नेटवर्क (नरेंद्र पांढरीकर)
  अमरावती. मो. ९८५०२८३२४६
  email : narendrapandharikar@gmail.com


ICSSR च्या पश्चिम विभागीय केंद्रातर्फे अर्थमीमांसा या शोध पत्रिकेस आर्थिक अनुदान दिल्याचे पत्र प्राप्त झाले आहे.

**: स्वागत मूल्य :**

१) परिषद सदस्य - १०० रु.
२) शैक्षणिक संस्था - १५० रु.

# संपादकीय .....

'अर्थमीमांसा' खंड ८, अंक १ आपल्यापुढे सादर करतांना मला आनंद होत आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे माजी कार्याध्यक्ष आणि अध्यक्ष तसेच वर्तमान कार्याध्यक्ष, अध्यक्ष, सचिव आणि कार्यकारिणीचे सदस्य आणि परिषदेच्या सर्व आजीवन सदस्यांच्या पाठिंब्यामुळे आणि सद्‌भावनांमुळे प्रस्तुत अंक सिद्ध होऊ शकला याची मला पूर्णत: जाणीव आहे. हा अंक शिवप्रसाद सदानंद जायस्वाल, अर्जुनी मोर, जि.गोंदिया या विदर्भाच्या पूर्वेकडील लहान्या गावात भरणाऱ्या परिषदेच्या ३९ व्या वार्षिक अधिवेशनात विमोचित होत आहे ही घटना आपणा सर्वांना आनंददायी वाटावी अशी आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या द्वारा प्रसिद्ध झालेल्या पूर्वीच्या संशोधन पत्रिकेप्रमाणे ही देखील संशोधन पत्रिका आपणास आवडेल असा विश्वास आहे.

सदर अंकात ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय धनवटे यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणाचा गोषवारा दिला आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने आपल्या ३७ व्या वार्षिक अधिवेशनापासून (१० फेब्रु. २०१३) अर्थशास्त्रातील सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाच्या अभिजात ग्रंथाचा परिचय करून देणारे व्याख्यान आयोजित करण्याचा अभिनंदनीय उपक्रम सुरू केला आहे. याचे अंतर्गत डॉ.अंजली कुळकर्णी यांनी जीन ड्रेसी व अमर्त्य सेन यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या Uncertain Glory - India and its Contradictions या पुस्तकाची ओळख करून देणारे भाषण परिषदेच्या ३८ व्या वार्षिक अधिवेशनात (दि.१६ फेब्रु. २०१४) दिले होते. त्या भाषणाचा गोषवारा या अंकात प्रसिद्ध करीत आहे. तसेच डॉ.मृणालिनी फडणवीस यांनी २०१४ मध्ये अर्थशास्त्रात नोबेल पारितोषिक प्राप्त करणाऱ्या जीन तिरोल यांच्या योगदानाचा थोडक्यात परिचय करून दिला आहे. गेल्या काही वर्षांपासून अंदाजपत्रकीय निर्मितीत जनसामान्यांचा स्थानिक पातळीवर सहभाग काही शहरांच्या संदर्भात दिसून येत आहे. त्यादृष्टीने डॉ.मंजूषा मुसमाडे यांचा Participatory Budgeting या नवीन विषयावरचा लेख प्रसिद्ध केला आहे. प्रादेशिक समतोल हा तात्विक दृष्टीकोनातून मान्यता दिला जाणारा विषय असला तरी प्रत्यक्षात आपणास असमोलच दिसून येतो. भारतातील आर्थिक सुधारणांनंतर प्रादेशिक विषमता कमी करण्याचे उपाय अपुरे पडत आहेतच पण ते प्रभावी ठरत नाही. डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी या विषयावर आपल्या लेखातून प्रकाश टाकला आहे.

इ.स. २०१४ च्या मध्ये महाराष्ट्र मानव विकास अहवाल , २०१२ प्रसिद्ध झाला आहे. या अहवालाची अभ्यासक वाटच पाहत होते. या अहवालाच्या विविध बाजूंचे विवेचन करणारे आठ लेख या अंकात प्रसिद्ध करतांना आनंद होत आहे. हे सर्व लेख तरूण लेखकांनी सिद्ध केलेत ही परिषदेच्या दृष्टीने समाधानकारक अशी बाब मानली पाहिजे. या विषयाच्या अंतर्गत एकूण आठ लेख आहेत. सुमीत माहोरे

यांनी गट किंवा समूह (cluster) विश्लेषणाच्या आधारे महाराष्ट्रातील मानव विकासाचे विवेचन करून त्याद्वारे विकासातील विषमता दाखवून दिली आहे. महाराष्ट्रातील आरोग्य व पोषणातील असमतोलावर वनीता चोरे यांनी आपल्या लेखात आकडेवारीच्या सहाय्याने प्रकाश टाकला आहे. गजानन भारती यांनी महाराष्ट्रातील पिण्याचे पाणी, स्वच्छता व आरोग्य यावर चर्चा करतांना अमरावती जिल्ह्यातील स्थितीचे स्पष्टीकरण केले आहे. महाराष्ट्राचा मानव विकास न्यायपूर्ण आणि सर्वसमावेशक व्हावयाचा असेल तर कोणत्या धोरणाच्या अंमलबजावणीची गरज आहे हे प्रशांत हरमकरांनी आपल्या लेखाद्वारे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल , २०१२ यावर महादेव रिठे यांनी थोडक्यात अमरावती महसूल विभागाच्या संदर्भात टीप सादर केली आहे. मानव विकासात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारा लेख राजश्री रायभोग यांनी सादर केला असून महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल, २०१२ मधील याबाबतीतील प्रमुख मुद्दे चर्चिले आहेत. आर.बी.भांडवलकर यांनी आपल्या लेखात यवतमाळ जिल्ह्याचा (२००२ च्या अहवालात) जो खूप खाली क्रमांक होता तो २०१२ च्या अहवालात वरती जाण्यामागे जी कारणे आहेत त्यांचा आढावा घेतला आहे. भारतातील महाराष्ट्रासोबत अन्य चार प्रांतांमधील मानव विकास निर्देशकांची तुलना वैभव अर्मळ यांनी त्यांच्या लेखात केली आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की या आठ लेखांमुळे महाराष्ट्र मानव विकास अहवाल, २०१२ चे विविध अंगांनी केलेले विवेचन वाचकांना उपलब्ध झाले आहे.

या अंकात तीन पुस्तकांची ओळख करून देण्यात आली आहे. आर.के. शेख यांच्या पुस्तकाचा परिचय उमेश घोडेस्वार यांनी,दि.व्यं.जहागिरदार व मुक्ता जहागिरदार यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या पुस्तकाचा परिचय सोनल जनबंधू यांनी, तर संगीता टक्कामोरे यांच्या पुस्तकाचे परिक्षण वर्षा गंगणे यांनी केले आहे.

आपल्या अर्थमीमांसा या शोध पत्रिकेचे वर्षातून दोन अंक निघावेत अशी अपेक्षा आहे. सुदैवाने hr Anjp ml ar RaUma ArhoICSSR च्या पश्चिम विभागाच्या केंद्रातर्फे अर्थमीमांसा या शोध पत्रिकेसाठी आर्थिक अनुदान मंजूर झाले आहे. त्यामुळे आता जुलै-डिसेंबर, २०१५ हा खंड ८, अंक २ प्रसिद्ध होईल. लेखकांनी आपले दर्जेदार लेख आतापासून तयार करावेत व संपादकांकडे पाठवावे. हे अनुदान मिळविण्यासाठी संपादक, अध्यक्ष, कार्याध्यक्ष आणि सचिवांनी व प्रशांत हरमकर या सर्वांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले. त्या सर्वांचे अभिनंदन, कार्यकारिणी सदस्यांनी व अन्यही सभासदांनी अर्थमीमांसेस जाहिराती मिळवून देण्याचा प्रयत्न करावा ही विनंती आहे. अर्थमीमांसेची आर्थिक बाजू बळकट करणे आवश्यक आहे.

या अंकातील लेखकांनी आपले लेख वेळेत लिहून पाठविलेत त्याबद्दल सर्वांचे आभार. कॉम्प्यूटर नेटवर्कचे नरेंद्र पांढरीकर यांनी हा अंक सुबकपणे तयार करून दिला त्याबद्दल त्यांचेही आभार.

नववर्षाच्या सर्वांना शुभेच्छा !

दिनांक : २१ जानेवारी, २०१५

स्थळ : अमरावती.

**(दि.व्यं.जहागिरदार)**

प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'

# महाराष्ट्रातील जलसंपत्ती व सिंचन सुविधांच्या प्रगतीचा प्रादेशिक असमतोल

**(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ३८ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणाचा गोषवारा)**

**संजय धनवटे**
प्राचार्य,
कला व वाणिज्य महाविद्यालय, कारंजा (घाडगे)

**१. प्रस्ताविक :**

मानवी जीवनातील मुलभूत गरजा हया अन्न, वस्त्र व निवारा असल्या तरी त्यापेक्षाही पाणी हे मानवी जीवनाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. पृथ्वीच्या भूपृष्ठावरील ७१% भाग हा पाण्याने व्यापला असला तरी, त्यापैकी ९६.५% समुद्रामध्ये खाऱ्या पाण्याच्या स्वरूपात आहे. १.७% पाणी हे वापरण्या योग्य आहे त्यापैकी ९८.८% पाणी हे बर्फ व भुजलाच्या स्वरूपात आहे ०.३% पेक्षा कमी पाणी नाल्या, नाले, तळी व वातावरण्यामध्ये उपलब्ध आहे.

आज जगामध्ये गोडे पाणी, वापरण्या योग्य पाणी १६,६०,००० अ.घ.फु. असून भारताला ६६,४०० अ.घ.फु. म्हणजेच जागतीक पाण्याचा ४% पाणी मिळाले आहे. महाराष्ट्रामध्ये भारतातील एकूण पाण्याचे ७% पाणी उपलब्ध आहे. २००१ च्या जनगणेनुसार दरडोई पाणी जगामध्ये ७२८५ घ.मी. असून भारतात १९३० घ.मी. तर महाराष्ट्रात १३६० घ.मी. पाणी आहे. स्वीडीश जलतज्ञ फॅकमार्क यांच्या मते दरडोई १००० ते १७०० घ.मी. पाणी असणाऱ्या प्रदेशांचा विकास प्रयत्न साध्य असतो. त्यामुळे महाराष्ट्रात पाण्याची विषमता, भौगोलीक दृष्य असलेली, नियोजनाने पूर्ण करता येऊ शकते हे सिद्ध होते.

महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीमधील विरोधाभास म्हणजे, राज्याच्या आर्थिक संरचनेत उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विकास व विस्तार अतिशय वेगात झाला. परंतु, ग्रामीण भागातील कृषी क्षेत्राचा मात्र कुंठित झाला. महाराष्ट्रातील (पश्चिम महाराष्ट्रातील) उस वगळता सर्वच पिकांच्या बाबतीत शेतीची उत्पादकता ही राष्ट्रीय स्तरापेक्षा अत्यंत कमी आहे. याचे एक मुख्य कारण म्हणजे महाराष्ट्राच्या ग्रामीण आधार संरचनेतील सिंचन सुविधांचा अतिशय मंद गतीने झालेला विकास होय. सध्या राष्ट्रीय स्तरावर एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी साधारणपणे ४०% क्षेत्राला सिंचन सुविधा उपलब्ध आहे, परंतु महाराष्ट्रामध्ये हेच प्रमाण त्याच्या निम्म्यापेक्षाही कमी म्हणजे महाराष्ट्रातील एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या ढोबळमानाने केवळ १७% आहे. राज्यातील प्रादेशिक असमतोल आणि अनुशेषाचा सर्वात मोठा भाग सिंचन क्षेत्राचा असून, राज्यस्तरीय सिंचन प्रकल्पाद्वारे सध्या राज्यात त्याच्या लागवडीयोग्य क्षेत्राच्या फक्त ७% जमिनीला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होतो व राज्यातील उपलब्ध पाण्यापैकी केवळ १०% पाणी सिंचनासाठी वापरले जाते. सिंचन क्षमता निर्मितीबाबत महाराष्ट्र राज्य, देशातील इतर राज्यांच्या फार मागे असून, देशात त्याचा क्रमांक तेवीसावा आहे.

विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील कोरडवाहू शेती लाभदायक ठरत नसल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात येऊन आत्महत्या करीत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी उपलब्ध जलसंपत्तीचा पुरेपुर वापर करून राज्यातील सिंचन क्षमता वाढविण्यासोबतच मराठवाडा व विदर्भ विभागातील सिंचन अनुशेष दूर करणे अगत्याचे आहे.

**२. महाराष्ट्रातील पाणी उपलब्धता :**

महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्रात ७५% विश्वासार्हतेनुसार उपलब्ध ४६४७ अ.घ.फु. पाण्यापैकी सर्वाधिक पाणी उपलब्धी कोकण खोऱ्यामध्ये जवळपास ४५% आहे. त्यानंतर अनुक्रमे गोदावरी खोऱ्यात २८%, कृष्णा खोरे २१.५६%, तापी खोरे ५.२९% तर नर्मदा खोऱ्यातील पाणी उपलब्धी अतिशय नगण्य (११ अ.घ.फु.) म्हणजेच ०.२३% आहे. विदर्भाचा विचार करता, तेथे ७५% विश्वासार्हते प्रमाणे ९० प्रतिशत पाणी गोदावरी खोऱ्यातून व १०% पाणी तापी खोऱ्यातून मिळते तर गोदावरी खोऱ्यांतर्गत ७५% विश्वासार्हतेप्रमाणे विदर्भासाठी ८७४ अ.घ.फु. (म्हणजेच गोदावरी खोऱ्यातील एकूण पाणी उपलब्धतेच्या ६६%) पाणी उपलब्ध आहे. आणि त्यानुसार ६९१ अ.घ.फु ६३% पाणी वापरातील मुभा आहे. तथापि असे असूनही २०३० पर्यंतचे सर्व प्रस्तावित प्रकल्प विचारात घेता ५४९ अ.घ.फु. एवढेच पाणी प्रकल्प प्रस्तावित आहे. याचाच अर्थ ६९१-५४९= १४२ अ.घ.फु. पाणी वापराचे कोणतेही प्रस्तावित नियोजन नाही. जे पाणी अजूनही पुढे आंध्रात वाहून जाणार आहे.

**गोदावरी खोरे :**

उर्वरित महाराष्ट्रासाठी गोदावरी खोऱ्यांतर्गत ७५% वि.प्रकल्पात १५१ अ.घ.फु.पाणी उपलब्ध असून लवादाप्रमाणे ते पूर्ण वापराची मुभा आहे. आणि तेथील प्रस्तावित पाणी वापर १३१ अ.घ.फु. आहे.

मराठवाड्याचा विचार करता, ७५ प्रतिशत विश्वार्हतेनुसार ९६ प्रतिशत पाणी गोदावरी खोऱ्यातून, ३ प्रतिशत पाणी कृष्णा खोऱ्यातून आणि १ प्रतिशत पाणी तापी खोऱ्यातून मिळते. या तीन खोऱ्यातील उपलब्धता आणि वापर या दृष्टीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रात काय स्थान आहे हे पाहणे उद्‌बोधक ठरते.

गोदावरी खोऱ्याने राज्याचे ५० प्रतिशत क्षेत्र व्यापले असून, त्यात राज्याचे तिन्ही विभाग येतात. या विभागांचे गोदावरी खोऱ्यातील क्षेत्र, पाणी उपलब्धी आणि वापर पुढील प्रमाणे आहे.

मराठवाड्याचे तीन खोऱ्यातील एकूण लागवडीयोग्य क्षेत्रफळांच्या ८९ प्रतिशत क्षेत्र गोदावरी खोऱ्यांतर्गत येते. मराठवाड्याच्या गोदावरी खोऱ्यात जरी उपलब्ध पाणी २९३ अ.घ.फु. असले तरी त्याला पाणी वापराची मुभा मात्र फक्त २४७ अ.घ.फु. आहे. कारण मुख्य गोदावरी खोऱ्यात पैठण व सिद्धेश्वर खाली १०२ अ.घ.फु. व मांजरा खोऱ्यात ३० अ.घ.फु. पेक्षा अधिक पाणी वापर, लवाद अटीप्रमाणे करता येत नाही. त्यामुळे ४६ अ.घ.फु. उपलब्ध पाण्यापासून मराठवाड्याला वंचित रहावे लागते. तथापि मराठवाड्यातील प्रस्तावित पाणी वापर ५४९ अ.घ.फु. आहे.

गोदावरी खोऱ्यात मराठवाड्याचे लागवडीयोग्य क्षेत्र ४५ प्रतिशत आहे तथापि तेथे पाण्याची उपलब्धी राज्यातील एकूण १३१८ अ.घ.फु. पाण्याच्या फक्त २२ प्रतिशत असून, पाणी वापर मुभा १०८१ अ.घ.फु. च्या २३ प्रतिशत आहे.

याशिवाय मराठवाडा विभाग अगोदरच

पाणी तुटीचा प्रदेश असल्यामुळे तेथे ७५ टक्क्यांऐवजी सरासरीने अथवा ५० टक्के विश्वासार्हता पाणी उपलब्धी काढून ते पाणी वापराच्या दृष्टीने विचार करण्याची शिफारश १९७३ च्या सुकथनकर समितीने व महाराष्ट्र जल व सिंचन आयोगानेसुद्धा केलीआहे. येथील पाण्याची सरासरी उपलब्धी आणि ७५ टक्के विश्वासार्हतेची उपलब्धी यामध्ये दुप्पटीपेक्षा अधिक फरक आहे.

**कृष्णा खोरे :**

कृष्णा खोऱ्याने राज्याचे २२.५० प्रतिशत क्षेत्र व्यापले असून ते उर्वरित महाराष्ट्र व मराठवाडा विभागात पसरले आहे. कृष्ण खोऱ्यातील या विभागांच्या संदर्भात पाणी उपलब्धी व वापर विचारात घेऊ.

मराठवाड्याचे कृष्णा खोऱ्यातंर्गत असणारे लागवडीयोग्य क्षेत्रफळ १० प्रतिशत आहे. तेथे एकूण खोऱ्यातील पाण्याच्या १ प्रतिशत कमी पाणी उपलब्ध आहे. येथील पाण्याची उपलब्धी प्रति हेक्टर फक्त ४६३ घ.मी. इतकी नगण्य आहे. उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील पाण्याची उपलब्धी ५५७१ घ.मी. प्रति हेक्टर आहे.

**तापी खोरे :**

तापी खोऱ्याचे महाराष्ट्रातील एकूण भौगोलिक क्षेत्र ५१.३० लक्ष हे. असून, त्याची विभागणी राज्याच्या तीन विभागात पुढील प्रमाणे झाली आहे.

१. तापी खोऱ्यातून विदर्भातील अमरावती विभागात जवळपास ९६ अ.घ.फु. पाणी उपलब्ध असून जवादाप्रमाणे पाणी वापराची मुभा ७४ अ.घ.फु. आहे तर प्रस्तावित पाणी वापर ७९ अ.घ.फु. आहे.

२. मराठवाड्याच्या तापी खोऱ्यातील १.०७ लक्ष हेक्टर औरंगाबाद जिल्ह्याचे क्षेत्र १,०६,२०० जालना जिल्ह्याचे क्षेत्र १२०० हेक्टर आहे. येथील पाणी उपलब्धी सरासरीनुसार ५८० अ.घ.फु. व ७५ प्रतिशत विश्वासार्हतेनुसार ४.२३ अ.घ.फु. आहे. तापी खोऱ्यात औरंगाबाद जिल्ह्यातील गडदगड हा ०.१६ अ.घ.फु. पाणी वापराचा मध्यम प्रकल्प आहे. इतर काही लघु प्रकल्प असून एकूण पाणी वापर ०.५० अ.घ.फु. पेक्षा अधिक नाही. या दृष्टीने मराठवाड्यातील तापी खोऱ्याचा भाग उपेक्षित राहिला आहे. हा प्रदेश मराठवाड्यातील असल्यामुळे तापी खोरे महामंडळ इकडे लक्ष देत नाही आणि तापी खोऱ्याचा प्रदेश म्हणून गोदावरी खोरे महामंडळ इकडे लक्ष देत नाही.

**३. महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय दरडोई पाण्याची उपलब्धता :**

गोदावरी आणि तापी खोऱ्यातील विदर्भाकरिता उपलब्ध पाण्यातून जवळपास ३३ लक्ष हेक्टर क्षमता १.५८% येत असल्याने म्हणजेच एकूण ५२ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होऊ शकते. याशिवाय सिंचनाचे जाळे तयार झाल्याने भूपृष्ठातील पाणीसाठी अधिक प्रमाणात उपलब्ध होऊन विहिरीद्वारे त्या पाण्याचा सिंचनासाठी वापर होऊ शकतो. याचाच अर्थ विदर्भातील सध्या पेरणीखाली असलेले सर्वच क्षेत्र सिंचित होऊ शकते.

तथापि, वर्तमान स्थितीचा विचार करता विदर्भात केवळ २३० अ.घ.फु. पाण्याचेच सिंचन प्रकल्प पूर्ण झाले असून त्याची सिंचन क्षमता अंदाजे ११ लक्ष हेक्टर आहे. याचाच अर्थ एकूण उपलब्ध

पाण्यापैकी ३०% पाणी वापर या प्रकल्पातून झाला आहे व त्यातीलही बरेच पाणी ऑस्मिक वीज प्रकल्पाकरिता वाळविण्यात आलेले आहे.

आंतरराष्ट्रीय मापदंडानुसार ज्या भागात पाण्याची दरडोई उपलब्धी किमान १७०० घ.मी. आहे त्या भागाला तुरळक केव्हा तरी पाणी विषयक समस्येला तोंड द्यावे लागते. ज्या भागात पाण्याची दरडोई उपलब्धी १००० घ.मी. पेक्षा कमी असते त्या भागाला चिरकालीन पाणी विषयक अडचणींना तोंड द्यावे लागते आणि त्या भागाला विकासावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो आणि ज्या भागात पाण्याची दरडोई उपलब्धी ५०० घ.मी. कमी असते ती भाग अत्यंत दुष्काळी राहून तेथे कसल्याही प्रकारचा अर्थपूर्ण विकास होऊ शकत नाही या स्वीडीश जलतज्ञ फॅकन्मार्क यांच्या निकषानुसार महाराष्ट्रातील विभागनिहाय पाण्याची दरडोई उपलब्धी विचारात घेणे उद्‌बोधक ठरते.

**तक्ता क्र. १**

**महाराष्ट्रातील विभागनिहाय दरडोई पाण्याची उपलब्धी**

**(२००१ च्या जनगणनेच्या संदर्भात)**

| विभाग | लोकसंख्या (लक्ष) | पाणी उपलब्धी ७५ प्रतिशत विश्वासर्हतानुसार | दरडोई पाणी उपलब्धी (घ.मी.) |
|---|---|---|---|
| मराठवाडा | १५५.८९ | ३०७ | ५५७ |
| विदर्भ | २०६.०८ | ९७० | १३३२ |
| उर्वरित महाराष्ट्र | ६०५.५५ | ३३७० | १५७४ |
| एकूण महाराष्ट्र | १६७.५२ | ४६४७ | १३५१ |

संदर्भ : महाराष्ट्र जलसंपत्ती आणि विकासाचा प्रादेशिक असमतोल : जाधव या.रा.(२००७)

वरील तक्त्यावरून दिसून येते की, राज्यातील उर्वरित महाराष्ट्र आणि विदर्भात पाण्याची उपलब्धी दरडोई १००० घ.मी. पेक्षा जास्त आहे. त्यामुळे ते विभाग विकासक्षम या सदरात मोडतात. मराठवाड्यात मात्र दरडोई पाणी उपलब्धी ५०० च्या जवळपास असल्याने दर विभाग चिरकालीन पाणी टंचाईच्या दुष्काळ प्रवण वर्गात येतो अशा परिस्थितीत मराठवाड्यातील जनतेचे जीवन काही अंशी सुसह्या करण्यासाठी व त्यांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील विपुल पाण्याच्या खोऱ्यातून अतिरिक्त पाणी येथे परिवहन करून आणणे गरजेचे आहे.

**४. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलात सिंचन क्षेत्राचा वाटा :**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनच, उर्वरित महाराष्ट्र प्रदेशाच्या तुलनेत विदर्भ व मराठवाडा या विभागातील विकासाचा अनुशेष वाढत आहे. त्यामध्ये सिंचन क्षेत्रात वाटा फार मोठा आहे. प्रादेशिक असमतोलाच्या मोजमापासाठी १९८३ मध्ये नेमलेल्या दांडेकर समितीने काढलेल्या एकूण अनुशेषापैकी सिंचन क्षेत्राचा वाटा ६० होता. महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी २००० मध्ये काढलेल्या विभागनिहाय अनुशेषात सिंचन क्षेत्राची टक्केवारी मराठवाड्यात ६१% तर विदर्भात ६८% होती.

१९९६-९७ ते २००३-०४ या सात वर्षाच्या कालावधीत सिंचन क्षेत्रावर अंदाजे १९,५३२ कोटी रूपये खर्च झाले असून त्यापैकी ११% निधी मराठवाड्यावर, २८% विदर्भावर तर ६१% निधी उर्वरित महाराष्ट्र प्रदेशावर खर्च झाले आहे. यामुळे प्रादेशिक असमतोलात प्रचंड प्रमाणावर वाढ झाली आहे. शिवाय महाराष्ट्र शासनाने राज्यात पाटबंधारे क्षेत्राच्या विकासासाठी ज्या पाच पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना केली त्यांचा नियोजित आराखडा विचारात घेता भविष्यात या अनुशेषात अधिकच वाढ होणार आहे. मराठवाडा व विदर्भातील या वाढत्या अनुशेषाची दखल घेऊन मा. राज्यपालांनी डिसेंबर २००१ च्या निधी वाटप आदेशात, उर्वरित महाराष्ट्रात नविन प्रकल्प सुरू करू नये असे निर्देश दिले आहे. तरी सुद्धा महाराष्ट्र शासनाने २००४ मध्ये कृष्णा भीमा स्थैर्यीकरण प्रकल्पाला मान्यता देवून त्याचे काम सुरू केले. या प्रकल्पाची अंदाजे किंमत १२,००० कोटी रू. आहे. हा प्रकल्प कृष्णा खोरे विकास महामंडळातर्फे राबविला जात असून त्याचा खर्च या महामंडळाच्या कार्यक्रमात राबविला गेल्यास महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पांवरील विभागनिहाय खर्चाची वर्गवारी पुढील तक्ता क्रमांक २ प्रमाणे येईल.

**तक्ता क्र. २**

**पाटबंधारे महामंडळाचा विभागनिहाय सिंचन क्षमता निर्मिती खर्च**

| विभाग | खर्च | प्रतिशत |
|---|---|---|
| मराठवाडा | २७५६ कोटी रू. | ०८ |
| विदर्भ | ३८०० कोटी रू. | १२ |
| उर्वरित महाराष्ट्र | २५४७७ कोटी रू. | ८० |
| एकूण | ३२,०३३ कोटी रू. | १०० |

संदर्भ : महाराष्ट्र-जलसंपत्ती आणि विकासाची प्रादेशिक असमतोल : जाधव या.रा.(२००७)

यावरून राज्यातील प्रगत भागावरच ८०% रक्कम खर्च होऊन मराठवाडा व विदर्भ या भागाचे मागासलेपण इतके वाढेल की ते दूर करणे अशक्य होईल.

**५. विदर्भातील राज्यस्तरीय तसेच स्थानिक स्तरीय सिंचन प्रकल्प व सिंचन अनुशेषाची वस्तुस्थिती :**

विदर्भात सद्य:स्थितीत २८७.३३ अ.घ.फु. पाणी वापराचे २०२ राज्यस्तरीय व १०२६ स्थानिक स्तरीय प्रकल्प बांधकामाधीन आहेत. त्यातून १३,९३,७२० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. परंतू या बांधकामाधीन प्रकल्पापैकी १४७ प्रकल्पांची कामे वन-जमिनीमुळे बंद आहेत. यात तापी खोऱ्यातील सुद्धा प्रकल्प आहेत. अशा अडकलेल्या सिंचन प्रकल्पांची सिंचन क्षमता अंदाजे १२,१७,५९९ हेक्टर आहे. तथापि ही कामे बांधकामाधीन असल्याने त्याची उर्वरित किंमत दायित्व म्हणून संबोधण्यात येते. वन विभागाच्या अंतिम मंजूरी शिवाय या कामावर खर्च करता येत नसल्याने दायित्वाची रक्कम फार मोठी दिसून येते. विशेष म्हणजे मा. राज्यपालांनी विदर्भातील प्रकल्पांना भेडसावऱ्या अडचणी दूर करण्यासाठी तरतूद करावी असे निर्देश

देऊनही राज्य शासन त्याबाबत उदासिन आहे.

विदर्भातील बांधकाम पूर्ण झालेले व बांधकामाधीन अशा सर्व प्रकल्पांचा विचार केला तरी अजूनही जवळपास १८७ अ.घ.फु. पाणी प्रकल्पांचे नियोजन होणे बाकी आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणातर्फे दि.२/८/२०१३ ला सन २०११-१२ चा वार्षिक अहवाल निधीमंडळात सादर झाला. या अहवालाच्या जोडपत्र ५(३) पृष्ट क्र. २७ वर तक्ता क्र. ८ मध्ये दिल्याप्रमाणे जून २०११ रोजी राज्याच्या एकूण १९,१८,३९० हेक्टर सिंचन अनुशेषापैकी ६०.५६% सिंचन अनुशेष (म्हणजेच ११,६१,६९० हेक्टर) एकट्या विदर्भाचा आहे. मराठवाड्याचा २७.६५% (५,३०,५०० हेक्टर) व उर्वरित महाराष्ट्राचा ११.७९% रेणीखालील क्षेत्राच्या तुलनेत निर्माण झालेली सिंचन क्षमता १०१.२२% आहे. या पार्श्वभूमीवर विदर्भातील उपलब्ध पाण्याचा सिंचनासाठी पूर्ण वापर करण्याच्या दृष्टीने बृहत आराखडा तयार करून त्याला शासनाची मान्यता व पर्याप्त नीधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यासोबतच त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, सुधारित प्रशासकीय मान्यता, पुनर्विनियोजित प्रस्तावित मंजूरी यासारखे प्रश्न तातडीने सोडविण्याची गरज आहे.

**६. सिंचन अनुशेषासंदर्भात महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल :**

संयुक्त महाराष्ट्रात विदर्भ व मराठवाड्याचे विलीनीकरण करतांना १९५३ च्या नागपूर करारानुसार तत्कालीन मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भ आणि मराठवाड्याच्या मागासलेपणवर विशेष लक्ष देऊन राज्याच्या सर्व विभागांचा समतोल विकासाची ग्वाही दिली होती तथापि महाराष्ट्राच्या निर्मितीला आज ६० वर्षे उलटून गेली तरीही विकासाच्या सर्वच निर्देशकांमध्ये विदर्भ व मराठवाड्याचे मागासलेपण पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कमी न होता सातत्याने वाढत गेलेले दिसते. विभागीय असमतोल निश्चित करण्याकरिता १९८३ मधील डॉ.वि.म.दांडेकर समिती, १९९४ मधील निर्देशाके वच अनुशेषण समिती आणि अधिकडील २०१० साली मोजण्यात आलेला सिंचन अनुशेष याची तुलनात्मक माहिती पुढील तक्त्यामध्ये विभागनिहाय दर्शविली आहे.

१९९४ चा सिंचनाचा विदर्भाचा अनुशेष ७,८४,७१० हेक्टर चा होता. यापैकी जून २०१० ला अजूनही विदर्भातील अमरावती विभागाचा २,५५,१२० हेक्टर चा १९९४ चा अनुशेष दूर होणे शिल्लक आहे.नविन अनुशेष निर्माण होणार नाही असा मंत्रिमंडळाने २००० मध्ये घेतलेल्या निर्णयाबाबतची परिस्थिती पाहता विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष जून २०१० मध्ये ११,५८,००० हेक्टर पर्यंत वाढलेला आहे. राज्यातील वेगवेगळ्या विभागातील १९८२ पासून २०१० पर्यंत या २८ वर्षातील सिंचनाच्या अनुशेषात झालेली वाढ खालील प्रमाणे आहे.

**विभागनिहाय सिंचन अनुशेष**

| (हेक्टरमध्ये रब्बी समतुल्य) | | | |
|---|---|---|---|
| **विभाग** | **१९८२** | **१९९४** | **२०१०** |
| कोकण | १०५५८० | ७६६८० | ८५६४० |
| | (११.२२%) | (५.५%) | (४.५०%) |
| पुणे | 0 | 0 | 0 |
| नाशिक | ३०७३० | ९१२०० | १३३९१० |
| | (३.३२%) | (६.५५%) | (७.०३%) |
| औरंगाबाद | २६०६७० | ६९५६४० | ५२६८९० |
| | (२८.२०%) | (३०.९१%) | (२७.६७%) |
| अमरावती | ४१६८७० | ६९५६७० | ९६८८१० |
| | (४५.१०%) | (४९.९३%) | (५०.८७%) |
| नागपूर | ११०४४० | ९९०४० | १८९२०० |
| | (११.९५%) | (७.११%) | (९.९३%) |
| एकूण | ९२४२९० | १३९३२३० | १९०४४५० |
| महाराष्ट्र | (१००%) | (१००%) | (१००%) |

**७. शिफारशी :**

महाराष्ट्रातील सिंचन सुविधा वाढविणे व प्रादेशिक समतोल निर्माण करण्याच्या दृष्टीने पुढील शिफारशी करता येतील.

१. वन कायद्याची अट फक्त काही क्षेत्रात आहे इतर क्षेत्रामध्ये लवकर काम करणे आवश्यक आहे.
२. वनसंवर्धन कायदा १९८० मध्ये बदल करावा.
३. नवीन वनविकास कायदा निर्माण करावा.
४. १९९४ चा अनुशेष दुर करतांना नवीन अनुशेष निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.
५. वीजपुरवठा वाढून उपसा सिंचन सुरळीत करावे तसेच विदर्भात भारनियमन करू नये.
६. प्रवाही सिंचनाच्या क्षमते मध्ये वाढ करावी अविकसित क्षेत्राचा विकास प्राधन्याने करावा.
७. कर्ज वापरामध्ये पारदर्शकता आणावी.
८. गोदावरी कृष्णापाणी तंटालवादाच्या अटीबदल करण्याचे पिण्याचे प्रयत्न करावे.
९. जायकवाडी पर्यंत गोदावरी खोऱ्यातले पाणी वाटप व नियंत्रण करण्यासाठी एक कायम स्वरूपी निमंत्रण मंडळ आवश्यक आहे.
१०. गोदवरी-पूर्णा-मांजरा स्थैरीकरण प्रकल्प तातडीने तयार करून राबविणे आवश्यक आहे.
११. मराठवाडयात पाणी साठवून ठेवण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.
१२. मराठवाडयात विहिरीद्वारे सिंचन वाढवीण्या करता अर्थसहाय्य, अनुदान देण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :**

१. महाराष्ट्र शासन (१९९९) : महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल.
२. महाराष्ट्र शासन (२००८-०९, २००९-१०, २०१०-११) : महाराष्ट्राची आर्थिक पहाणी.
३. महाराष्ट्र शासन (२०१०) : सिंचन स्थितीदर्शक अहवाल.
४. या.रा.जाधव (२००७) : महाराष्ट्र-जलसंपत्ती आणि विकासाचा प्रादेशिक असमतोल.
५. ॲड. मधूकर किंमतकर : 'श्रवेत पत्रिका' व त्याचे विदर्भावर नियोजीत दुष्परिणाम.
६. भूजंगराव कुलकर्णी : मराठवाड्याचा विकास : अभ्यास व चिंतन.
७. दि.व्यं. जहागिरदार (२००७) : आर्थिक जगत , खंड २.
८. मराठी अथशास्त्र परिषद स्मरणिका (२०११) : 'अर्थविश्व'.

◆◆◆

# Uncertain Glory - India and its Contradictions

## (Jean Dreze and Amartya Sen यांच्या पुस्तकाचा परिचय)

**अंजली कुळकर्णी**
सेवानिवृत्त प्राध्यापक, नागपूर.

(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ३८ व्या अधिवेशनात दि.१६ फेब्रुवारी २०१४ रोजी डॉ.अंजली कुळकर्णी यांनी 'अभिजात ग्रंथाची ओळख' यांचे अंतर्गत द्वितीय पुष्प गुंफले. त्यांच्या भाषणावर आधारित लेख)

डॉ. जीन ड्रेझ ( Jean Dreze) व नोबेल सन्मानाने पुरस्कृत अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन या लेखक ह्यांच्या २०१३ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात 'An Uncertain Glory, India and Its Contradictions' भारताचा व त्याबरोबर इतर काही आशियाई देशांच्या गौरवशाली विकासाचा, समृद्धीचा मागोवा घेतानाच त्यातील विरोधाभासात्मक विकासातील पैलूंवर वा काही विशिष्ट बाबींवर प्रकाशझोत टाकलेला दिसतो. भारताच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय धोरणात्मक बदलांवर, त्यांच्या विकासातील प्राथमिकतेवर जेव्हा बरीच चर्चा होत होती, त्या पार्श्वभूमीवर या पुस्तकाचे प्रकाशन झाले. भारताच्या आर्थिक विकासाची मीमांसा, सामाजिक न्याय व लोकशाही प्रणालीचा अंगिकार व त्यासाठी पेलावी लागलेली विविध आव्हाने या संदर्भात करणे योग्य होईल असे त्यांना वाटते.

गेल्या २० वर्षात भारताने साध्य केलेल्या जलद आर्थिक विकासाचे समर्थन (६ ते ७ प्रतिशत वृद्धी दर) लोकांना प्राप्त झालेले मुलभूत स्वातंत्र्य, त्यांच्या जीवनमानात झालेला गुणात्मक बदल, मानवाच्या रूंदावत चाललेल्या सशक्तता किंवा क्षमता व त्याला मिळणाऱ्या संधी यातूनच खऱ्या अर्थाने करावे लागेल.

डिसेंबर २०१२ मध्ये दिल्लीत झालेल्या सामुहिक बलात्कारामुळे जनमानसातील असंतोषाचा झालेला स्फोट, व त्या अनुषंगाने समाजातील स्त्री-पुरूष भेद (gender discrimination) व त्याची विविध अंगे ह्यांचे विश्लेषण देखील या पुस्तकात आढळते.

आर्थिक वृद्धी व मानवी क्षमतांचा विकास यांचे परस्परावलंबित्व व त्याचा सामाजिक न्यायावर होणारा परिणाम ह्याचे वर्णन करतांना विविध सामाजिक अनुबंध व आर्थिक वृद्धीसह वंचिततेचा ऱ्हास ह्यावर विकासाचे प्रारूप कसे अवलंबून असते ह्याचे निरूपण हीच ह्या पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना आहे.

दहा प्रकरणात विभागलेल्या या पुस्तकात लेखकांनी संपूर्ण प्रतिपादन समर्थपणे प्रतिपादन केलेले आहे. लोकशाही प्रणालीच्या माध्यमातून विविध आव्हानांना साद घालत प्राप्त केलेला जलद आर्थिक विकास हा भारताचा जरी मानबिंदू असला तरी त्या गौरवशाली विकासाच्या उणिवांचा ऊहापोह देखील त्यांनी या पुस्तकात केला आहे.

प्राप्त झालेला विकास जरी नेत्रदीपक असला तरी त्यात सामाजिक बांधिलकींचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. उत्पन्न विषमता, वास्तविक मजूरीतील

कुंठीतता जलद आर्थिक विकासातून निर्माण झालेल्या महसूली उत्पन्नाचा सामाजिक व भौतिक आधारभूत संरचनेच्या निर्मितीसाठी आरोग्य, आरोग्य निगराणी (Health care), शैक्षणिक असुविधा, सुरक्षित-स्वच्छ पाण्याची अनुपलब्धता, सांडपाण्याच्या सोयींचा अभाव इ. उणीवांवर त्यांनी त्या पुस्तकात नेमके बोट ठेवले आहे. त्याची चीन वा इतर आशियाई देशांशी तुलना केली आहे.

२० वर्षापूर्वी सहा आशियाई देशांमध्ये (भारत, पाकिस्तान, बंगलादेश, श्रीलंका, नेपाळ, भूतान) सामाजिक निर्देशांकाच्या संदर्भात असलेले भारताचे दुसरे स्थान मात्र त्याची अलिकडील काळात झालेली घसरण केवळ पाकिस्तानपेक्षा वरच्या क्रमांकावर असलेला भारत. आता खालून दुसऱ्यावर (केवळ पाकिस्तानपेक्षा वरचढ) असण्याचा खेद त्यांनी व्यक्त केला आहे.

भारताच्या वीजनिर्मिती क्षेत्राच्या कार्यक्षमतेवर त्यांनी प्रखर टीका करून चीनच्या वीजनिर्मितीक्षेत्राशी त्याची तुलना केली आहे. दोनही देशात वीजनिर्मिती क्षेत्र सार्वजनिक क्षेत्राच्या अर्थात शासनाच्या आधीन असले तरी त्यात खाजगी क्षेत्राचा सहभाग लक्षणीय आहे. भारतात वीजेच्या सार्वजनिक क्षेत्रातील व्यवस्थापनेला कुशलता व कार्यक्षमतेचा अभाव व त्यामुळे ढेपाळलेली परिणामकारकता याचा उल्लेख त्यांनी केला आहे.

भारत व चीनची तुलना करतांना मानव विकास अहवाल (UNDP) किंवा मिलेनियम डेव्हलपमेंट गोलनुसार निश्चित केलेल्या मापदंडाचा विचार करून चीन हा भारतापेक्षा अधिक प्रगतीशील आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. कारण या तुलनेत भारतातील लोकशाहीवर आधारित आर्थिक सामाजिक संरचना, विविध भाषा, राजकीय पक्ष, भाषण स्वातंत्र्य, प्रसार माध्यमांना असलेले स्वातंत्र्य या मापदंडांचा समावेश जागतिक विकास अहवालात केलेला नसून त्याबाबतीत भारतांचा क्रमांक बराच वर आहे.

भारताची लोकशाही प्रणाली आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्थापन, सामाजिक सेवांच्या विकासात अडथळे निर्माण करण्यास कारणीभूत होत नाही ना अशी शंका त्यांनी व्यक्त केली आहे. लोकशाही की आर्थिक विकास ह्यातील द्वंद्व अजून पूर्णपणे संपुष्टात आलेले दिसत नाही. मात्र लोकशाहीच्या चौकटीत राहून आर्थिक विकास झाल्यास चांगले असे सर्वानुमत आहे.

चीनची निर्णय प्रक्रिया ही लोकशाही मूल्यांवर जरी आधारित नसली तर सार्वजनिक आरोग्य व सुशिक्षित समाज निर्मितीसाठी बांधिलकी ह्या त्यांच्या विकासाचे विशेष पैलू आहेत. भारताला मात्र लोकशाही प्रणालीत प्राप्त झालेल्या संधींचा व स्वातंत्र्यपूर्ण समाजाचा योग्य तो उपयोग करून घेता आला नाही असा निराशाजनक सूर त्यांनी व्यक्त केला आहे.

भारत व चीनच्या आर्थिक विकासाची तुलना करतांना त्यांनी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाचा आधार घेऊन भारतातील दरडोई खर्चातील वाढीचा व त्याच कालावधीतील गरीबीरेषा ओलांडणाऱ्या लोकसंख्येचा विचार करून उत्पन्न विषमता व खर्चातील विषमता यावर प्रकाशझोत टाकला आहे.

आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास यात समन्वय साधतांना त्यांनी भारताच्या नियोजनबद्ध आर्थिक विकासातील समाजवादाकडे झुकलेल्या नियोजनावर ताशेरे ओढले असून त्यात सार्वजनिक

प्राथमिक शिक्षण व आरोग्य, सामाजिक सेवांकडे केलेले दुर्लक्ष याकडे लक्ष वेधले आहे.

आर्थिक सुधारणांच्या बदलत्या स्वरूपात लाचलुचपत, सार्वजनिक क्षेत्रातील दायित्व, सामाजिक समानता, वैधानिक व न्यायिक प्रक्रियेतील परिणामकारकता, लोकशाही मूल्यांवर आधारित आर्थिक व सामाजिक संस्थांचे पुन:र्जीवन त्यांचा लोकांचे जीवन समृद्ध करण्यातील सहभाग या सर्वांचा व त्यावर आधारित कार्यक्रमांचा त्यांनी विशेषरूपाने उल्लेख केला आहे. शैक्षणिक विकासात शासनाची भूमिका स्पष्ट करतांना त्यांनी शिक्षणाच्या खाजगीकरणावर ताशेरे ओढले आहेत. जपानच्या आर्थिक विकासात (१९०६ ते १९११) शासनाने अर्थसंकल्पात ४३ प्रतिशत खर्च शिक्षणावर केला. ज्यात प्राथमिक शिक्षणावर विशेष भर देण्यात आला होता.

भारताचा शैक्षणिक इतिहास उज्वल आहे. ६०० वर्षापूर्वीचे नालंदा विश्वविद्यालयात, चीन, कोरिया, थायलंड, इंडोनेशिया व इतर आशियाई देशातून उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा ओघ कसा येत होता त्याचे एक जिवंत उदाहरण आहे. परंतु सद्य:परिस्थित त्यात खूप फरक पडलेला आढळतो. Times Higher Educational Supplement (Oct. 2011) नुसार जगातील उच्चशिक्षण देणाऱ्या महत्त्वपूर्ण २०० संस्थांमध्ये भारताच्या एकही विद्यापीठाचा समावेश करता येत नाही ही खेदाची बाब आहे. बहुतेक सर्व उच्चशिक्षण देणाऱ्या संस्था/ विद्यापीठे अमेरिका व इंग्लंडमध्ये केंद्रीभूत आढळतात.

प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत देखील PROBE च्या सर्वेक्षणानुसार फारसे आशादायक चित्र दृष्टीस पडत नाही. शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढलेली आढळते. शाळेमधील विद्यार्थी, शिक्षक, त्यांची पूर्णवेळ नियुक्ती व त्यांची शाळेतील उपस्थिती याबद्दल सर्वत्र आनंदी आनंदच आढळतो.

आंतरराष्ट्रीय तुलनेत देखील विद्यार्थ्यांच्या यशप्राप्तीच्या (achievements) संदर्भात 'PISA Plus' ने केलेल्या सर्वेक्षणानुसार ७४ देशांच्या क्रमवारीतेत भारताचा नंबर तळाशी लागतो. WIPRO ने केलेल्या भारतातील ८३ शाळांच्या सर्वेक्षणात देखील विद्यार्थ्यांचे ज्ञान व कौशल्य हे बऱ्याच खालच्या पातळीवर आढळते.

एकूणच शैक्षणिक पातळीत गुणवत्तेत उच्चशिक्षण असो वा प्राथमिक शिक्षण असो फारशी सुधारणा झालेली आढळत नाही. याबाबतीत सविस्तर लिखाण करतांना त्यांनी शैक्षणिक संधींच्या बाबतीत असलेली दारूण व विदारक विषमता आपल्या लिखाणात स्पष्ट केली आहे. एका विशिष्ट गटातील (priviledged) मुलांनाच प्राथमिक ते गुणवत्ता पूर्ण उच्च शिक्षणाच्या संधींचा लाभ होतो व ते त्याचा परिपूर्ण उपयोग करून उच्चपदस्थ होतात. संपूर्ण शैक्षणिक पद्धतीचे मूल्यांकन(assessment) करतांना त्या priviledged वर्गातील गुणवत्तेच्या आधारावरच त्याचा कस तपासला जातो. परंतु हा वर्ग एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अतिशय छोटा असून या असमतोलित शैक्षणिक संधीमुळे सामाजिक न्यायाच्या बाबतीतील सामाजिक असंवेदनशीलता (Social Intensitivity) लक्षात येते.

शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनेच्या बाबतीत देखील शासनाच्या भूमिकेवर टीका करतांना शिक्षणासाठी असलेला नियोजित व्यय अल्प असून खाजगी संस्थांच्या फोफावणाऱ्या संख्येवर त्यांनी

कटाक्षाने टीका केली आहे. तसेच शाळेतील शिक्षणात असलेल्या दायित्वाचा अभाव हे त्याच्या अपयशास कारणीभूत आहे.

शाळेतील शिक्षकांचा पगार व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सेवा ह्या बाबतीत भारताचा विचार करता हे प्रमाण समाधानकारक आढळत नाही. त्यासाठी त्यांनी शिक्षकांच्या पगाराचे दरडोई ढोबळ उत्पन्नाशी असलेल्या प्रमाण काढले. त्यात भारतासाठी हे प्रमाण ५ ते ६ प्रतिशत आढळते. काही राज्यात उदा.उत्तर प्रदेश, जे शैक्षणिक दृष्ट्या वंचित आहेत त्यांच्या बाबतीत हे प्रमाण जास्त दिसून येते. दुप्पटच्या OECD देशात ते आसपास आढळते.

प्राथमिक शिक्षकाचा पगार, कृषिमजूरापेक्षा १० पटीपेक्षा जास्त असून त्यामुळे ग्रामीण भागात सामाजिक विषमतेची दरी रूंदावत आहे. तसेच ह्या उत्पन्नातील अंतरामुळे ग्रामीण भागात शिक्षक व विद्यार्थी व पालक यांच्यात सुसंवाद साधला जात नाही.

पगारवाढीमुळे वाढत चाललेल्या शाळेच्या खर्चामुळे शाळेतील शिक्षकांच्या नियुक्यांवर विपरित परिणाम झाला असून एक 'Dualistic Teaching Cadre' निर्माण झाले आहे. करारावरील मजूर ही संकल्पना यातूनच जन्माला आली व अंशत: पगारावर शिक्षकाची नियुक्ती करून व्यवस्थापकांनी शाळाचा खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला गेला.

पर्यायी व्यवस्था म्हणून शाळेतील शिक्षणाचे खाजगीकरण करावे का? ह्यावर देखील लेखकांनी भाष्य केले आहे. त्यांच्या मते शाळेतील शिक्षण हे नोबेल पुरस्कृत अर्थशास्त्रज्ञ पॉल सॅम्युलसनच्या म्हणण्यानुसार सार्वजनिक वस्तू (public good) आहे व शाळेतील शिक्षणामुळे बाह्यता निर्माण होतात. त्यांचा लाभ सामान्य जनतेला होतो.

शाळेतील शिक्षणाचे विकासात्मक प्रक्रियेत मध्यवर्ती स्थान असून शैक्षणिक पद्धतींचे पूर्णपणे मूल्यांकन करण्याची नितांत गरज आहे. त्यात बांधिलकी व उत्तरदेयता (Accountability) ची संकल्पना देखील तितकीच महत्त्वपूर्ण आहे. ह्यात शिक्षक, शासन किंवा पूर्ण शैक्षणिक पद्धतिच्या उत्तरदेयेतेचा समावेश करणे आवश्यक आहे.

भारतातील शिक्षण पद्धती–प्रामुख्याने शाळेतील शैक्षणिक पद्धती अधिक कार्यक्षम व गुणवत्तापूर्ण करण्यासाठी वित्तीय तरतूद, बांधिलकी, शिक्षकांचा सहभाग, शिक्षक संघटनांचा सहभाग या सर्व गोष्टींकडे लक्ष दिल्यास व 'शाळेतील शिक्षण' हे एकूणच शैक्षणिक नियोजनचा 'गाभा' आहे असे समजल्यास ह्यातून अधिक सुकर मार्ग निघू शकेल.

'गरीबी व सामाजिक आधार' यावरील ७ व्या प्रकरणात लेखक ह्यांनी केलेले भाष्य देखील महत्त्वपूर्ण आहे. जगात चालणाऱ्या चर्चेत 'market phobia' व 'market mania' या दोन्हीस लोकांचा बराच मोठा प्रतिसाद आहे. त्यांनी सामाजिक धोरणास बाजार तत्वांचा दिलेला भेदभावरहित 'Indiscriminate support' ची बरीच उदाहरणे दिली आहेत. चीनने १९८० त लोकांच्या 'आरोग्यावरील हक्कास' डावलून त्याच्या आरोग्य निगा खाजगीकरणाचा अंगलटीस आलेला प्रयोग हे एक प्रमुख उदाहरण त्यांनी पेश केले आहे. भारतात मात्र लोकशाही तत्वावर आधारित संस्था असल्यामुळे एकाएकी केलेल्या खाजगीकरणावर आपोआप अंकुश येतो. तरी सुद्धा आरोग्य व आरोग्य निगेच्या संदर्भात खाजगीकरणाकडे कल झुकलेला आढळतो.

मूलभूत सामाजिक सेवा ह्या सार्वजनिक क्षेत्राने पुरवाव्यात की खाजगी क्षेत्राने याबाबतीत बरीच चर्चा चालू असते. खाजगीसेवांच्या माध्यमातून

मिळणाऱ्या सेवा या अधिक कार्यक्षम असून स्पर्धायुक्त वातावरणात त्या सेवा पुरविण्याचा खर्च कमी होऊन त्याची गुणवत्ता वाढते असा एक मतप्रवाह आहे. गरीबीरेषेबद्दल बोलतांना त्यांनी तेंडूलकर समितीचा अहवालाचा (२००९) उल्लेख केला आहे. शासकीय गरीबी रेषा ही निराधारता (Destitution) रेषा किंवा 'वंचितता रेषा' असून ती जीवननिर्वाहासाठी आवश्यक अशा किमान वस्तू व्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टींचा समावेश करीत नाहीत. ही दारिद्र्यरेषा किती सदोषपूर्ण आहे ह्याची लेखकांनी उदाहरणे दिली आहेत.

'सामाजिक आधार कार्यक्रमाबद्दल लिहितांना लेखकांनी ब्राझिलमधील'Bohra Familia' या कार्यक्रमाचे (targeted programme of social support) तेथील गरीबी कमी करण्यात महत्त्वपूर्ण योगदान होते. भारताचा 'लक्ष्यकेंद्रित' कार्यक्रमांचा अनुभव फारसा समाधानकारक नाही असे लेखक म्हणतात. दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या ही संकल्पना १९९६ मध्ये उदयास आली. (Integrated Rural Development Programme). १९९७ पासून त्याचा उपयोग सार्वजनिक वितरण प्रणालीतील लक्ष्यकेंद्रित कार्यक्रमांसाठी करण्यात आला. परंतु BPL ही संकल्पना किती सदोष आहे व त्यात समावेशन व वर्जन दोष असून त्यामुळे त्याची अंमलबजावणी नि:प्रभ होते. BPL निश्‍चितीचे निर्देशक १३ असून त्यांना समान भारांकित करून कुटुंबांची क्रमवारी ठरविली जाणे याचे उदाहरण दिले आहे. मात्र नियोजनमंडळाची गरीबी रेषा निर्धारणाची पद्धती वेगळी असून दरडोई खर्चाच्या आधारे (राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण'च्या आधारे) गरीबीरेषेखालील लोकसंख्येची निश्‍चिती केली जाते. या दोन्हीचा योग्य समन्वय करून जर गरीबी निर्मूलनाचे कार्यक्रम राबविले गेले तर ते अधिक परिणामकारक ठरतील.

रोख हस्तांतरण योजने (Cash Transfer Scheme) बद्दल विवेचन करतांना तिचा अवलंब करण्यातील संभाव्य धोके सांगताना त्यात शासन पुरवठाधिमुख दृष्टीकोनापासून परावृत्त होऊन मागणीधिष्ठ दृष्टीकोनाकडे झुकलेले दिसते असे म्हटले आहे. तसेच CTS च्या ऐवजी conditional in-kind transfer चा सुद्धा योग्यरित्या उपयोग केल्यास, जसे की Mid Day Meal Programme तो तितकाच प्रभावी, परिणामकारक ठरू शकतो.

भारताच्या लोकशाही प्रणाली समोर अनेक मोठी आव्हाने आहेत. लोकशाही म्हणजे केवळ 'निवडणूकांचे व्यवस्थापन' नव्हे त्यात लोकशाही तत्वावर आधारित संस्था व 'लोकशाहीवर आधारित संस्कृति' ची निर्मिती व जपणूक करणे आवश्यक आहे.

भारतातील अर्थिक विकासाचे समालोचन करतांना लोकशाही प्रणाली आर्थिक-सामाजिक विषमता दूर करणस कितपत कारणीभूत झाली ह्याचा विचार करणे आवश्यक आहे. लोकशाहीत महत्त्वपूर्ण योगदान करणाऱ्या विविध प्रसार माध्यमांचा व त्यांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा सामाजिक न्यायाच्या दृष्टीने कितपत उपयोग झाला? या प्रसारमाध्यमांवर श्रीमंत व प्रबळ लोकांचे असलेले वर्चस्व लक्षात घेता सर्वांचे योग्य नियमन करून लोकशाही अधिक सबळ व सक्षम करणे आवश्यक आहे.

◆◆◆

# Jean Tirole: Nobel Prize Winner for Economics 2014

**Dr. Mrunalini Fadnavis**
Nagpur.

This prestigious Nobel prize of 2014 in Economics was conferred to Jean Tirole of Troyes, France. He is from Toulouse School of Economics and working as a Professor in Economics. His specializations are Micro Economics, Game theory and industrial organization. He was born on 9th August 1953. His work place is- Massachusetts Institute of Technology, Paris Dauphine University.

The very special about Tirole's education is that he has received engineering degrees from the École Polytechnique in Paris in 1976, and from the École nationale des ponts et chaussées in 1978. He graduated as a member of the elite Corps of Bridges, Waters and Forests. Tirole pursued graduate studies at the Paris Dauphine University and was awarded a DEA degree in 1976 and a Doctorate de troisième cycle in decision mathematics in 1978. In 1981, he received a Ph.D. degree from the Massachusetts Institute of Technology for his thesis titled Essays in economic theory, under the supervision of Eric Maskin.

He was President of the Econometric Society in 1998 and of the European Economic Association in 2001. Around this time, he was able to determine a way to calculate the optimal prices for the regulation of natural monopolies and wrote a number of articles about the regulation of capital markets-with a focus on the differential of control between decentralized lenders and the centralized control of bank management. He has published about 200 professional articles in economics and finance, as well as 10 books, including The Theory of Industrial Organization, Game Theory (with Drew Fudenberg), A Theory of Incentives in Procurement and Regulation (with Jean-Jacques Laffont), The Prudential Regulation of Banks (with Mathias Dewatripont), Competition in Tele-communications (with Jean-Jacques Laffont), Financial Crises, Liquidity, and the International Monetary System, and The Theory of Corporate Finance. His research covers industrial organization, regulation, game theory, banking and finance, psychology and economics, international finance and macroeconomics.

**Contribution for Market power :**

In economics and particularly in industrial organization, market power is the

ability of a firm to profitably raise the market price of a good or service over marginal cost. In perfectly competitive markets, market participants have no market power. A firm with total market power can raise prices without losing any customers to competitors. Market participants that have market power are therefore sometimes referred to as "price makers" or "price setters", while those without are sometimes called "price takers". Significant market power occurs when prices exceed marginal cost and long run average cost, so the firm makes economic profits.

A firm with market power has the ability to individually affect either the total quantity or the prevailing price in the market. Price makers face a downward-sloping demand curve, such that price increases lead to a lower quantity demanded. The decrease in supply as a result of the exercise of market power creates an economic deadweight loss which is often viewed as socially undesirable. As a result, many countries have anti-trust or other legislation intended to limit the ability of firms to accrue market power. Such legislation often regulates mergers and sometimes introduces a judicial power to compel divestiture.

A firm usually has market power by virtue of controlling a large portion of the market. In extreme cases-monopoly and monopsony-the firm controls the entire market. However, market size alone is not the only indicator of market power. Highly concentrated markets may be contestable if there are no barriers to entry or exit, limiting the incumbent firm's ability to raise its price above competitive levels.

Market power gives firms the ability to engage in unilateral anti-competitive behavior. Some of the behaviors that firms with market power are accused of engaging in include predatory pricing, product tying, and creation of overcapacity or other barriers to entry. If no individual participant in the market has significant market power, then anti-competitive behavior can take place only through collusion, or the exercise of a group of participants' collective market power.

The Lerner index and Her Findahl index may be used to measure market power. This concept is comparatively new to the economic field. His work on Oligopoly, Monopoly power, source of market power, measuring market power, market power and elasticity of demand were worth mentioning.

**Explaination : Market power and elasticity of demand -**

Market power is the ability to raise price above marginal cost and earn a positive profit. The degree to which a firm can raise price above marginal cost depends on the shape of the demand curve at the profit maximizing output. That is, elasticity is the critical factor in determining market power. The relationship between market power and the price elasticity of demand (PED) can be summarized by the equation:

$$\frac{P}{MC} = \frac{PED}{1 + PED}$$

Note that PED will be negative, so the ratio is always greater than one. The higher the P/MC ratio, the more market power the firm possesses. As PED

increases in magnitude, the P/MC ratio approaches one, and market power approaches zero. The equation is derived from the monopolist pricing rule:

$$\frac{(P-MC)}{P}=\frac{1}{1-PED}$$

His work was challenged and favored by many economists. They were-

**1. Proponents :**

The regulation of markets is to safeguard society and has been the mainstay of industrialized capitalist economic governance Karl Polanyi refers to this process as the 'embedding' of markets in society. Further, contemporary economic sociologists such as Neil Fligstein (in his 2001 Architecture of Markets) argue that markets depend on state regulation for their stability, resulting in a long term co-evolution of the state and markets in capitalist societies in the last two hundred years.

**2. Opponents :**

There are various schools of economics that push for restrictions and limitations on governmental role in economic markets. Economists who advocate these policies do not necessarily share principles, such as Nobel prize-winning economists Milton Friedman (monetarist school), George Stigler (Chicago School of Economics / Neo-Classical Economics), and Friedrich Hayek (Austrian School of Economics), as well as Richard Posner (Chicago School/ Pragmatism), all of whom have sought substantially to limit economic regulation. Generally, these schools attest that government needs to limit its involvement in economic sectors and focus instead on protecting negative individual rights (life, liberty, and property). These schools would assure economic rights equally, rather than diminish individual autonomy and responsibility for the sake of remedying any sort of putative "market failure." They tend to regard the notion of market failure as a misguided contrivance wrongly used to justify coercive government actions.

**References :**


1. Jump up^ Gary Adams, Sharon Hayes, Stuart Weierter and John Boyd, "Regulatory Capture: Managing the Risk" ICE Australia, International Conferences and Events (PDF) (October 24, 2007). Retrieved April 14, 2011.
2. Jump up^ Body of Knowledge on Infrastructure regulation Theories of Regulation.
3. Jump up^ "A Decade of Measuring the Quality of Governance".
4. Jump up^ Armstrong, J. Scott; Green, Kesten C. (2013). "Effects of corporate social responsibility and irresponsibility policies". Journal of Business Research.


◆◆◆

# Participatory Budgeting - New Trend in Local Governance

**Manjusha Musmade**
H.O.D. Economics,
Nowrosjee Wadia College,
Pune

**1.1 Introduction :**

India boasts of the largest democracy in the world. However, she lacks considerably at the higher sides if the non-economic aspects such as human development, social and moral rights of the citizens etc. are taken into account. Of course, the journey ahead is not a simple one and she has to go yet far away on the path of the development. Recently, many debates are going on about the need for good governance at all levels.

The present paper aims at analyzing the new trend in the local governance i.e. participatory budgeting. The role, significance, method of participatory budgeting as a modern and democratic way of good governance with the following objectives-

**1.2 Objectives :**

1] To understand the concept, significance, procedure and impact of participatory budgeting for good governance, especially at the local level in an economy.

2] To study the international and Indian experiences in practicing participatory budgeting at different levels of governance.

3] To analyze the problems and limitations related to participatory budgeting in general.

4] To compare the method of participatory budgeting with that of zero base budgeting.

5] To present the guidelines for the effective implementation of participatory budgeting.

**1.3 Key- words :**

*Participatory Budgeting, Good Governance, Gender Budgeting, Gujrat Model of Development, Open Budget Index, Janwani Group.*

**1.4 Background :**

India underwent a tremendous structural change two decades ago. The closed socialist pattern of the governance was transformed into a liberal, open and global way. In these two decades, many achievements are made to her credit, many are yet to be achieved. Now, it is high time that another dose of structural adjustments should be introduced to take the next rank on the global position.

One such reform could be made in the field of governance. Many thinkers and

critics are of the opinion that the major serious obstacle in the process of economic development for India is her weakness in establishing and maintaining good governance at all the levels of public administration. The remedy they suggest is in the form of Participatory Budget. To start with, they suggest that the participatory budgeting would be implemented at the level of urban local bodies [ULB].

**1.5.1 Concept of Participatory Budgeting :**

Participatory budgeting is a post-modern concept of idealistic politics. In simple words it means the citizens in action for achieving development. Participatory budgeting is a process of democratic deliberation on the part of the citizens and their contribution in the decision making in policy formation and implementation.

This is an opportunity in which the ordinary lay men can decide about the allocation and distribution of the public expenditure in the concerned area or region. It is welcome activity for both, the government and the governed as it allows the citizens to identify the actual needs of their region and accordingly prepare a systematic plan outlay and projects to fulfill those needs. It is beneficial to the common public who can give their choice and preferences which would no doubt, can create awareness, satisfaction and most importantly, a feeling of responsibility towards the government activities. It would definitely reduce the gap between the society and the government. This in turn would increase the faith in the government due to which more cooperation and understanding from the society would be received by the government. Participatory budgeting leads to more transparency, public sharing of the ideas, needs and also costs. This obviously would result in a comparatively more successful policies and schemes of the government implemented in future. Thus, participatory budgeting is a multi-fold action and a step towards achieving good governance. People with participatory budgeting system are empowered and are knowledgeable than the ones which do not use the system. A good government indeed, requires to go for participatory budgeting as early as it can and as much as it is possible.

Participatory budgeting is a systematic technique of public administration which would involve several steps in the framing and implementation. Generally, the procedure of participatory budgeting is in the following way :

**1.5.2 Procedure of Participatory Budgeting :**

1] The public representatives decide the spending priorities and select budget delegates

2] Budget delegates develop specific spending proposals with the help from field experts

3] The representatives democratically vote and decide the priorities of the proposals for funding

4] The top priority proposals are implemented by the governing body.

This procedure in practice can be modified as per the local situation and needs.

Thus, participatory budgeting is not a rigid technique but a flexible one to adjust to the real conditions. A commonly accepted method is given in the next part of the paper.[1.8]

**1.6 Significance of Participatory Budgeting :**

The concept of participatory budgeting is almost flawless in theory and also the experiences of the same have proven the usefulness and benefits of the concept. The experiences show that the Participatory budgeting results in more equitable public spending, clearly leading to a higher quality of life and higher level of human development. The transparency, accountability and responsible participation by the neglected citizens are the major benefits of the participatory budgeting.

The opening up of the economy may become an unholy business of politics as it would lead to the neglect of the local needs. Participatory budgeting is an answer for such a situation. It also suits well with the Gandhian ethical model of governance and goes well with the socialist pattern of the society adopted after Independence. The planning from below and grass-root development concepts of modern development strategy are quite matching with participatory budgeting.

In recent times, the traditional approach of public finance is undergoing a sea-change. Though, in the light of globalization, it has been an accepted fact that 'the government which governs the least is the best. The government at any level cannot neglect the issues of social and democratic concerns of the society. Hence, the concepts like the Gender Budgeting and Green Budgeting are widely discussed and are being practiced by various economies at different levels of governance. Gender budgeting is obviously the concern of public budgets for the needs and requirements of the female population while the green budgeting deals with the preservation and protection of the environmental issue.

Participatory budgeting goes well with these aspects and in fact, green and gender budgeting could be practiced more efficiently and effectively if participatory budgeting methods are applied as well. Thus, the concept holds a tremendous significance in the present context. Moreover, the social agitations against corruption in India by various civil societies and voluntary organizations also can agree for the extensive application of participatory budgeting as it may reduce the red tapism and corruption at the government offices and authorities.

**1.7 Origin and Experiences the World wide :**

It would be interesting to know the origin and birth of the participatory budgeting in the world. It has been agreed that the first full participatory budgeting process was developed in Brazil, in the city of Porto Alegre, in the year 1989. There, it was a part of the various innovative reforming programmes to reduce the socio-economic inequalities in the society.

Participatory budgeting henceforth occurs annually, since then. The statistics show that the local government of Porto

Alegre spends about 200 million dollars per year on construction and services through participatory budgeting. Around fifty thousand residents of the city out of 1.5 million total population, take part in the process of participatory budgeting which is indeed a sign of remarkable success of the concept. The number of the participants is growing every year. It should be also noted that these participants are from the diverse economic and socio-political backgrounds. The high number of participants in the procedure throughout the period of more than one decade definitely suggests the increasing involvement of the citizens which in turn is due to the remarkable success in the implementation of the concept.

**1.8 The Actual Procedure of Participatory Budgeting :**

Participatory budgeting in Brazil is carried out very systematically with a definite time plan. The process starts in the month of January every year when the actual participation and interaction by the citizens are carried. Then in February, the city specialists in the technical and other fields give instructions for budgeting. In the next month, there are district wise assemblies which deal with the areas such as transportation, health and education, sports and of course economic development. The assemblies are large gatherings even going beyond one thousand people in which the delegates are elected / selected to represent the specific zones. The local governing body including the Mayor and the staff attend such assemblies to listen and learn the problems of the citizens.

In the next step, the delegated meet frequently in each district and review the project on the basis of the district needs and the technical aspects of the programmes. This is followed by the prioritizing of the demands by the regional delegates and reconciling the demands of each district with the available resources by the local governments. The finally resulting budges is almost binding, though the local body may suggest changes. Only the Mayor may use his veto power on the budget, however, this has never happened.

Thus, it can be well understood that the procedure of participatory budgeting is technically and practically sound and successful.

**1.9 Comparison with Zero Based Budgeting :**

The concept of participatory budgeting can be well compared with another modern technique used for good governance is the method of zero based budgeting. This is an approach to planning and decision making that reverses the working process of traditional budgeting. In traditional budgeting , the officials justify only variances on the basis of the past years, based on the assumption that the 'baseline' is automatically approved. By contrast, in zero based budgeting every line item of budget must be approved rather than only changes. It requires budget request be re-evaluated thoroughly starting from the zero base. This process is independent of whether the total budget or specific line items are increasing or decreasing. It is also known as zero- sum budgeting. It is a practice of

budgeting every unit of income received and then adjusting some part of the budget downward for every other part that needs to be adjusted upward. It also refers to the identification of a task and then funding resources to complete the task independent of current resourcing. This has some advantages and disadvantages as well.

The main advantages are efficient, motivating and professional approach in budgeting wherein outsourcing is possible. However, it has the negative side too. It is a complex method of budgeting which may consume more time in preparation and may become impracticable for intangible items and for huge scale of organization. It also requires proper training for the officials engaged in it. In short, zero based budgeting cannot be used universally. The case of participatory budgeting is more or less the same.

**2.1 Impact of Participatory Budgeting :**

Not only the cities in Brazil do experience a positive change after implementing participatory budgeting, but the institutions like the World Bank has accepted the fact of direct improvements in the public facilities of the city. This is clear evidence about the ability of the participatory budgeting for overall improvement in the living standards of the people, especially the poor. It has been observed that based on the Porto Alegre experience of participatory budgeting, the pro-poor or 'poverty faced' budgeting, more than 140 city municipalities in Brazil have adopted to it.

Besides its widespread in Brazil, participatory budgeting has been accepted by the hundreds of Latin American cities and dozens of cities in Europe, Asia, Africa and North America. The total number of cities with the system could count to more than one thousand. Apart from its widespread acceptance by the municipalities, it has been applied at the school and university levels and also for the public housing projects.

**2.2 Indian Experiences :**

The state of Gujarat has become a role model for development in many aspects in the recent times. The popular 'Gujrat Model of development' has used the technique of the participatory budgeting as one of its major tools. .

The Transparency International Report 2010 has shown India at the 87th rank on the corruption front. Hence, to curb down the level of corruption, participatory budgeting is the welcome step by the local governments.

Another study by the International Budget Partnership (IBP) titled Open Budget Survey 2012, on the system of budgets show that India ranks 14th in the world and first in south Asia in maintaining transparency in budgeting. India's Open Budget Index (OBI) is reported at 68 in 2012. This has been a considerable achievement since 2008 when it was 60 and in 2010, it was 67. This achievement is complementary for adopting participatory budgeting.

Participatory budgeting has been tried in a few Indian cities as well, especially in Karnataka and Kerala. In Bangluru, the Janagraha has facilitated a participatory budget process a decade ago, in 2002-2003. Based on their experience, the other cities

in the state such as Hubli-Dharwad are using the process for city planning. The Janagraha has facilitated the useful materials such as a book on participatory planning, a video on surveying, the survey forms to record the requests from the citizens for the works, etc.

**2.3 Participatory Budgeting in Pune city:**

The city of Pune has taken a lead on the steps of Bengaluru. The Municipal Corporation of the city initiated participatory budgeting in 2005. The actual procedure was introduced in 2007 to increase public participation in the budgetary process and for the overall development of the city.

The meetings of citizens and civic officials were organized through the local agencies such as the National Society for Clean Cities and Nagarik Chetna Manch. About a hundred citizens participated and submitted their requests for the development projects. The initial action no doubt helped in laying a base for citizen engagement at the ward level budget plans of the Corporation. Further in 2006-07, a more detailed and formalized process was followed by the Corporation by facilitating a full-fledged support provided by Janwani and other groups in the field.

**2.4 Contribution of Janwani Group :**

The role played by Janwani group in making the procedure of participatory budgeting is worth notable. Its efforts and positive contribution in establishing the concept is commendable. Janwani group along with the PMC conducted over 20 workshops to engage citizens in the participatory budgeting process.

It should be noted that the job was conducted with the help of University students who were selected and trained as facilitators. This obviously has led to create an opportunity to connect the academic field and the professional experience for the youngsters.

Pune Municipal Corporation is going on steadily and progressively with the idea of participatory budgeting.

It has been recently published that the allocation for participatory budgeting in the draft annual civic budget for 2013-14, has been increased by Rs.10.66 cr.Last year, Rs. 26.24 cr. was allocated, while this year, the allocation has gone up to Rs. 36.90cr. The exercise saw an active participation for 2013-14 with 3,300 citizens submitting their suggestion regarding various civic works. The number has sharply rose from 600 citizens in the previous year. The city plans would be considered divided into the six major avenues for using funds. These are roads, electricity, buildings, slum improvement, water supply and drainage.

It has a long way to go as there are many crucial problems and needs of the society waiting for the solutions. The major areas wherein the procedure would play substantially could be stated as public transport and traffic, water supply, affordable housing, sanitation and health, slum development and rehabilitation projects.

**2.5 Problems and Limitations :**

1] Participatory budgeting would be successful only if a detailed and systematic study of the problem area is carried and a specific project is

suggested by giving details on a particular location, description, quantity, category with proper maps and photographs etc. A general macro level project cannot be considered in the procedure.

2] Moreover, the suggested plan should not be very expensive one and should be within the given cost limits, generally this is five lakh rupees.

3] There are certain requirements which do not come under the purview of participatory budgeting such as appointments of the staff, minor repair works cleaning up works etc. These are generally vague in nature and an accurate budgeting may not be possible for them.

4] Participatory budgeting may lead to delays in decision making and thus could prove as a less efficient tool for good governance.

5] There is a possibility that the technique of participatory budgeting can be misused by some dominant group of people in the society who have vested interests rather than the motive of social welfare or good governance.

6] It should be admitted that the participatory budgeting is not a single measure to fight against poverty and other socio-economic problems of the society. It does not give readymade and direct answers to the problems. It is criticized that it cannot solve the wider problems such as unemployment.

7] Moreover, though it tries to include the needs of the weaker sections of the society, it may not include the representation of the extremely poor people in its process.

8] Another fear expressed for the long term viability of participatory budgeting is that the particular groups are less likely to participate repeatedly once their demands have been met. Their expertise and experience may not be available for the other needy groups in the society who want to participate in decision making by the governments.

9] Last but not the least drawback of the system may be seen as that the slow progress of public works can frustrate the participants and may hamper their enthusiasm. This is especially true in the developing economies where efficient governance is yet to be achieved.

Also, it should be worth noted that the project suggestion by the citizens does not necessarily mean its inclusion in the budget. There are legal and technical constraints apart from the financial crunch.

**2.6 Suggestions** :

1] For wide and deep rooted publicity for participatory budgeting, it can be suggested that the youth organizations such as Ganesh Mandals, Rotary Clubs and other such voluntary organizations can work enthusiastically and can create awareness and actual participation in the procedure.

2] Also, local people can arrange large meetings of the residents in their respective areas for discussing the concept. This would benefit the process

much faster than any other system.

3] As it is criticized that participatory budgeting may not be effective to deal with the needs of the extremely poor section of the citizens as they are not able to voice their needs due to their poverty and illiteracy. Also, they can not spend time on discussing their needs as they would be losing their daily earnings. Hence, it is suggested that the NGOs and voluntary social workers should go to such people and should note down their requirements and should prepare a systematic plan on their behalf.

4] In the present times, wherein the technological change in the lifestyle is fast catching up, the nature and form of participatory budgeting could be made in e-participatory budgeting. This would be a system where the citizens would submit their priorities for the allocation of budget through e-budgeting applications of the local government websites. This would save their time and would prove more effective in compiling the data of various places. Also, the use of Geographical Information System (GIS) would also provide online platform for the interactive and downloadable maps to the citizens willing to participate in the budgetary process.

**Conclusions :**

In all, participatory budgeting processes can help the governance at the local level to become more effective, efficient, transparent and accountable. This is known as 'good governance' in modern times. This is a completely distant approach adopted by the traditional system of governance. It bestows an opportunity and freedom of choice for the public on what they want in their living areas.

In the 21st century, in the light of globalization, the civil liberties, privacy and democracy are at stake. The protection and participation of the citizens to put a check on the abrupt cuts of development funding is necessary. It is also necessary to create a level playing for all the citizens in the economy. This indeed is a huge challenge before any government. The complicated task of development project preparation and decision making can be made easier by the guidelines provided by the participating citizens. This would save cost, efforts and energy of surveying about the needs of the society, ultimately leading to the target of good governance.

**References :**


1) Bhatia, H.L.(2008)' Public Finance', Vikas Publications, New Delhi.
2) Cabannes, Yves.(2004) 'Participatory Budgeting: a significant Contribution to Participatory Democracy.
3) Bose, Jayashree.(2008)'Participatory Budgeting :Concepts and Country Experiences',(ed)] ICFAI University Press, Hyderabad, India.
4) Issues and articles in the reputed newspapers such as Sakal, Indian Express, The Times of India etc.
5) The official documents with the Pune Municipal Corporation Office and Janwani Group Pune .


◆◆◆

ISSN 2320-0197

# समतोल प्रादेशिक विकास –एक विवेचन

**मुक्ता जहागिरदार**
कार्याध्यक्ष,
विदर्भ अर्थशास्त्र परिषद

**१. प्रास्ताविक :**

विकासाच्या प्रयत्नांना वर्षे लोटलीत. विकास झाला तथापि असमान विकास हे वैशिष्ट्य सार्वत्रिक स्वरूपाचे असल्याचे आढळून येते. भांडवलशाही, समाजवादी, मिश्र अशा अर्थव्यवस्थेच्या सर्व प्रकारात ती आढळते. विकासाच्या भिन्न पातळीवरील देशांमध्ये ती दिसून येते. वर्ग, प्रदेश, राज्य तसेच आंतर्राष्ट्रीय पातळीवरही विकासात असमानता दिसून येते. विकासाबाबत प्रादेशिक समानतेची इष्टता, विषमतेची कारणमीमांसा आणि उपाययोजनांचा विचार व प्रयत्नही झालेले आहेत. विकासातील विषमता कमी करण्याचे प्रयत्न अपेक्षेप्रमाणे यशस्वी झालेले नाहीत. तथापि मागास प्रदेशांच्या विकासाचे धोरण व प्रयत्नांअभावी ही असमानता अधिक वाढली असती हे निश्चित. राष्ट्र आणि राज्यान्तर्गत प्रादेशिक विषमता आज आर्थिक तसेच राजकीय असंतोषाचा तसेच व्यापक चर्चेचा विषय झालेली आहे.

**२. समतोल प्रादेशिक विकास– आशय व इष्टता :**

प्रादेशिक विषमतेत मुख्यत: राष्ट्रान्तर्गत भिन्न प्रांत वा राज्य तसेच राज्यान्तर्गत भिन्न विभागात विकासातील असमानता अभिप्रेत आहे. विशिष्ट कारणांच्या संदर्भात काही प्रमाणात ती अनिवार्यही असू शकते. त्यामुळे संतुलित, समतोल वा समान प्रादेशिक विकासाच्या विचारात विकासाच्या प्रत्येक पैलूबाबत सर्व प्रदेशांचे समानीकरण अभिप्रेत नाही. भिन्न प्रदेशांची संपूर्ण आत्मनिर्भरता वा औद्योगिकरणाचा समान स्तरही अपेक्षित नाही. मात्र विकासाबाबतची असमानता न्यूनतम असली पाहिजे. ती न्यूनतम पातळीवर आणण्याचा प्रयत्न करणे अपेक्षित, शक्य आणि इष्टही आहे. प्रदेशपरत्वे विकासाचे माध्यम, क्षेत्र भिन्न असू शकेल. मात्र विकास कार्ये हाती घेताना कोणत्याही प्रदेशावर अन्याय होऊ नये, विकास कार्यांचा मागास प्रदेशात शक्य तितक्या दूरपर्यंत विस्तार व्हावा, विकास कार्यांच्या परिणामस्वरूप मागास प्रदेशांच्या विकासाला चालना मिळावी, गती वाढावी, तेथील लोकांच्या जीवनमानाची पातळी इतर भागांप्रमाणे वाढावी अशी अपेक्षा आहे. एका बाजूने विकासाच्या प्रक्रियेवर व फळामध्ये देशातील सर्व प्रदेशांचा हक्क असणे आणि दुसऱ्या बाजूने समतोल प्रादेशिक विकास शासनाचे दायित्व असणे आणि अधिक विकसित प्रदेशाचे त्यात योगदान असणेही समतोल प्रादेशिक विकासाच्या कल्पनेत अभिप्रेत आहे.

असमान प्रादेशिक विकास हे वास्तव असले

तरी संतुलित प्रादेशिक विकासाची इष्टता वा असमान प्रादेशिक विकासाची अनभिष्टता अनेकविध प्रकारे विशद केली जाते. विकासाबाबत प्रादेशिक समानता आर्थिक, राजकीय, सामाजिक इ.अनेकविध कारणांकरिता आवश्यक व इष्ट मानली जाते.

अर्थव्यवस्थेत वेगाने विकास घडवून आणण्यासाठी संतुलित प्रादेशिक विकास होणे गरजेचे आहे. कारण अर्थव्यवस्थेचा विकास देशातील सर्व प्रदेशांच्या व विभागांचा त्याच्या साधनसंपन्नतेनुरूप विकासावर अवलंबून असतो. समान प्रादेशिक विकासामुळे देशात सर्वत्र उपलब्ध संसधानांचे संधारण आणि पूर्ण व कार्यक्षम उपयोग होऊन त्याचा एकूण विकासावर होणारा अनुकूल परिणामही महत्वाचा असतो. सुरळीत व व्यत्ययरहित विकासासाठी समानपणे विकसित प्रदेश परस्पर सहाय्यक व पोषक ठरतात. विकसित प्रदेशातील उत्पादन वाढीसाठी कच्च्या मालाचा पुरेसा पुरवठा व वाढत्या उत्पादनासाठी मागणी, स्फीतीकारी परिणामांचे नियंत्रण इ. दृष्टीने संतुलीत प्रादेशिक विकास आवश्यक असतो. भिन्न प्रदेशात विकासातील लक्षणीय असमानता द्वैध अर्थव्यवस्थेच्या निर्मितीला कारणीभूत ठरते. राष्ट्रीय एकात्मतेला बाधक ठरू शकते. विकासात माघारलेल्या प्रदेशात निर्माण होणारा असंतोष राजकीय अस्थैर्य निर्माण करू शकतो.

**३. असमान विकासाची कारणे :**

असमान विकासाच्या संदर्भात काही वेळा एखाद्या प्रदेशात विकास केंद्रित होण्याला वा केंद्रित झालेल्या आर्थिक व्यवहारांना तेथील खास चांगली वा नैसर्गिक अनुकूल परिस्थिती वा आर्थिक भूगोल कारणीभूत असू शकतो. बंदर बांधणीसाठी अनुकूलतेमुळे व्यापारी केंद्राची भरभराट होऊन विकास गतिमान होणे किंवा खाणीजवळ अवजड उद्योगांचा विकास नैसर्गिक अनुकूलतेमुळे विकासाची उदाहरणे आहेत. तथापि नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता वा अनुकूलता विकासाचा एकमेव निर्णायक घटक नसतो कारण अनेक संसाधन संपन्न प्रदेश मागासलेले राहतात. सरकारमध्ये विकसित प्रदेशांचे व त्यांच्या दबावगटाचे वर्चस्व असेल तर त्या भागालाच विकास कार्यांमध्ये प्राधान्य दिले जाते. विकासाला गति देणारे आणि विकास कार्यांचे व त्याच्या फळांचे वितरण करणारे घटक यांच्यातील संघर्षात्मक संबंधाचाही असमान प्रादेशिक विकास हा परिणाम असू शकतो. अर्थव्यवस्थेच्या व्यवस्थात्मक वैशिष्ट्यांचीही ती परिणति असू शकते.

प्रादेशिक विषमतेचे आजचे एक महत्वाचे स्वरूप व कारण विकास धोरण व कार्यक्रमांचा उल्लेख करावा लागेल. आर्थिक विकासात मानवी प्रयत्न व निर्मित सुविधांचे महत्व वाढत जाते तसा हा घटक अधिकाधिक महत्त्वाचा होत जातो. विकासाबाबत एखाद्या विभागाच्या आकर्षण शक्तीचे कारण मूलत: त्या ठिकाणी महत्त्वाची विकास कार्ये प्रथम सुरू झाली व यशस्वी झाली आणि तितक्याच चांगल्या प्रकारे सुरू होऊ शकली असती अशा अन्य ठिकाणी ती सुरू झाली नाही या ऐतिहासिक घटितात आढळते. या प्रकारे विकास कार्ये आधी सुरू होऊन सातत्याने विकास होणारी विकास केंद्रे इतर ठिकाणे व विभागांचे नुकसान करून स्वत:ची वाढ बळकट करून घेतात व इतर ठिकाणी सापेक्ष दृष्ट्या परागतीची संरचना निर्माण झाली असे असू शकते. विकासातील प्रादेशिक असमानतेचे हे स्वरूप आज सामान्य स्वरूपाचे झालेले आहे. आपल्याला अभिप्रेत असलेली, असंतोषाला कारणीभूत ठरणारी, विकास धोरण व कार्यक्रमांद्वारे

न्यूनतम पातळीवर आणली पाहिजे अशा स्वरूपाची ही असमान प्रादेशिक विकासाची समस्या आहे.

**४. गुंतवण निधी आवंटनाच्या निर्णयाचे निकष:**

गुंतवणूकीशिवाय विकासकार्ये सुरू केली जाऊ शकत नाही. त्यामुळे भांडवल गुंतवणूक विकासाचा महत्त्वाचा कारक असल्याचे सर्वमान्य आहे. मागणीच्या तुलनेत भांडवलनिधी मर्यादीत असल्यामुळे भांडवलाचे आवंटन महत्त्वाचे असते. भांडवल निधीच्या आवंटन निर्णयात आर्थिक दृष्टीकोनातून गुंतवणूकीची उत्पादकता महत्वाची मानली जाते, राजकीय दृष्टीकोनातून मतदात्यांचा संतोष, स्थानिक विकास याकडे लक्ष पुरवावे लागते. सरकारमधील दबावगटांचे वर्चस्वही गुंतवणनिधीचे आवंटन प्रभावित करतात.

विकासाच्या संदर्भात गुंतवण निधीच्या प्रादेशिक आवंटनात सामान्यत: तीन पर्यायी निकषांचा विचार केला जातो.

१) विकासाची संभाव्य क्षमता जास्त असलेल्या प्रदेशांना जास्त आवंटन–विकासाच्या दृष्टीने सर्व विभागात सारखी अनुकूलता नसते. विकासाला वेगवान चालना देण्यासाठी गुंतवणूकीची उत्पाकता जास्त असलेल्या म्हणजे विकासानुकूल प्रदेशांना जास्त वाटा देण्याचे समर्थन केले जाते.

२) मागास प्रदेशांना जास्त आवंटन– अनेकदा काही प्रदेशांमध्ये विकासाला मदत करण्याची क्षमता असूनही त्या प्रदेशाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे ते प्रदेश विकासात मागे राहतात. त्यांना गुंतवणूकीचा जास्त वाटा दिला तर विकासाचा वेग वाढतो. अशा स्थितीत मागास प्रदेशांना गुंतवणूकीत जास्त वाटा मिळावा असे प्रतिपादन आढळते.

३) सर्व प्रदेशांना समान आवंटन– गुंतवणूक निधीचे भिन्न प्रदेशांना कमी जास्त आवंटन करताना विकसित प्रदेशांना गुंतवणनिधीचा कमी वाटा मिळाला तर विकसित प्रदेशांच्या विकासाचा वेग कमी होऊन एकूण विकास दरावर प्रतिकूल परिणामाची संभाव्यता असल्यामुळे सर्व प्रदेशांना समान आवंटनाची शिफारस केली जाते.

सामान्यत: पहिल्या दोन पर्यांयाचा वापर केला जातो. मात्र सर्वच पर्यायात वेगवान विकास हाच केंद्रबिंदू आहे. पहिल्या निकषात प्रदेशांच्या विकासानुकूलतेचा वापर व्हावा, दुसऱ्या निकषात प्रदेशाची संभाव्य विकासक्षमता अनुपयोजित राहू नये तर तिसऱ्यात विकसित प्रदेशांचा विकासदर कमी होऊ नये यावर भर आहे. दुसऱ्या शब्दात कमाल वृद्धीदर साध्य आणि प्रादेशिक विकासाबाबत साधनात्मक दृष्टीकोन आहे. अर्थात मागास प्रदेश विकासात किती योगदान देऊ शकतील किंवा त्यांच्या मागासपणामुळे विकासदरावर प्रतिकूल परिणाम होईल का हेच सूत्र आढळते. विकासाच्या दृष्टीने सर्व पातळीवरील प्रदेशांना समान वाटा निकषात विकासाबाबत निर्माण झालेली असमानता टिकून राहण्याची व वाटण्याची शक्यता दुर्लक्षित केलेली दिसते. जास्त उत्पादकता असलेल्या प्रदेशांना जास्त आवंटन या निकषामुळे तर समतोल प्रादेशिक विकासाच्या संदर्भात घेतले जाणारे आक्षेप महत्त्वाचे आहेत. जास्त उत्पादकता म्हणून जास्त वाटा तर इतर प्रदेशांचा गुंतवणूकीतील वाटा स्वाभाविकपणे घटतो, पर्यायाने त्यांचा विकासाचा हक्क नाकारला जाणे न्यायाच्या दृष्टीने अयोग्य आहे. जास्त गुंतवणूकीमुळे विकसित झालेले

प्रदेश आर्थिक वृद्धी व वृद्धीच्या साधनांच्या आकर्षणाचे केंद्र बनून कमी विकसित प्रदेशातील बचती राजस्व इ.च्या कर्षणाला कारणीभूत ठरतात. मागास प्रदेशांच्या विकासासाठी आणखी प्रतिकूलता निर्माण करतात. विकासातील ही शोषणात्मकता आक्षेपार्ह आहे. विकास शेवटी मनुष्यासाठी आहे आणि तो प्रत्येकाचा हक्क आहे या तत्त्वाला प्रादेशिक विकासाबाबतच्या या साधनात्मक दृष्टीकोनात नकार आहे. अर्थव्यवस्थेतील एकूण गुंतवणूक विकास दराशी निगडीत आहे तर गुंतवणूक निधीचे प्रादेशिक वाटप तो प्रदेश वा विभाग व तेथील लोकांसाठी विकास प्राप्यतेचा प्रश्न आहे हे यात लक्षात घेतले जात नाही.

**५. आर्थिक विचार व सिद्धान्तातील समानतेचे तात्विक अधिष्ठान व अपसरण :**

समान वा संतुलित प्रादेशिक विकासाच्या समर्थनार्थ अनेक युक्तीवाद असले तरी प्रत्यक्षात विकासाबाबत असमानता ही सार्वत्रिक बाब आहे. त्यामुळे आर्थिक विचार व सिद्धातांचे अधिष्ठान असमानतेचे समर्थक आहे का अशी शंका स्वाभाविकपणे निर्माण होते. या दृष्टीने मागोवा घेतला तर राजकीय लोकशाही किंवा आधुनिक समताधिष्ठित धोरणाच्या फार आधीपासून आर्थिक सामाजिक विचार व सिद्धातांचे अधिष्ठान समानतावादी असल्याचे आढळून येते. या संदर्भात गनर मिर्दलचे विवेचन लक्षणीय आहे.

अर्थशास्त्राचा विकासारंभ १८ व्या शतकाच्या शेवटी व १९ व्या शतकाच्या प्रारंभी झाला. या ज्ञानयुगाच्या कालखंडातील अभ्यासकांना आपल्या विचारावर राष्ट्रीय मर्यादा पडू न देण्याची महत्त्वाकांक्षा होती, म्हणूनच त्याला ज्ञानयुग म्हटले जाते. संपूर्ण मानव जातीचे हित हा आर्थिक सिद्धातांचा चिन्त्य विषय असला पाहिजे अशी त्यांची धारणा व प्रयत्न होता. त्यामुळे आर्थिक विचार व सिद्धान्तांच्या विकासाच्या प्रारंभापासूनच आर्थिक सामाजिक विचार व सिद्धान्त समानतावादी आहेत.

नैसर्गिक नियमाच्या तत्त्वज्ञानानुसार श्रमिकच संपत्तीचे निर्माते आहेत. त्यामुळे संपत्तीचा हक्क श्रमाशी निगडीत आहे. सर्व माणसे जन्मत: समान असतात हे नैसर्गिक नियमामागील तत्त्वज्ञान आहे. समाजात सर्वांना समान हक्क असतात हा त्याचा नैतिक अर्थ व त्यामागील स्वयंसिद्ध सत्य आहे. आधुनिक प्रतिपादनात लॉकच्या तत्त्वज्ञानातून, त्याच्या वास्तविक मूल्याच्या सिद्धान्तातूनही उत्पादनाचा खरा घटक श्रमिकच असल्याचे प्रतिपादन आहे.

उपयुक्ततावाद्यांनी सर्वांच्या कल्याणाची जुनी कल्पना अधिक विकसित केली संघटीत समाजाचे ध्येय सामाजिक कल्याण महत्तम करण्याचे असावे हे त्यांचे मुख्य प्रतिपादन होते. कल्याण हे सुखदु:खाच्या बरेजेने तयार होते. त्यांनी स्वीकारलेल्या सुखवादी मानसशास्त्रानुसार उत्पन्नाची सीमान्त उपयोगिता घटते. त्यामुळे उत्पन्न व संपत्तीची समानता अनिवार्य आहे. विकासाबाबत प्रादेशिक समानतेचे तत्त्व त्यातून स्वाभाविकपणे व्युत्पन्न होते. मुख्यत: या दोन तत्त्वज्ञानावर आधुनिक आर्थिक सामाजिक सिद्धान्त आधारलेले आहेत.

जगात कोणत्या प्रकारची स्थिती वांछनीय आहे किंवा निर्माण करण्याची आकांक्षा असावी या प्रश्नाचे उत्तरही समानतेच्या स्थितीकडे निर्देश करते या अर्थाने आदर्श समाजस्थितीबाबतच्या मानवी ध्येयाची अभिव्यक्ती असेही स्वरूप समानता तत्त्वाला प्राप्त होते. या तीनही तत्त्वांना अपवाद आढळत असले

तरी सर्वसामान्य स्वरूपात समानतेच तत्त्व अबाधित राहते असेच मानले गेलेले आहे.

अशाप्रकारे मनुष्य प्राण्यातील समानता, संपत्तीचा निर्माता श्रमिक, समान हक्क, समानतेवर आधारित समाजनिर्मितीची वांछनीयता या सर्वातून भिन्न व्यक्ती, वर्ग, विभाग, प्रदेश, राष्ट्र या सर्वांबाबत विकासाच्या समानतेचे तत्व प्रस्फुटित होते. आर्थिक विचार व सिद्धान्त रचनेच्या मुळाशी या प्रकारे समानतेचे ठाम तत्त्वज्ञान असले तरी समानतेचा प्रश्न टाळण्याची वा पलायनवादाची प्रवृत्ती आढळते. समानता तत्त्वाला मान्यता देणाऱ्यांनीच त्यावरील उतारे तयार करून समानतेचे तत्व निष्प्रभ केल्याचे मिर्दलचे प्रतिपादन आहे.

आर्थिक विवेचनात व सिद्धान्तात बाजार अर्थव्यवस्था गृहीत धरलेली आहे आणि अनेक अपवाद असले तरी बाजार शक्तींना मुक्त वाव दिल्यास एकंदरीत सर्वांना समाधानकारक स्थिती निर्माण होईल असा निष्कर्ष काढून समानतेसाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज नसल्याचे सूचवले गेले. समाजातील भिन्न लोकांचे हितसंबंध परस्पर सुसंवादी असतात ही नैसर्गिक नियमाची धारणा आहे. एवढेच नाही तर राज्यसत्तेच्या हस्तक्षेपाने हा सुसंवाद अस्तित्वात येणार नाही असे म्हटले गेले. अर्थात महत्तम सामाजिक कल्याणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न, धोरण कार्यक्रमादीची अनावश्यकता सूचवली गेली. मनुष्याला आदर्श स्थितीचे ज्ञान आणि ती निर्माण करण्याचे ध्येय असले तरी सामान्य मानवी जीवन नैतिक तडजोडीचे असते. प्रत्यक्ष जीवनात लोकांना आपल्या हितसंबंधाचे रक्षण करावयाचे असल्यामुळे विचारातील विसंगतीतही सुसंगतीचा आभास निर्माण करता येईल अशा उताऱ्यांची लोकांची मागणी असते. या सर्वांचा एकत्रित परिणाम समानतेच्या तत्त्वापासूनचे व्यवहारात अपसरणच आढळून आले.

समानतेचे तत्त्व महत्तम सामाजिक कल्याणासाठी मुख्यत: उत्पन्न समानतेकडे निर्देश करते. मात्र महत्तम सामाजिक कल्याणााठी उत्पन्न समातेचे तत्त्व विकासातील प्रादेशिक समानतेचे सशक्त समर्थक असल्याचे स्वयंस्पष्ट आहे. प्रारंभी सिद्धातांना समानतेच्या ठाम अधिष्ठानाच्या गृहितामुळे त्याचा उल्लेख व विवेचन अनावश्यक मानले गेले. रिकार्डो व माल्थसने उत्पन्न वितरण विषमतेकडे झुकत जात असल्याचा निष्कर्ष काढला तथापि लोकसंख्या सिद्धान्त व उत्पादन व्यवस्थेतील भौतिक नियमांच्या अपरिहार्य कार्यशीलतेच्या आधारावर पुनर्वितरणाचे सबल समर्थन केले नाही. त्याऐवजी शिक्षण व उच्चतर जीवनमानाची आकांक्षा सार्वत्रिक झाल्यास विषमतेची ही परिस्थिती बदलेल असे मानले. जे एस मिलपासून उत्पादन व वितरणाचे क्षेत्र विभक्त मानले गेले. धोरणात्मक हस्तक्षेपाने वितरण बदलता येते असे मानून समानतेसाठी विकासाच्या फळाच्या पुनर्वितरणाच्या उपायावर आजतागायत त्यामुळेच भर असलेला दिसून येतो. शिवाय समानता हे ध्येय असले तरी समानतेचे ध्येय प्रत्यक्षात तातडीने उतरवणे अयोग्य असल्याचे प्रतिपादन केले गेले. उत्पन्न वितरण त्वरेने बदलण्याच्या प्रयत्नात नफा कमी होईल, भांडवलनिर्मिती घडून विकासावर प्रतिकूल परिणामांची भीती व्यक्त केली गेली. तसेच आकस्मिक व फार मोठ्या बदलांनी अस्तित्वातील व्यवस्था, संस्था अस्ताव्यस्त होण्याची शक्यता व्यक्तवली गेली. त्यामुळे समतानिष्ठ धोरणाची कार्यवाही सावकाशपणे करण्याची अर्थात स्वाभाविकपणे प्रदीर्घकालीन बाब असल्याची भूमिका घेतली गेली.

**६. प्रादेशिक विकासासंबंधी सैद्धान्तिक विवेचनामागील दृष्टीकोन :**

प्रादेशिक विकासाच्या संदर्भात विश्लेषण करणारे किंवा प्रादेशिक विकासासंबंधी अन्वयार्थ प्राप्त होणारे अनेक सिद्धान्त आहेत. त्या सिद्धान्तामागील दृष्टीकोनाचा विचार केला तर उदारमतवादी अन्तर्जात विकास दृष्टीकोन, केन्सवादी बहिर्जात विकास; मार्क्सवादी आणि आधुनिक वा नव-अन्तर्जात विकास दृष्टीकोन असे चार दृष्टीकोन मानले जातात. चारही दृष्टीकोन भांडवलशाही वा बाजार व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर विवेचन करतात. प्रचलीत विकास प्रक्रियेत विषमता निर्माण होण्याची प्रवृत्ती असल्याबद्दल सर्वांचे एकमत आहे. प्रादेशिक असमानता दूर करण्याबाबत मात्र त्यांच्यात विचार भिन्नता आहे. पहिला आणि चौथा दृष्टीकोन निर्हस्तक्षेपवादी आहे. केन्सवादी दृष्टीकोन हस्तक्षेपवादी तर मार्क्सवादी दृष्टीकोन अतिहस्तक्षेपवादी मानला जातो.

उदारमतवादी दृष्टीकोनानुसार प्रादेशिक विषमता संतुलनाकडे जाण्याची प्रवृत्ती ठेवते अर्थात प्रादेशिक विषमता दीर्घकाळात घटत जाते. त्यामुळे बाजारप्रक्रियेत हस्तक्षेप करण्याची गरज नाही. उत्पादन घटकांची विशेषत: श्रमाची गतिशिलता वाढवली तर मागास प्रदेशात विकास कार्यांकडे संसाधने, श्रमिक जातील व विकास घडून येईल. उदाहरणादाखल सायमन कुझनेटस्च्या सिद्धान्तात या दृष्टीकोनाचे प्रतिबिंब जाणवते. त्या सिद्धान्ताप्रमाणे प्रादेशिक असमानतेबाबत उलट्या 'यू' आकाराचा वक्र प्राप्त होतो.उत्पादकता जास्त असलेल्या प्रदेशात जास्त गुंतवणूक होऊन विकास केंद्रे निर्माण झाल्याने प्रारंभी विकासात प्रादेशिक असमानता वाढत जाते. अर्थव्यवस्थेने विकासाचा परिपक्व टप्पा गाठल्यानंतर मात्र असमानता हळूहळू कमी होत जाते. परिपक्कावस्थेपर्यंतची विकास प्रक्रिया ५० ते १०० वर्षे एवढी दीर्घकाळ चालणारी असू शकते. त्यामुळे या प्रकारच्या सिद्धांतानुसार विकासाबाबत प्रादेशिक समानता ही दीर्घकाळात व स्वाभाविकपणे घडून येणारी म्हणजे बाजार यांत्रात हस्तक्षेपाची गरज नसलेली प्रक्रिया आहे.

केन्सवादी दृष्टीकोन विकास हा असंतुलनकारी आणि म्हणून बाजार प्रक्रियेत हस्तक्षेपाची गरज असणारा मानतो. विकासात मागे असलेल्या प्रदेशांमध्ये गुंतवणूकीचा अन्तर्वाह प्रोत्साहित होईल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे सूचवतो. गनर मिर्दलच्या सिद्धान्तात या दृष्टीकोनाच्या प्रकृष्ट स्वरूपात विकासाबाबत प्रादेशिक असमतोलाची मीमांसा तसेच समतोल प्रादेशिक विकास संभाव्यतेचे विश्लेषण आहे. बाजार यांत्राच्या स्वाभाविक प्रवृत्तीमुळे विकासात प्रादेशिक असमानता निर्माण होते. विकास प्रक्रिया संचयी व चक्राकार स्वरूपाची असल्यामुळे असमानतेची सधनताही वाढते. श्रम, भांडवल आणि व्यापाराच्या विकसित प्रदेशातील संकेद्रणाच्या माध्यमातून घडून येणारी ही प्रक्रिया बाजारात जाणीवपूर्वक केलेल्या हस्तक्षेपाद्वारे याच घटकांच्या मागास प्रदेशात स्थानांतरणाद्वारे तेथे विकासाची उर्ध्वगामी प्रक्रिया सुरू करतील. संचयी व चक्रीय स्वरूपाची प्रक्रिया असल्यामुळे मागास प्रदेशात अभिक्रमित ही विकास प्रक्रिया विकासातील प्रादेशिक असमानता घटविण्यास निश्चितपणे सहाय्यक व यशस्वी ठरते.

विकासाची प्रवृत्ती प्रादेशिक असंतुलन

निर्माण करणारी असल्याचे मार्क्सवादी दृष्टीकोनाचे प्रतिपादन आहे. प्रादेशिक विकासासाठी नियोजन व नियंत्रणाची गरज असते. त्यामुळे विकास कार्यांच्या निर्णयात बाजार संकेतकांकडे दुर्लक्ष करणे आवश्यक असल्याची त्यांची भूमिका आहे, किंबहुना तो बाजार यांत्राच्या प्रतिस्थापनाच्या मर्यादेपर्यंत जात असल्यामुळे हा अतिहस्तक्षेपवादी दृष्टीकोन मानला जातो. या दृष्टीकोनातील केंद्र परिघ सिद्धान्त किंवा नव-वसाहतवादी सिद्धांतातील प्रतिपादनानुसार बाजार यांत्र, त्याच्या कार्यशीलतेमुळे निर्मित सत्तासंबंध, प्रभावी दबावगट इ.मुळे मागास प्रदेशांना समतोल विकासासाठी आवश्यक परिणामकारक संधी व संसाधने मिळून समतोल प्रादेशिक विकास घडून येण्याची शक्यता नसते.

आधुनिक नव-अन्तर्जात विकास दृष्टीकोनही विकासातील प्रादेशिक असमतोलाची प्रवृत्ती मान्य करतो. मात्र प्रदेशाच्या संभाव्य विकास क्षमतांच्या वापराद्वारे असमानता कमी करण्याचे सूचवतो. उत्पादनमान, उचित तंत्र, नवप्रवर्तन, संस्थांमध्ये गुणात्मक सुधारणा इ. द्वारे असमान प्रादेशिक विकासाचा प्रश्न सुटू शकतो म्हणून राज्य हस्तक्षेपाची गरज नसल्याचे त्यांचे प्रतिपादन आहे. वस्तुतः उदारीकरण खाजगीकरणादी जागतिकी-करणाच्या वैशिष्ट्यांमुळे विकासात विषमता निर्माण करणारे घटक अर्थव्यवस्थेच्या परिचालनात विशेषत्वाने सक्रिय झालेले आहेत. एका बाजूने लाभ हेतूचे वर्चस्व, तर दुसऱ्या बाजूने शासनाद्वारे नियमन, नियंत्रणात आणि आर्थिक कार्यातील प्रभावी सहभागात लक्षणीय घट यामुळे गुंतवणूकीसाठी सुविधा व अनुकूलता असलेल्या अर्थात विकसित प्रदेशात अधिकाधिक गुंतवणूक व विकासकार्ये होऊन प्रादेशिक असमानता वाढण्याला अनुकूलता निर्माण झालेली आहे. मागास प्रदेशातील विकास संभाव्यताच्या वापराची शाश्वतीही अधिकच धूसर झाली हे मान्य करावे लागेल.

असमान प्रादेशिक विकासाच्या संदर्भात जे.डी.एच.जेफ्री यांचा वेगळ्या प्रकारचा सिद्धांत काही मुलभूत महत्त्वाच्या बाबींवर प्रकाशझोत टाकतो असे म्हणता येईल. त्यांच्या विश्लेषणानुसार गुंतवणूक निर्णय उद्दिष्टाधिष्ठित असतात. साध्य काय करायचे हा कळीचा प्रश्न असतो. महत्तम वृद्धी दर की सामाजिक न्याय या पर्यायातून निवड करायची असते. विकास दराचे उद्दिष्ट कार्यक्षमतेशी निगडीत तर मागास प्रदेशांच्या विकासाचे उद्दिष्ट सामाजिक न्यायाशी संबद्ध असते. मागास प्रदेशात गुंतवणूकीवर परतावा कमी म्हणून दोन उद्दिष्टात सममूल्यन निर्माण होते. भांडवलसाठा सीमित म्हणून मागास प्रदेशांच्या विकासासाठी एकूण गुंतवणूकीत मोठा वाटा प्रगत प्रदेशाकडून मागास प्रदेशाकडे आवश्यक आहे मात्र या प्रकारात एकुण विकासदर व प्रगत प्रदेशांचा विकास दर घटेल. ती सामाजिक न्यायासाठी दिलेली किंमत मानली पाहिजे.

जेफ्रींच्या सिद्धान्त सातत्याने आढळणाऱ्या असमान प्रादेशिक विकास समस्येचे मूळ गुंतवणूक निर्यणामागच्या उद्दिष्टात आहे ; महत्तम वृद्धीदर व समतोल प्रादेशिक विकास या दोन उद्दिष्टात अन्तर्विरोध असतो ; समान प्रादेशिक विकासासाठी गुंतवणूकीची कमी वाटा स्वीकारणे, एवढेच नाही तर सापेक्ष विकसितपणामुळे वाढलेली भांडवलीनिर्मिती गुंतवणूकीसाठी मागास प्रदेशासाठी उपलब्ध करून देण्यात योगदान असणे व तसे दायित्व विकसित प्रदेशाने स्वीकारणे आवश्यक आहे आणि विकास

दरापेक्षा सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट प्राधान्यायोग्य आहे हे अतिशय महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित झालेले आहे.

**७. समान प्रादेशिक विकास व्यवहाराचे वास्तव:**

समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नाचे विश्लेषण करणारे दृष्टीकोन, सैद्धान्तिक निष्कर्ष, हे उद्दिष्ट ठेवून केलेले प्रत्यक्ष प्रयत्न लक्षात घेतले तरी असमान प्रादेशिक विकासाचे वास्तव प्रकर्षाने जाणवते. काही देश मात्र विकासासाठी समान संधी निर्माण करून प्रादेशिक समानतेच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करण्यात व सामाजिक कल्याणाची उच्च पातळी गाठण्यात बरेच यशस्वी झालेले आढळतात. त्या संदर्भात चर्चा झाली, होईलही परंतु त्यातील एका महत्वाच्या मुद्दाचा परामर्ष संक्षेपाने या ठिकाणी घ्यावयाचा आहे.

आर्थिक स्थितीसाठी आर्थिक तसेच आर्थिकेतर घटक कारणीभूत असतात. आर्थिक विश्लेषणात प्रामुख्याने आर्थिक घटकांची चर्चा केली जाते. वॉल्टर हेगेनबुश किंवा गनर मिर्दलसारख्या अभ्यासकांच्या मते मात्र आर्थिक उद्दिष्टे साध्य करताना आर्थिक आणि आर्थिकेतर घटक अशा वर्गीकरणाऐवजी संबद्ध आणि असंबद्ध घटक हे वर्गीकरण अधिक योग्य ठरते. विश्लेषणात संबद्ध घटकांचा विचार केला पाहिजे. मिर्दलच्या विवेचनानुसार कल्याणकारी राज्य हे राष्ट्रवादी राज्य असते आणि समान प्रादेशिक विकासासाठी राष्ट्रीय एकात्मतेची भावना अपरिहार्यपणे आवश्यक आहे. एकात्मतेच्या भावनेमुळेच प्रादेशिक विषमतेच्या स्थितीत समान विकासासाठी आवश्यक ती किंमत देऊन विकासाची संसाधने मागास प्रदेशांना प्राधान्याने व आधिक्याने देणे; पर्यायाने विकसित प्रदेशाने संसाधनांच्या कमी वाट्याचे आवंटन मान्य करणे ; मागास प्रदेशावर जास्त खर्च करता यावा म्हणून सरकारचा महसूल वाढण्यासाठी करदेयक्षमता, बचतक्षमता जास्त असलेल्या वर्ग व प्रदेशांवर जास्त भार टाकणे, त्यासाठी त्यांची त्यागाची तयारी व मागास प्रदेशाच्या विकासासाठी योगदान या गोष्टी होऊन समतोल आर्थिक विकास शक्यतेच्या पातळीवर येतो. यशस्वी देशांचा अनुभव ही बाब अधोरेखित करतो.

भारतात आर्थिक नियोजनात समानतेसह विकासाचे ध्येय ठेवले गेले. अर्थात समतोल प्रादेशिक विकास नियोजनाचे एक उद्दिष्ट असून कमी विकसित क्षेत्रांकडे लक्ष देण्याचे मान्य केले गेले. अभ्यासगटांद्वारे प्रादेशिक विषमतेच्या समस्येचा अभ्यास वेळोवेळी केला गेला. मागासपणाचे निकष ठरवले गेले. त्यांच्या विकासासाठी शिफारशी केल्या गेल्या. वित्त आयोगांनीही केंद्र –राज्य सरकारातील वित्तीय संसाधनांच्या आवंटनात मागास भागांना अधिकाधिक वाटा देण्याची शिफारस केली. मागास प्रदेशांच्या विकासाचे प्रयत्न झाले मात्र प्रादेशिक असमानता समाप्त झाली नाही. या संदर्भात महाराष्ट्राचा अनुभव मिर्दलच्या विवेचनातील एकात्मतेच्या भावनेच्या कमतरतेची जाणीव करून देणारा वाटतो. त्याचा थोडक्यात आढावा घेऊ.

विकासाबाबत प्रादेशिक वा विभागीय असमानतेचे वैशिष्ट्य महाराष्ट्रात प्रकर्षाने आढळते आणि त्यात फारशी सुधारणेची प्रवृत्तीही आढळत नाही. विदर्भ आणि मराठवाडा विशेष मागासलेले विभाग आहेत. तीव्र राजकीय इच्छाशक्ती व विषमता वाढणार नाही याची पूर्ण काळजी घेऊन केलेले प्रामाणिक प्रयत्नाचाही प्रत्यय येत नाही. एकात्मतेच्या

भावनेचा अभाव हे त्याचे एक महत्त्वाचे कारण असल्याचे म्हणायला वाव आहे.

आर्थिक विकासात मागासलेल्या विभागांच्या विकासाकडे लक्ष देण्यांच्या दृष्टीने तीन वैधानिक विकास महामंडळे स्थापन करण्याचा ठराव महाराष्ट्रात १९८४ मध्ये मंजूर झाला. परंतु प्रत्यक्षात अशी मंडळे १० वर्षानंतर १९९४ मध्ये अस्तित्वात आली. वैधानिक विकास महामंडळे आर्थिक नियोजनाबाबत केवळ अनुशेषच नाही तर विकास खर्चासाठीही भिन्न विभागात करावयाच्या निधी वाटपाबाबत शिफारस करू शकतात. राज्यपालांवर याबाबत विशेष जबाबदारी व अधिकार आहेत. प्रत्यक्षात आदेशाऐवजी अनौपचारिक सूचनांच्या निष्प्रभावी मार्गाचा जास्त वापर होताना दिसतो. नरोत्तम शहांच्या सूचनेनुसार विकसित प्रदेशांचा विकास दर राज्याच्या सरासरी विकास दरापेक्षा कमी तर अविकसित प्रदेशांचा विकास दर राज्याच्या सरासरी विकास दरापेक्षा जास्त राहील असे धोरण स्वीकारले तरच प्रादेशिक असमतोल कमी होईल. प्रत्यक्षात त्याचा विचारही झाला नाही. याउलट मागास प्रदेशांना मिळायला हवा असलेल्या वाट्यापेक्षा प्रत्यक्षात मिळालेला वाटा कमी असलेला आढळून आला. नियत व्ययापेक्षा त्या विभागात प्रत्यक्ष खर्च नेहमीच कमी झाला. उर्वरीत निधी प्रगत भागाकडे वळवला गेला. आंतर्राष्ट्रीय संस्थांच्या सहकार्याने सुरू होणारे कार्यक्रम, संस्था विकसित भागातच कार्यान्वित झाल्या. शिवाय विकासाच्या काही विशेष योजनाही प्रगत भागातच सुरू करण्यात आल्या. विभागीय असमतोल न धटणे हा त्याचा स्वाभाविक परिणाम होता. सध्या जागतिकीकरणाच्या स्थितीत बाजार यांत्राला मुक्त वाव असल्यामुळे विषमतावर्धक व्यवस्थात्मक घटकांचा प्रभाव निष्प्रभावी करणे अधिकाधिक अवघड होणार हे निश्चित.

**८. समारोप :**

महत्तम सामाजिक कल्याणासाठी विकासाचे समान वितरण गरजेचे आहे. ते मान्यही केले गेले. नैसर्गिक नियम, सुखवादी तत्त्वज्ञान, मनुष्यामधील समानता व समान हक्क, वांछनीय सामाजिक व्यवस्था, इ.सर्वातून आर्थिक विचार व सिद्धान्तात समानता तत्त्वाच्या अधिष्ठानाला सर्वमान्यता प्राप्त झाली. मात्र समानता दीर्घकाळात साध्य होणारी वा करावयाची बाब आहे, वितरण धोरणात्मक हस्तक्षेपाने बदलता येते, अशी भूमिका घेतली गेली. विकसनशील देशांसाठी विकास आणि उत्पन्नच कमी तर वितरण कशाचे अशा युक्तीवादाद्वारे उत्पादन वाढीची निकड ठसवली गेली. उत्पादनवाढीसाठी भांडवलनिर्मिती आणि त्यासाठी विषमता उपयुक्त असल्याची भूमिका मांडली गेली. पाझर सिद्धान्ताद्वारे विकास खालपर्यंत पाझरत आणि सर्वत्र पसरत जाईल असा आशावाद निर्माण केला. समानतेसह विकासाचे उद्दिष्ट ठेवले गेले तरी या भूमिकांचा समतोल प्रादेशिक विकासावर प्रतिकूल परिणाम झाला. आज खुल्या अर्थव्यवस्थेचे व्यवस्थात्मक व संस्थात्मक घटक समानतेसह विकासाला अनुकूल नाहीत.

मूलत: संपूर्ण राज्याच्या विकासाचा, कल्याणाचा विचार हे शासनाचे प्रथम, सर्वोच्च दायित्व असल्याची प्रखर जाणीव, नि:पक्ष, प्रामाणिक कळकळ असल्याची शाश्वती वाटते का ? हितसंबंधी दबाव गटांबाबत विकास हा सर्व प्रदेशांचा व राज्यान्तर्गत सर्व विभागांचा हक्क आहे, मागास प्रदेशांचा तर तो प्राथम्याने विशेष हक्क आहे आणि त्यांच्यावर अन्याय करण्याचा अधिकार आपल्याला

नसल्याची जाणीव विकसित विभागांमध्ये आढळते का ? एकात्मतेच्या भावनेचा अभावच त्यातून व्यक्त होत नाही का ? केवळ असमानतेची कारणमीमांसा, धोरण, कार्यक्रम यांनी असमान प्रादेशिक विकासाची समस्या सोडवली जाण्याची अपेक्षा पूर्ण होण्याबाबत साशंकता स्वाभाविकच आहे. संक्षेपाने एकूण अनुभव लक्षात घेता अर्थशास्त्रीय विचारामागील समानतेचे अधिष्ठान मुलभूत महत्त्वाचे मानण्याची, विकास दरापेक्षा अर्थशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्राचे महत्तम सामाजिक कल्याणाचे उद्दिष्ट केंद्रस्थानी ठेवून प्रयत्न करण्याची आणि जे.डी.एच.जेफ्रीसारख्याच्या सिद्धांतातील मार्गदर्शन प्रमाण मानण्याची गरज अधोरेखित होते.

**संदर्भ :**


१) मुक्ता जहागिरदार (२००९) : आर्थिक चिकित्सा, सेंटर फॉर एकॉनॉमिक्स ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती.

2. Myrdal Gunnar (1955): Economic theory & Underdeveloped regions. Uni. of Stockholm, Vora & Co. Pvt. Ltd., Mumbai.
3. Gulati Rajendrakumar (1999) : Regional disparities in Economic development, Deep & Deep Publication, New Delhi.
4. Adelman Irma (1961) : Theories of Economic growth and development, Stanfford University Press.
5. Bharadwaj K. (1982) : Regional differentiation in India, EPW, Annual Vol. XVII, Nos. 14, 15, 16.


◆◆◆

ISSN 2320-0197

# Disparities in Human Development of Maharashtra : Cluster Analysis

**Samit L. Mahore**
Assistant Professor
Department of Economics,
RTM Nagpur University, Nagpur

**Abstract :**

The present paper used both one-dimensional and multi-dimensional cluster analysis to analyse Human Development Report of Maharashtra into three clusters based on the three basic dimensional indices of Human Development. The classification by the cluster analysis depends on the observations of similarities with respect to clustering variables. This paper narrates the features of each cluster based on their characteristics with respect to human development indicators and explores regional disparities in Maharashtra State.

***Key words: -*** *Regional disparities, Human Development, Cluster Analysis.*

**Introduction :**

Regional disparity is one of the vibrant barriers in the development of developed and developing countries. Development should provide equal opportunity to all people who participate in the development process. But in most of the developing countries like India regional disparities become important obstacle in equal benefits and equal opportunities to access the resources of the economy. Human development always play an important role in economic development. A developed economy represents more employment, highly developed education facilities, good health facilities and better standard of living. To achieve the goal of economic development human development is essential. A good human development leads to more employment opportunities, economic stability and equality, increases better quality of life and living standard.

United Nations Development Programme annually published Human Development Report since 1990. In this series UNDP recently has published 23rd report on 24th July 2014. It is one of the important source to measure the relative human development across the countries of the world. Human Development Index is a combination of three basic dimension of human development i.e. Long and Healthy Life, Educational attainment and a decent standard of living.(UNDP, 2014)

India and Maharashtra state have also published Human Development Reports at National and State level respectively. Recently, after a decade, Maharashtra has published its second Human Development Report 2012 in 2014. Human development

is a complex concept. It has a single dimension index which is calculated from the three different dimensions representing four various indicators of basic aspect of the human development. (UNDP, 2014)

In the present paper an attempt has been made to find out the level of disparity in the human development index and its dimension indices i.e. health, income and literacy rates with special reference to Maharashtra State.This paper uses a multivariate analysis with the help of SPSS, known as cluster analysis. In this analysis all the districts of the Maharashtra State are grouped in different clusters with the help of HDI and its dimension indices. The classification of the districts in the different clusters depends on the similarities with respect to clustering variables rather than predetermined threshold values. With the help of this classification, this paper identifies the major tires or groups in the multifaceted metrics of human development, explore the pattern of cross-group disparities, and the evolution of such disparities.(Hu, 2007)

**Objective :**

The main objective of the present paper is to highlight and discuss one and multi-dimensional similarities and dissimilarities in the human development of the Maharashtra State through Human Development Index and its dimensional indices.

**Study area :**

Maharashtra State is one of the Developed states of India.As per the latest data available Maharashtra stands at 7in HDI rank. (Research Institute of Applied Manpower, 2011)Here an attempt is made to find out and focus on the inter district variations in Maharashtra state.

**Methodology and Data :**

Present study is based on the secondary source of information. Inter district variation is calculated with the help of multivariate analysis.

**Cluster analysis:**

Cluster analysis is an important technique for classifying a 'mountain' of information into manageable meaningful piles. It is a data reduction tool, creates subgroups that are more manageable than individual datum. In cluster analysis there is no prior knowledge about which elements belong to which clusters. The grouping or clusters are defined through an analysis of the data. Subsequent multivariate analyses is performed on the clusters as groups. Cluster analysis of multivariate technique is used for grouping or clustering data on the basis of similarity of data. Generally correlation coefficient are used to measure the similarity or distance between the two points. But to avoid the overlap the data, cluster analysis is used. This method is widely used because it uses an analysis of variance approach to evaluate the distances between clusters. Cluster membership is assessed by calculating the total sum of squared deviations from the mean of a cluster.(Burns, 2009)

The selection of appropriate clustering is difficult for the effective use of cluster analysis. For the current hierarchical cluster analysis Ward's method is used to form cluster and squared Euclidean Distance

method is used to measure distance between the districts.

**Selection of Variables and Data :**

Variables measured by difference always adversely affect on the cluster analysis. In order to avoid this effect, data should be normalized. Normal or standard data do not adversely affect on the cluster analysis. For the present study all the four indicators of HDI with three dimensions i.e. Life expectancy at Birth (IMR), Education Attainment (both Literacy rate and GER), and Income (PCNDDP)are used. All the indicators have different metrics, so it may create problem in constructing cluster analysis. It will require normalisation of data. Instead of using measures of all four indicators three dimension indices are used for the cluster analysis. To facilitate aggregation of all indices in to single index, following general normalizing formula is used.

$$\text{Dimension Index} = \frac{(\text{Actual Value - Minimum Value})}{(\text{Max. Value - Min. Value})}$$

The minimum and maximum values are predetermined for all the indicators in the report. An aggregate HDI for a given district has been calculated as a simple arithmetic mean of the normalized scores for the three dimensions. (YASHDA, 2014)

This study is based on the secondary data. Recently YASHDA has published 2nd Human Development Report 2012 of Maharashtra. Data for all the indicators are used for the calculation which is available in the report.

**Empirical Analysis:**

In the present paper recent data of Maharashtra Human Development are used for the better understanding of disparities among the districts. Both one dimensional and multi-dimensional clustering is applied. One dimensional clustering is applied for all the three dimension indices, which gives insights on the clustering of districts with respect to particular development aspect of the dimension. To identify cluster or group of similar districts with respect to all three dimensions of basic development aspect (Health, Education and Income) simultaneously multi-dimensional clustering are used.

**One Dimensional Index :**

The present analysis divides all the district into three different clusters as per the similarities in the districts. All the members of the first cluster are from the lowest HDI value. Second cluster shows the group of those districts with medium value of all dimension indice including HDI value and third group of district shows highest attainment in all dimension of indices. Here we discuss the cluster wise analysis.

**First Cluster :**

First cluster of the analysis shows below state average in Health, Education and Income indices which lags behind the overall development of the districts.

Under the health index criteria, first group or cluster is a combination of seven districts. All these seven districts are having lowest Health index or Infant Survival Rate (ISR) which varies from 0.926 to 0.942 and it is below the state average (0.956). All the cluster member districts are from low HDI category. Simply it shows less developed and

lowest health facilities available in these districts compared to other districts of Maharashtra. One important point is that all the district are from Vidarbha Region only. Nandurbar which is from Nashik division. It means Vidarbha region is not having proper health facilities. This is one of the reasons of backwardness of the region. Another features of this group is that the group is belong to tribal area and geographically connected to each other.

Nandurbar district is the only district which comes in the first cluster of education dimension. It is because of its lowest rate of literacy. As per the Maharashtra Human Development Report 2012, Nandurbar district shows lowest rate of Education dimension which is only 0.646. This shows an urgent attention is required for education attainment. This also shows a wide variation in the district index and state average.

Third dimension of the HDI is income and it is calculated in terms of PCNDDP. First cluster of Income index comprises maximum 18 districts. All the districts showing lowest income index ranging from 0.147 to 0.355. Out of total cluster members, 50 percent of the district i.e. 9 districts are from again Vidarbha region. Out of 11 districts of Vidarbha 9 are in lowest income cluster and all districts of Amravati Division comes in this group. All the districts show most backward group of the state. These all district are geographically connected to each other. Average of the income index for this group is 0.261 which shows a wide gap from the state average (0.463).

**Second Cluster :**

Second cluster shows the average development in all the three dimension index. Values of all the dimension averages are near state average.

**Health Index :**

Health is the one of the important criterion of the Human development. Total 13 districts are in this second group which represent average health facilitiesamong the cluster member districts. The value of the health index for this group is 0.954 which is less than the state average of the health index (0.956), out of total thirteen districts, six district comes from Aurangabad division, four district are from Nashik division, two district from Amravati division and one district represent Nagpur division. In this group maximum number of districts are from Aurangabad division except two districts. It means standard of the health facilities is average in the division. Similar position is in the Nashik division,four out of six districts are in this cluster showing average health facilities. Washim and Yavatmal districts also show average health facilities in Amravati division. Only Nagpur district of the Nagpur division comes in this average category of health cluster. Nagpur, Aurangabad and Nashik are known as the developed districts in the state. These are also not having good health facilities.

**Education Index :**

In the second cluster of the education index total eight districts are included with 0.774 average value. It shows wide gap between the cluster group average and state average of the education index. In

this group of eight districts, six districts are from Aurangabad division and one is from Nagpur division and one is from Nashik division. It clearly shows that Aurangabad division is having less than average literacy compared to other divisions. Education is playing an important role in the development process. Low literacy rate is one of the major hurdle in the development of the Marathwada region of the state

**Income Index :**

Third category of the development indices is Income. Second cluster of the income indices comprises 13 district with 0.421 average value of the group, ranging from 0.372 to 0.492. Average of the group is also below the state average. Maximum districts in this group are from Western Maharashtra (Nashik, Pune and Kokan division). Only Aurangabad district is from Aurangabad division and two districts are from Nagpur division. Maximum number of the districts are under first and second cluster which represent lowest income group of the state.

**Third cluster :**

This cluster shows higher level of human development with all indices. Average value of all the groups is more than the state average in all the dimensions. In Health index, 14 districts are in this cluster.This group is representing highest level of health facilities available in the cluster members. Average value of the cluster is 0.972 which is more than the state average. Maximum number of the district in this group are from Pune and Konkan division. Only two districts each from Amravati and Aurangabad division are in this cluster.

Group of 25 districts come under third cluster in education index. These are the maximum number of district in one cluster group out of 34 of the Maharashtra State. It is really a good sign because it shows highest educational attainment. Average is also more than the state with 0.849 value. This group comprises all the district of Kokan, Pune, Amravati and Nagpur division. It means this four division shows high literacy rate in the state. This group is also representing that education is not the sign of development and it also creates question on the standard of the education. It may be because of the variable used in the calculation of the HDI. Literacy rate and gross enrolment ratio is not the proper measure for the education attainment of the human development.

Third cluster of income dimension gives a very clear picture. Only three members are in this cluster. These group shows very high Per Capita Net District Domestic Product. Thane, Mumbai and Pune are only three members of the group with a very high average value of the income dimension with 0.615. This shows the dominating role of the district economy in the development of the state.

Cluster /groupwise name of the district is given in the table no. one and table no. 2 shows the cluster wise dimensional descriptive statistics of the table no. 1.

**Table No. 1**
**One Dimensional Clustering**

| Cluster | Health Index | Education Index | Income Index |
|---|---|---|---|
| 1 | Nandurbar, Gadchiroli, Gondia, Amravati, Bhandara, Chandrapur, Wardha | Nandurbar | Nandurbar, Gadchiroli, Washim, Hingoli, Osmanabad, Nanded, Jalna, Latur, Dhule, Beed, Parbhani, Buldhana, Yavatmal, Gondia, Amravati, Bhandara, Akola, Wardha |
| 2 | Washim, Hingoli, Osmanabad, Jalna, Latur, Dhule, Parbhani, Yavatmal, Ahmednagar, Jalgaon, Aurangabad, Nashik, Nagpur, | Gadchiroli, Hingoli, Osmanabad, Nanded, Jalna, Dhule, Beed, Parbhani, | Chandrapur, Ahmednagar, Jalgaon, Aurangabad, Solapur, Ratnagiri, Satara, Sangli, Nashik, Sindhudurg, Raigarh, Kilhapur, Nagpur |
| 3 | Nanded,Beed, Buldhana, Akola, Solapur, Ratnagiri, Satara,Sangli, Sindhudurg, Raigarh, Kolhapur, Thane, Pune, Mumbai | Washim, Latur, Buldhana, Yavatmal, Gondia, Amravati, Bhandara, Chandrapur, Ahmednagar, Akola, Wardha, Jalgaon, Aurangabad, Solapur, Ratnagiri, Satara, Sangli, Nashik, Sindhudurg, Raigarh, Kolhapur, Nagpur, Thane, Pune, Mumbai | Thane, Pune, Mumbai |

Note - Table is based on the cluster analysis of Maharashtra HDR 2012

**Table No. 2**
**Descriptive Statistics of One Dimensional Clustering**

| Cluster | Health Index | | Education Index | | Income Index | |
|---|---|---|---|---|---|---|
| | N | Mean | N | Mean | N | Mean |
| 1 | 07 | 0.936 | 01 | 0.646 | 18 | 0.261 |
| 2 | 13 | 0.954 | 08 | 0.774 | 13 | 0.421 |
| 3 | 14 | 0.972 | 25 | 0.849 | 03 | 0.615 |
| Total | 34 | 0.956 | 34 | 0.837 | 34 | 0.463 |

Note - Table is based on the cluster analysis of Maharashtra HDR 2012

**Multi-dimensional index**

First cluster shows the lowest level of development than the state average in all the three dimension indicators, among these income gap is most remarkable. This group is mainly representing the backward and tribal areas of the state with remotely located.

All the Nine districts of the first group in Multi-dimensional index (HDI) show the lowest value of HDI and are in low category of the HDI. The group ranges from 0.604 to 0.617. Out of eight districts maximum five districts are from the Marathwada region, two are from Vidarbha region (one is from Amravati division and one is from Nagpur division) and other two district are from Nashik division namely Nandurbar and Dhule.

This cluster shows the parallel level of development with state average in both Health and Education but it lags in overall development with income indicator.

Second group of Human Development Index is a cluster of 15 districts. Out of fifteen districtsthree are from Nashik division, four are from Amravati division, four are from Nagpur division, and one each is from Pune and Kokan division. These all groups are from the different geographical area of the district. This shows regional disparities in the overall Human Development Index. But themaximum number less of developed districtsare from Vidarbha region. Only three are from West Maharashtra region. Average of the indicators value of this group is 0.711 which is less than the state average. It means second cluster of districts is less developedin the state.

This cluster of districts represent inclusive development in the state in all health, education and income indices.

**Table No. 3**
**Descriptive statistics of Multi-dimensional Clustering (HDI Index)**

| Cluster | District | Mean | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | N | Health Index | Education Index | Income Index | HDI |
| 1 | Nandurbar, Gadchiroli, Washim, Hingoli, Osmanabad, Nanded, Jalna, Latur, Dhule | 9 | **0.949** | **0.770** | **.217** | **0.645** |
| 2 | Beed, Parbhani, Buldhana, Yavatmal, Gondia, Amravati, Bhandara, Chandrapur, Ahmednagar, Akola, Wardha, Jalgaon, Aurangabad, Solapur, Ratnagiri | 15 | **0.954** | **0.838** | **0.340** | **.711** |
| 3 | Satara, Sangli, Nashik, Sindhudurg, Raigarh, Kilhapur, Nagpur, Thane, Pune, Mumbai | 10 | **0.970** | **0.858** | **0.495** | **0.775** |
| **Total** | **Maharashtra State** | **34** | **0.956** | **0.837** | **0.463** | **0.752** |

Note – Table is based on the cluster analysis of Maharashtra HDR 2012

It also shows third cluster of the Human Development Index is a group of ten cluster member districts. All the districts are from western Maharashtra except Nagpur. All district of the Kokan division except Ratnagiri district are the members of this cluster which show very high level of human development in the state. Similarly

all districts of the Pune division except Solapur are also the member of this developed group. Only one district of Nagpur division is the member of this group which is representing Vidarbha region. Nagpur district comes in this group only because of the high literacy rate. The average of the group is 0.775, definitely it is more than the state average. Table no. 3 shows the Multi-dimensional clustering along with its descriptive statistics.

**Figure No. 1 : Multi-Dimensional Index**





Figure no. 1 compares average of the different clusters with the average of the state. It shows the clear picture of regional disparities in the all the three indicators of the human development and the state among the different cluster.

**Conclusion :**

In this paper cluster analysis is used to classify and analyse the similarities and dissimilarities of all the districts. It is different from the traditional method of the classification. Three clusters of the human development explored the different aspects of the regional disparities in the state. This method is widely used by the international organisation because of its superiority than the traditiona method. From the above analysis it proves that only combine index is not properly represent the disparities in the human development. Individual indicator give clear picture about regional disparities of the human development.

**References :**

1. Burns, R. P. (2009). Business Research Methods and Statistics using SPSS. New Delhi: SAGE Publications India Pvt. Ltd.
2. Hu, Y. Y. (2007). Investigating Regional Disparities of China's Human Development with Cluster Analysis: A Historical Perspective. Springer Science + Business Media B.V. 2007, 417-432.
3. Research Institute of Applied Manpower. (2011). India Human Development Report 2011: Towards Social Inclusion. New Delhi: Oxford University Press.
4. UNDP. (2014). Human Development Report 2014. New York: United Nations Development Programme.
5. YASHDA. (2014). Maharashtra Human Deveopment Report. New Delhi: SAGE Publication .

◆◆◆

# महाराष्ट्रातील मानव विकास देशनांकाद्वारे आरोग्य आणि पोषणातील असमतोलाचे अध्ययन

**वनिता चोरे**
कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय,
चांदूरबाजार, जि.अमरावती

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्र राज्य हे प्रगत राज्य आहे. महाराष्ट्र राज्याच्या विकासाचे स्वरूप हे समान विकासाशी संबंधित आहे. परंतु वास्तविकता बघितल्यास महाराष्ट्र राज्याअंतर्गत, प्रादेशिक असंतुलन निदर्शनास येते. सद्य:स्थितीमध्ये आर्थिक विकास म्हणजे केवळ वृद्धी दरातील वाढ नसून मानवी विकासाशी संबंधित आहे. महाराष्ट्र राज्याच्या विकासाची परिणती महाराष्ट्र राज्याच्या मानव विकास अहवालावरून निदर्शनास येते. मानव विकासाची पार्श्वभूमी ठरविण्यासाठी मानवी हक्कांना महत्त्व देणे आवश्यक आहे. मानवी हक्क व मानव विकास यांचा निकटचा संबंध आहे. मानवी विकासाच्या मूल्यमापनात विविध मानवी हक्काच्या दृष्टीकोनातून आरोग्य व पोषण हा घटक अत्यंत महत्त्वाचा ठरू शकतो. त्यादृष्टीने मानवी हक्काची पूरकता ही मानवी विकासाची गुरूकिल्ली होय. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्राच्या मानव विकास अहवालाचा (२०१२) आढावा घेतला असून त्याद्वारे आरोग्य व पोषण या घटकाच्या आधारे महाराष्ट्रातील प्रादेशिक असंतुलनाचे विशेष अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मानव विकास दृष्टीकोण :**

मानव विकास दृष्टीकोण व आर्थिक विकास यादृष्टीने अनेक विचारवंतांनी मानवी विकासाशी निगडीत धोरणे विशद केली. या धोरणांचे विश्लेषण आर्थिक विकासाचे अर्थशास्त्र म्हणूनही केले आहे. आर्थिक विषमता व दारिद्र्य यांचा संबंध मानवी विकासाशी विशद करतांना प्रो.अमर्त्य सेन व जीन ड्रिझ म्हणतात दारिद्र्य दूर करून विषमता नष्ट करण्यासाठी उत्पन्नातील विषमतेसोबतच शिक्षण, आरोग्य व पोषण हे घटक देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. उत्पन्न व विनाउत्पन्नाचे घटक यांच्यामधील विषमतेत घट ही भारतासारख्या विकसनशील देशामध्ये मानव विकासाला प्रेरक ठरू शकते.

जगदीश भगवती व अरविंद पंगारियांच्या मते असंतूलन दूर करण्यासाठी आर्थिक विकासाला चालना द्यावी व आर्थिक वृद्धी दर वाढवावा. त्याद्वारे दारिद्र्यामध्ये घट होऊन विषमता कमी करण्यास मदत होईल. मानवी संसाधनांच्या आधारावर मानव विकास करणे ही भारताची गरज आहे असेही विविध सैद्धांतिक दृष्टीकोन आहेत. सर्व दृष्टीकोनांना सारखेच महत्त्व देऊन मानव विकासाला प्रेरणा देण्याचे कार्य करणे शक्य होईल. आर्थिक विकासातील असमानता मानव विकास निर्देशांकाद्वारे स्पष्ट होते.

**महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल (२०१२):**

महाराष्ट्राचा पहिला मानव विकास अहवाल

२००२ मध्ये प्रसिद्ध झाला. महाराष्ट्र राज्याचा दुसरा मानव विकास अहवाल २०१२ यावर्षी प्रसिद्ध झालेला आहे. मानव विकास अहवाल तयार करणे हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. भारतामध्ये मानव विकास अहवाल सर्वप्रथम २००२ मध्ये भारताच्या योजना आयोगाने प्रसिद्ध केला. दुसरा अहवाल २०११ मध्ये प्रसिद्ध झाला. इ.स. १९९० पासून UNDP द्वारा जागतिक पातळीवर मानव विकास अहवाल तयार केले जातात.

महाराष्ट्राच्या मानव विकास अहवालामध्ये सर्व समावेशक विकासाची उद्दिष्टे आणि आर्थिक धोरणांचा परिणाम म्हणून संख्यात्मक व गुणात्मक बाबींचे चित्रण तीन घटकांद्वारे केले आहे.

१) प्रतिव्यक्ती उत्पन्न

२) साक्षरता दर

३) आरोग्य व पोषण

मानव विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र मध्यम मानव विकास गटात येणारे राज्य आहे. महाराष्ट्रातील लोकांचे प्रति व्यक्ती उत्पन्न, शिक्षण, आरोग्य व पोषण, कौशल्य जेवढे उच्च दर्जाचे राहील तेवढी मानव विकासाला जास्त मदत होईल. भारताच्या मानव विकास अहवालामध्ये महाराष्ट्राचे मानव विकास निर्देशांक (HDI) मूल्य ०.७५२ असून भारतात महाराष्ट्राचा सातवा क्रमांक आहे.

महाराष्ट्र राज्याचे प्रति-व्यक्ती उत्पन्न इतर राज्यांच्या तुलनेत जास्त असले तरी दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण ३१% भारतापेक्षा जास्त आहे. तसेच महाराष्ट्राच्या नागरी व ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेचे प्रतिशत हे भारतीय पातळीवरील नागरी व ग्रामीण भागापेक्षाही जास्त आहे. हे प्रमाण जास्त असण्याचे कारण म्हणजे रोजगार उपलब्धतेचे प्रमाण कमी आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगारनिर्मिती, स्वच्छ पिण्याचे पाणी अशी सामाजिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढली असली तरी समाजातील सर्व स्तरावर सर्वांगिण विकास सर्व समावेशक विकास होईल अशी गुंतवणूक दिसून येत नाही. प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी समाजातील विविध घटकांना समान संधी उपलब्ध नाही हे देखील वास्तव आहे.

**महाराष्ट्राची प्रादेशिक तुलना :**

महाराष्ट्रामध्ये प्रशासकीयदृष्ट्या सहा महसूल विभाग आहेत. कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर. सहा महसूल विभागमिळून ३४ जिल्हे आहेत. प्रत्येक विभागाचे प्रश्न वेगवेगळे असतात. म्हणून मानव विकास अहवाल राज्य पातळीवर तयार केले जातात. त्यामुळे विविध विभागांमध्ये जिल्हा, तालुका आणि त्यापुढेही जाऊन गावपातळीवरील विकासाच्या योजना अभ्यासता येतात. नागरी लोकसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य भारतात दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथील ४३ प्रतिशत लोक महानगरे आणि शहरात राहतात. स्थलांतरणाचा प्रश्न ऐरणीवर आहे. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल ही आणखी चिंतेची बाब आहे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि कोकण या चार विभागांची स्वत:ची अशी भिन्न संस्कृती आहे. तसेच आजपर्यंत ज्यावर मात करू शकलो नाही अशी अस्तित्वात असलेली भिन्न आर्थिक परिस्थिती आहे. गेल्या काही दशकात या विभागांतील अनुशेष निश्चित करून, तो दूर करण्यासाठी कसोशीने प्रयत्न झाले आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये दरडोई उत्पन्नासारख्या संख्यात्मक निकषासोबत शिक्षण, आरोग्य यासारख्या

गुणात्मक निकषाचा विचार केला आहे. त्यामुळे प्रादेशिक असंतुलनाचे मापन करण्यासाठी जिल्हा मानव विकास निर्देशांकाचा उपयोग केला आहे. महाराष्ट्रामध्ये विभागवार जी असमानता आहे तिची गंभीरता मानव विकास निर्देशांकाचा संख्यात्मक व गुणात्मक विचार केल्यावर स्पष्ट होते. मुंबईचा मानव विकास निर्देशांक सर्वात जास्त (१.००) आहे. विदर्भामध्ये सर्वात कमी अर्थात गडचिरोली जिल्ह्याचा (०.२१०) आहे तर यवतमाळ जिल्ह्याचा (०.२२) आहे. विदर्भामध्ये फक्त नागपूर जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक (०.७८) सर्वात जास्त आहे. मानव विकास निर्देशांकात जिल्हानिहाय मोठ्या प्रमाणावर तफावत आढळून येते. विदर्भामधील नागपूर वगळता एकही जिल्हा उच्च मानव विकास गटात नाही. महाराष्ट्राच्या सरासरी मानव विकास निर्देशांकापेक्षा नाशिक, अमरावती, औरंगाबाद व नागपूर विभागाचा मानव विकास निर्देशांक कमी आहे. फक्त कोकण व पूणे विभागाचाच जास्त आहे. यावरून आरोग्य व पोषण या घटकांच्या संदर्भात प्रादेशिक असंतुलनाच्या स्थितीचे विवेचन पुढील भागामध्ये केले आहे.

**मानव विकास निर्देशांकाद्वारा प्रादेशिक असमतोलाचे अध्ययन – संदर्भ आरोग्य व पोषण :**

आर्थिक विकासाच्या क्षेत्रात महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. औद्योगिकीकरणामध्ये महाराष्ट्र राज्य प्रगतीवर आहे. परंतु आर्थिक विकास हा कोणत्या क्षेत्रात व कोणत्या विभागात झाला आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मानव विकास निर्देशांक बघितल्यास खरी समस्या ही संपत्ती वाटपाची आहे. संपत्तीच्या असमान वाटपामुळे मोठ्या प्रमाणावर विषमता निर्माण झाली आहे. ही विषमता प्रतिव्यक्ती उत्पन्न, शिक्षण, आरोग्य व पोषण याबाबतही निदर्शनास येते. त्याचा थोडक्यात येथे परामर्ष घेत आहे.

महाराष्ट्र राज्याचा मानव निर्देशांक बघितल्यास सर्वात जास्त मुंबई, पुणे व कोकण विभागाचा आहे. हे विभाग सर्वच बाबतीत विकसित व पुढे आहे. महाराष्ट्रामध्ये प्रतिव्यक्ती उत्पन्न ३५,०३३ रू. असून महाराष्ट्राच्या तुलनेने मुंबई ५८,८१८ रू., पुणे ५०,१५८ रू. , ठाणे ५०,४०८ रू. तर विदर्भातील नागपूर जिल्ह्याचे ३७,९९५ रू. आहे. याउलट वाशिम जिल्ह्याचे १४,८८५ रू., अमरावती २१,८०३ रू., बुलढाणा १९,४८७ रू. आहे तर मराठवाडामध्ये नांदेड, नंदुरबार, उस्मानाबाद येथील प्रतिव्यक्ती उत्पन्न रू. १७,८४७ ते १९,१५६ रू. दरम्यान आहे. विभागनिहाय प्रतिव्यक्ती उत्पन्नातील विषमता ही आरोग्य व शिक्षणावर परिणाम करते.

सामान्यत: प्रतिव्यक्ती उत्पन्नाच्या संदर्भात ग्रामीण व नागरी भागातील महाराष्ट्रातील गरीबीचे सहअस्तित्व दिसून येते. भारतातील ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण ३३.६० प्रतिशत आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात हे प्रमाण २९.५ प्रतिशत आहे. तर शहरी भागामध्ये १८.३ प्रतिशत आहे. महाराष्ट्रामध्ये गरीबीचे सरासरी प्रमाण २४.५ प्रतिशत आहे. उपभोग खर्चामध्ये विषमता आहे. ग्रामीण भागापेक्षा नागरी भागामध्ये संपत्तीचे वाटप जास्त आहे. कोकण व पुणे विभागात सर्वात जास्त संपत्तीचे वाटप आहे. उत्पन्न व दारिद्र्याचा संबंध हा आरोग्याशी जुळतो व आरोग्यविषयक सुविधांवर विभागनिहाय होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणाशी जुळतो. महाराष्ट्राचा मानव विकास अहवालावरून आरोग्यविषयक

सुविधांवर होणारे खर्चाचे प्रमाण विषमता दर्शविणारे आहे.

महाराष्ट्रामध्ये उत्पन्न व उपलब्ध वैद्यकीय सुविधांच्या तुलनेत काही विभागांमध्ये आरोग्य सेवा फार कमी प्रमाणात असल्याचे अहवालामध्ये निदर्शनास येते. मानव विकास अहवालात आरोग्य व पोषण हा महत्त्वपूर्ण घटक आहे. व्यक्तीचे किंवा समाजाचे आरोग्य कसे आहे हे निश्चित करण्यासाठी अपेक्षित आयुमर्यादा, बालमृत्यू दर आणि पोषण दर्जा हे महत्त्वाचे निकष वापरले जातात. आरोग्य सेवा सहज आणि किफायतशीर दरात उपलब्ध आहे किंवा नाही, यावर ही सर्वसामान्य लोकांच्या आरोग्याचा दर्जा अवलंबून असतो.

अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये आरोग्यासंबंधी सात घटकांना महत्त्व दिले आहे. उपरोक्त घटकांव्यतिरिक्त पिण्याचे स्वच्छ पाणी, सार्वजनिक स्वच्छता, मल:निस्सारण व्यवस्थेला महत्व आहे. चांगले आरोग्य दारिद्र्यामध्ये घट करते असे 'रॅग्नर नर्क्स' यांनी स्पष्ट केले आहे. अपेक्षित आयुर्मयादा आणि बालमृत्यूदरातील घट या दोन क्षेत्रात महाराष्ट्राची कामगिरी चांगली असली तरी उत्पन्न चांगले असूनही पोषणदर्जा मात्र चांगला नाही. राज्यातील ५० प्रतिशत कुटुंबातील पोषण दर्जा आवश्यक पातळीच्या खाली आहे. ९० प्रतिशत लोकांना रोजच्या आहारातून २७०० उष्मांकापेक्षा कमी उष्मांक मिळतात. गरीबांचा राहणीमानाचा दर्जा कमी असल्यामुळे आरोग्य दर्जा खालावलेला असतो. वजन, वय आणि उंची या प्रमाणांवरून पोषण दर्जा ठरविल्या जातो.

महाराष्ट्रामध्ये आरोग्य व पोषण या घटकांमधील विषमतेचा विचार केल्यास मानव विकास अहवालावरून असे निर्देशनास येते की ग्रामीण भागातील स्त्री पुरूषांची अपेक्षित आयुमर्यादा ही शहरी भागातील स्त्री पुरूषांपेक्षा कमी आहे. सरासरी आयुर्मान ६७.२ वर्षे असून ग्रामीण भागामध्ये ती ६४.२ वर्षे म्हणजे सरासरी पेक्षा कमी तर शहरी भागांमध्ये ७१ वर्षे म्हणजे सरासरीपेक्षा जास्त आहे. बालकांचा जन्मदर दरहजारी २१.८ आहे. ग्रामीण भागामध्ये हा दर (१७.३) शहरी भागांपेक्षा (१५.८) जास्त आहे. आंतरजिल्हानिहाय बरीच तफावत आहे. जन्मदरांप्रमाणे बालमृत्यूदर २००१ मध्ये दर हजारी ७.१ प्रतिशत होता तो २०११ पर्यंत ६.३ पर्यंत कमी झाला. राष्ट्रीय बालमृत्यूदरापेक्षा तो (७.१) कमी असला तरी ग्रामीण भागांमध्ये ७.३ इतका आहे. तर नागरी भागामध्ये ५.३ आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये तो सर्वात कमी (४.९) असून गडचिरोली, गोंदिया, वर्धा, सातारा, सिंदूदुर्ग जिल्ह्यात तो ८ पेक्षा जास्त आहे. यावरून बालमृत्यूदरातील विषमता स्पष्ट होते.

वरील सर्व विषमतेला कारणीभूत घटक म्हणजे महिलांना प्रसुतीपूर्व सेवा व प्रसूती दरम्यान वैद्यकीय सेवांचा अभाव, कुपोषण, याचाच अर्थ ग्रामीण भागांमध्ये शहरी भागांच्या तुलनेत अपुऱ्या असणाऱ्या आरोग्यविषयक सुविधांमुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

**महाराष्ट्र राज्याचा आरोग्य व पोषणावरील व्यय:**

भारतामध्ये आरोग्य सुविधा केंद्र चालविण्याची जबाबदारी राज्याकडे दिलेली आहे. सार्वजनिक प्राथमिक आरोग्य सेवा पुरविण्याची जबाबदारी ही राज्यसरकारची आहे. योजना खर्च व योजनेतर एकूण खर्चाचे प्रमाण हे २००६-०७ मध्ये ९२ प्रतिशत होते ते २०११-१२ पर्यंत ९८ प्रतिशत पर्यंत वाढले. मात्र महाराष्ट्र राज्यामध्ये वृद्धीदराचा फक्त

०.६ प्रतिशत खर्च हा आरोग्य व कुटूंब कल्याणावर आहे. तर केरळमध्ये हा खर्च ०.८ प्रतिशत आहे. अंदाजपत्रकातील राज्याची तरतूद ही आरोग्य व कुटुंब कल्याणावर ३.७ प्रतिशत म्हणजे एकूण उद्दिष्टाच्या ७ ते ८ प्रतिशत पेक्षा कितीतरी कमी आहे. एकूण प्रतिव्यक्ती उत्पन्नातील रू. ३५१ महाराष्ट्रामध्ये आरोग्यावर खर्च करतात. ग्रामीण भागामध्ये प्रतिव्यक्ती आरोग्यावर होणारा खर्च हा १५ जिल्ह्यामध्ये राज्याच्या सरासरी खर्चापेक्षा कमी आहे. विदर्भामध्ये नागपूर जिल्ह्यामध्ये प्रतिव्यक्ती ४३० रू. खर्च वगळता इतर सर्व जिल्ह्यांमध्ये ३५१ रू. पेक्षा कमी आहे. बुलढाणा जिल्ह्यामध्ये १४७ रू. तर वाशिम जिल्ह्यामध्ये १४५ रू. खर्च होते. यवतमाळ जिल्ह्यामध्ये १५९ रू. इतका कमी आहे म्हणजेच उत्पन्नातील विषमतेमुळे आरोग्यावर होणाऱ्या प्रतिव्यक्ती खर्चातील विषमता वाढत जाते. २००१ च्या तुलनेत ही सरासरी प्रतिव्यक्ती उत्पन्नानुसार आरोग्यावरील खर्चातील विषमता वाढत गेली हे अहवालावरून स्पष्ट होते.

**महाराष्ट्रातील आरोग्य विषयक सेवा व सुविधांची उपलब्धता :**

महाराष्ट्र राज्यामध्ये १९८० पासून किमान आवश्यकता कार्यक्रमांतर्गत रूग्णालये सुरू करण्यात आली. २०१२ पर्यंत सार्वजनिक व खाजगी रूग्णालयांच्या संख्येमध्ये वाढ झाली. त्यामध्ये सरकारी आरोग्य सेवांसोबत, खाजगी क्षेत्रानेही आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण संस्था व रूग्णालये सुरू केली. वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात खाजगी संस्थांचा शिरकाव म्हणजे या क्षेत्राचे व्यापारीकरण झाले आहे. नागरी भागांमध्ये खाजगी क्षेत्रातील डॉक्टर्स, दवाखाने यांचे केंद्रीकरण झाले आहे. सरकारी आरोग्य सेवांची नागरीभागातील संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. मोठी सार्वजनिक रूग्णालये मोठ्या शहरात, नगरांमध्ये आणि तालुक्याच्या ठिकाणी आहेत. महाराष्ट्रातील ४२.४ प्रतिशत लोकसंख्या शहरात राहते. तरीही रूग्णालयासाठी एकूण उपलब्ध जागांपैकी ८० प्रतिशत जागा शहरात एकवटल्या आहेत. खाजगी दवाखान्यांचीही तीच गत आहे.

आरोग्य विषयक सेवा व सुविधा दुसरा महत्त्वाचा आदान विषयक निदर्शक आहे. लोकसंख्येचा प्रमाणात आरोग्यविषयक सेवांची प्रभावी अंमलबजावणी, भौतिक सुविधा, श्रमशक्ती यांची जुळवणी केली जाते. राज्यामध्ये सर्वत्र पायाभूत सुविधा म्हणून तृतीय श्रेणीची आरोग्य सुविधा पुरविणारे प्राथमिक आरोग्य केंद्रे उभारली आहेत. ज्यामध्ये सामाजिक आरोग्य सेवा केंद्र (CHC), प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र (PHC & RH), जिल्हा रूग्णालये (DHS), उपजिल्हा रूग्णालये (SDHS) इ. सुविधा ग्रामीण, शहरी, नगरांमध्ये उपलब्ध आहे. याशिवाय खाजगी सुश्रुषागृहे आणि अशासकीय संघटना देखील महाराष्ट्र राज्यामध्ये आरोग्यविषयक सुविधा पुरविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांमध्ये आदिवासी बहुल भागांमध्ये १० प्रतिशत लोकसंख्या अस्तित्वात आहे. कुपोषणाची समस्या आहे. या भागांमध्ये ३००० लोकसंख्येमागे १ उपकेंद्र तर नागरी भागांमध्ये ५००० लोकसंख्येमागे एका उपकेंद्राची स्थापना केली जाते. सरासरी लोकसंख्येमागे १ सहकेंद्राची स्थापना केली आहे, सहकेंद्रामधील विषमता शहरी व ग्रामीण भागांसाठी स्पष्ट होते.

महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण १४ मेडिकल कॉलेजेस, सुपर स्पेशालिटी दवाखाने ०२, जिल्हा रूग्णालये २३ असून स्त्रियांकरिता ९ आहे. RHS व

SDHS ४४६, प्राथमिक आरोग्य सेवाकेंद्र १७२ आहेत. मोबाईल हेल्थ युनीट ६१, उपकेंद्र १०५८० आहे. लोकसंख्येच्या तुलनेत सेवासुविधांचा वापर वाढत आहे. सातत्याने १,००,००० लोकसंख्येच्या प्रमाणात रूग्णालये व खाटांची संख्या वाढत आहे. परंतु ग्रामीण भागांपेक्षा २० पट जास्त रूग्णालये व खाटांची संख्या नागरी भागांमध्ये आहे. विभागनिहाय, जिल्हानिहाय ही विषमता निदर्शनास येते. प्रती उपकेंद्र आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामागे असणारी विभाग निहाय लोकसंख्या पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता : प्रती आरोग्य सेवांमागील लोकसंख्या (२०१०-११)**

| अ.क्र. | विभाग | प्रती उपकेंद्रमागे लोकसंख्या | प्रती प्राथ.आरोग्य केंद्रामागे लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १. | कोकण | ४,९५३ | २९,६३१ |
| २. | पश्चिम महाराष्ट्र | ६,७०० | ३७,५७५ |
| ३. | उत्तर महाराष्ट्र | ६,३६५ | ३५,५७६ |
| ४. | मराठवाडा | ७,१४४ | ४०,२१० |
| ५. | विदर्भ | ५,३६९ | ३४,०१८ |

वरील तक्त्यामध्ये विभागनिहाय आरोग्यविषयक सेवांची विषमता निदर्शनास येते, कोकण व विदर्भामध्ये अनुक्रमे ४९५३ आणि ५३६९ लोकसंख्येमागे एक उपकेंद्र आहे तर मराठवाड्यात मात्र ७१४४ लोकसंख्येमागे एक उपकेंद्र आहे. कोकण विभागात २९६३१ लोकसंख्येमागे एक प्राथमिक केंद्र असून मराठवाड्यात मात्र ४०२१० लोकसंख्येमागे एक प्राथमिक केंद्र आहे. थोडक्यात कोकणात लोकसंख्येच्या आधारावर आरोग्य सेवांची सर्वाधिक अनुकुलता असून मराठवाड्यात मात्र प्रतिकूलता आढळते.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्रामध्ये समव्यायी विकासाची प्रक्रिया सर्व क्षेत्रात व विभागात निदर्शनास येत नाही त्याचप्रमाणे आरोग्य व पोषण यामध्ये ती दिसून येत नाही. विकास निर्देशांकाद्वारे विभागनिहाय ही विषमता स्पष्ट करता येते.

* महाराष्ट्रातील आर्थिक विकासाच्या प्रमाणात आरोग्य क्षेत्राची प्रगती झाली नाही. आरोग्य क्षेत्रामध्ये संख्यात्मक वाढ झाली. परंतू गावपातळीवर, लोकसंख्येच्या प्रमाणात गुणात्मक वाढ नाही. ही प्रगती कमी आहे. सुधारणा करणे गरजेचे आहे.
* प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्राची लोकसंख्येच्या प्रमाणात प्रगती कमी आहे. अद्ययावत सुविधा उपलब्ध नाही. त्या उपलब्ध करून दिल्या पाहिजे.
* मानव विकास अहवालामध्ये हे स्पष्ट आहे की, नागरी भागांमध्ये सार्वजनिक आरोग्य सुविधांचा वापर करण्याचे प्रमाण कमी होत आहे. ही चिंतनीय बाब आहे. याउलट खाजगी क्षेत्रातील आरोग्य सुविधांचा वापर महाराष्ट्र राज्यामध्ये वाढत आहे.असे असले तरी आजही अत्यल्प उत्पन्नाच्या वर्गाला सार्वजनिक रूग्णालय,प्राथमिक केंद्रामध्ये जावे लागते. ग्रामीण भागात विशिष्ट समाजातील अल्पसंख्याक वर्ग अशा सुविधा केंद्राकडे वळतात.परंतु अनेक प्राथमिक केंद्रामध्ये

प्राथमिक उपचाराचे साहित्य उपलब्ध नसते. तेव्हा गावपातळीवर ही दक्षता घेतली पाहिजे.उपचाराचे साहित्य उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

- महाराष्ट्राच्या मानव विकास अहवालामध्ये एकूण निर्देशकांचा विचार केल्यास प्रत्येक घटकांची आखणी करतांना मूलभूत उपाय व आधुनिक उपाय यांच्यामध्ये विसंगती आहे. त्यावरून असमानतेचे चित्रण केले आहे.
- मल:निस्सारण, स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या अभावामुळे संसर्गजन्य रोग होतात, स्थलांतरणामुळे नागरी भागांमध्ये या समस्या वाढत आहे. याचा परिणाम सार्वजनिक आरोग्यावर होतो. तेव्हा 'ग्रामीण विकास' ही संकल्पना राबविल्यास स्थलांतरणाला आळा घालता येईल.
- आज असंतुलनाचा अभ्यास करीत असतांना केळकर समितीने जिल्हास्तरावर अनुशेषाचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. परंतु अनुशेष भरून काढण्याचा निकष हा विभागनिहाय असावा, गावपातळीवर किंवा तालुकापातळीवर, जिल्हापातळीवर अनुशेष निर्धारित करणे शक्य नाही. विदर्भाकडे त्यादृष्टीने लक्ष द्यावे. प्रादेशिक असंतुलनाच्या अभ्यासामधून विदर्भाला दुर्लक्षिले आहे हे स्पष्ट होत आहे. परंतु राज्यकर्ते जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यातून 'स्वतंत्र विदर्भ राज्याची' मागणी निर्माण होत आहे.
- आरोग्य विषयक सेवांचे होणारे परिणाम हे दिर्घकालीन असायला पाहिजे. अनेक ठिकाणी तात्पुरती व्यवस्था देखील अपूर्ण असते. विशेषत: ग्रामीण भागांमध्ये वैद्यकीय अधिकारी इतर कर्मचारी वर्ग अपूरा असतो. तेव्हा शासकीय स्तरावर प्रयत्न केले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) जहागिरदार दि.व्यं.(२०१२) : महाराष्ट्र ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा, सेंटर फॉर एकोनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती.

२) जहागिरदार दि.व्यं. (२००५): आर्थिक जगत, खंड १, सेंटर फॉर एकोनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती.

३) जहागिरदार मुक्ता (२००९) : आर्थिक चिकित्सा, सेंटर फॉर एकोनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज,अमरावती.

४) जगदीश भगवती व पंगारिया (२०११): Poverty & Inequality, Oxford Press.

५) Sen Amartya (1981) : Poverty and femines, Oxford Press.

६) कुरूलकर र.पु. (१९९७): महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, श्री विद्या प्रकाशन.

७) Govt. of Maharashtra (2002) : Human Development Report, Maharashtra.

८) Govt. of Maharashtra (2012) : Human Development Report, Maharashtra.

९) Govt. of India (2011) : Economic Survey

१०) महाराष्ट्र शासन (२०११) : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी

११) कुरूलकर र.पु.(१९९८): महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोल : समस्या आणि उपाय, अध्यक्षीय भाषण बावीसाव्या मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अधिवेशन'.

१२) जहागिरदार दि.व्यं. (२०१४) : महाराष्ट्र मानव विकास अहवाल,२०१२.दै.हिन्दुस्थान,दि.२९ जुलै

१३) खांदेवाले श्रीनिवास(२०१४): महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल:स्वरूप व आव्हाने, द्विदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र, श्री शिवाजी महा., अम.


◆◆◆

# महाराष्ट्रातील पिण्याचे पाणी, स्वच्छता व आरोग्य : संदर्भ अमरावती जिल्हा

**गजानन गं.भारती**
सहाय्यक प्राध्यापक,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

**प्रस्तावना :**

जल हे जीवन या विधानावरून पृथ्वी वरील सजीवसृष्टीची उत्पत्ती ही पाण्यामुळेच अस्तित्वात आली आहे. हे सत्य कधीच नाकारता येत नाही. पृथ्वीच्या एकूण भूभागांपैकी सुमारे २९ प्रतिशत भाग भूमीत तर ७१ प्रतिशत भाग पाण्याने व्यापलेला आहे. यालाच जलावरण असे म्हणतात. पाण्याने व्यापलेल्या या विशाल क्षेत्रफळामुळे पृथ्वीस 'जलग्रह' किंवा 'वसुंधरा' असेही म्हणतात. पृथ्वीवर मुबलक पाणी उपलब्ध असून सुद्धा वर्षातील आक्टोबर ते जुलैपर्यंत मानव समाजाला पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. अलीकडील काळात हा प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. त्यातही नागरी भागापेक्षा ग्रामीण भागात ही समस्या अधिक रौद्ररूप धारण करीत आहे.

भारतात नियोजन काळात केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था, आपआपल्या स्तरावरून व विविध उपक्रमाद्वारे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवित आहेत. पण त्याला अपेक्षित यश येत नाही असेच दिसते. पाणी हे सजीवसृष्टी बरोबरच मानवाला आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी निसर्गाने दिलेली अनमोल अशी विनामूल्य भेट होय. पण मनुष्य जेव्हा हीच गोष्ट विसरतो तेव्हा त्याला त्याचे गंभीर परिणामही भोगावे लागतात. महाराष्ट्राचा विचार करता अलीकडील काळात दुष्काळ सातत्याने पडत असल्याचा दिसून येतो. तर अधून मधून अतिवृष्टी होतांना दिसते. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३.०८ लक्ष चौ.कि.मी. असून जनगणना २०११ नुसार महाराष्ट्रात ११ कोटी लोकसंख्या वास्तव्यास आहे. क्षेत्रफळ व लोकसंख्येबाबत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले असून जवळजवळ ४५ प्रतिशत लोकसंख्या नागरीभागात व ५५ प्रतिशत लोकसंख्या अजूनही ग्रामीण भागात वास्तव्यास आहे.

मानवी जीवनामध्ये आरोग्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. मानवी आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ पिण्यायोग्य पाणी, पुरेसा पोषक आहार, आणि स्वच्छता त्यादृष्टीने सोयी सुविधा उपलब्ध असणे प्रत्येक कुटुंबाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. यासाठी नियोजन असणे क्रमप्राप्त ठरते. महाराष्ट्र शासनाने विविध योजना व कार्यक्रम हाती घेऊन त्या अंतर्गत येणाऱ्या समस्यांना मुळापासून उखडून टाकण्यासाठी व आवश्यक मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ११ व्या नियोजन आयोगातील शिफारशीचा पुनश्च: विचार केला गेला.

ग्रामीण स्त्रिया आणि मुलींना असह्य

असणाऱ्या स्वच्छतेच्या बाह्य संकटातून मुक्त करण्यासाठी तसेच स्वच्छते बरोबर कायम शुद्ध पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करून देण्यासाठी, शाश्वत पर्यावरणासाठी प्राधान्याने पुढाकार घेण्याची गरज प्रतिपादित केली. ज्यामध्ये ग्रामीण आरोग्याच्या दृष्टीने एकात्मिक गरजा पूर्ण करणारा कार्यक्रम राबविण्याचे ठरले. ह्या सर्व सोयी सुविधा त्यांच्या जीवनात प्रत्यक्ष उतरविण्यासाठी ग्रामीण आरोग्य व शिक्षणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुधारणा करण्याची गरज आहे. ज्यामुळे त्यांच्या जीवनात येणाऱ्या समस्या व अडचणी ते सहज सोडवू शकतील अशी व्यवस्था निर्माण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. आरोग्य आणि स्वच्छतेच्या दृष्टीने सुधारणा करण्यासाठी घरबांधणी कार्यक्रमात एकत्रित सोयी सुविधा नियोजनाला मान्यता देणे, घरांमध्ये स्वतंत्र स्वयंपाक घर, पुरेसा प्रकाश व हवा खेळती रहावी म्हणून व्हेंटीलेशन, मोकळी जागा, यांची काळजी घेणे, तसेच स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पुरेसे पाणी, स्वच्छता गृह, सांडपाणी वाहून नेणारे पाईप, नालीकरण, नाशवंत अन्नाची विल्हेवाट यासर्व बाबींची व्यवस्था, सुविधा, विद्युत, इंधन, अशा विविध दैनंदिन गरजा व सोयी सुविधा बरोबरच प्रदूषण मुक्त वातावरण निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले.

**अमरावती जिल्हा पिण्याच्या पाण्याची सद्य:स्थिती :**

जिल्ह्याचे मुख्य ठिकाण अमरावती असून, क्षेत्रफळ १२,२१२ चौ.कि.मी. आहे. २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २८,८७,८२६ आहे. अमरावती जिल्ह्यात १४ तालुके असून लोकसंख्येची घनता २३६ प्रति चौरस कि.मी. आहे तर महाराष्ट्राची लोकसंख्येची घनता ३६५ प्रति चौरस कि.मी. आहे.

विहीरी हे अमरावती जिल्ह्यातील पाणी पुरठ्याचे एक मुख्य साधन आहे. अमरावती जवळ वडाळी, छत्रीतलाव असून सिंभोरा, मालखेड, शेकदरी व साखळी खानापूर येथे धरणे आहेत. जिल्ह्यातील दर्यापूर व भातकुली येथे खारपट जमीन असल्याने तेथे खारे (क्षारयुक्त) पाणी आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई सर्वत्र भासते आहे. म्हणून काही नद्यावर पाणी पुरवठा योजना तयार करण्यात आल्या आहेत.

अप्पर वर्धा योजनेतून अमरावती शहराला पाणी पुरवठा केला जातो. अमरावती जिल्ह्यात नागरी व ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायत अशी रचना कार्यरत आहे. अमरावती व बडनेरा शहराच्या सध्याच्या ६,७६,२४५ लोकसंख्येला दरडोई दरदिवशी १३५ लिटर या प्रमाणे ९१ एम.एल.डी.पाणी पूरवठा करण्यात येतो. सन १९८३ पासून अमरावती पाणी पुरवठा केंद्राची देखभाल व दुरूस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येते. या योजनेस अप्पर वर्धा धरण स्त्रोत असून धरणाची क्षमता ७८६.४८ द.ल.घ.मी. आहे. त्याकरिता सन २०१६ पर्यंत करारनामा करण्यात आलेला आहे.

**तक्ता क्र. १**

**अमरावती जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (२०१०-११)**

| अ.क्र. | तालुका | वस्ती असलेली गावाची संख्या | पिण्याच्या पाणी पुरवठ्याची सुविधा असलेली गावे | टंचाईग्रस्त गावांची संख्या | नळाद्वारे पाणी पुरवठा होत असलेल्या गावांची संख्या | टंचाईवर केलेली उपाययोजना टँकर/इतर साधने | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | गाव | साधने |
| १. | धारणी | १५२ | १२२ | ३० | ५३ | ०३ | इतर-३ |
| २. | चिखलदरा | १६८ | ९७ | ७१ | ४५ | १२ +२ | ६-टँकर इतर-२ |
| ३. | अंजनगांव सुर्जी | १०५ | १०२ | ०३ | १०२ | ०२ | इतर-२ |
| ४ | अचलपूर | १४९ | १२८ | २१ | २८ | ०९ | इतर-९ |
| ५. | चांदूरबाजार | १४८ | १३२ | १६ | २२ | ०९ | इतर-१० |
| ६ | मोर्शी | ११३ | ११० | ०३ | ५८ | ०४ | इतर-४ |
| ७. | वरूड | १२० | ८८ | ३२ | ६५ | १० | इतर-१२ |
| ८. | तिवसा | ७५ | ४६ | २९ | ३६ | ०२ ०७ | १ टँकर इतर-९ |
| ९. | अमरावती | १११ | ६० | ५१ | ४२ | ०९ | इतर-१० |
| १०. | भातकुली | ११० | १०४ | ०६ | ७७ | - | - |
| ११. | दर्यापूर | १३४ | १३० | ०४ | १३० | - | - |
| १२. | नांदगांव खं. | १३१ | ९४ | ३७ | ६२ | ०२ | इर-०२ |
| १३. | चांदूर रेल्वे | ८२ | ६१ | २१ | ४० | ०२ | इतर-२ |
| १४. | धामणगांव रेल्वे | ८४ | ५९ | २५ | ३९ | ०१ | इतर-१ |
| १५ | एकूण | १६८२ | १३३३ | ३४९ | ७९९ | ७४ | ७३ |
| | एकूण गावांशी % | (१००) | (७९.२५) | (२०.५) | (४७.५०) | (४.४०) | (४.३४) |

वरील तक्त्यानुसार अमरावती जिल्ह्यात एकूण १४ तालुके असून वस्ती असलेल्या गावांची संख्या १६८२ (१०० प्रतिशत) आहे. यापैकी बारामहिने पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध असलेल्या गावांची संख्या १३३३ (७९.२५ प्रतिशत) आहे. यापैकी नळाद्वारे पिण्याचे पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या गावांची संख्या ७९९ (४७.५० प्रतिशत) आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाईग्रस्त गावांची संख्या ३४९ (२०.७५ प्रतिशत) आहे. यामध्ये अति टंचाईग्रस्त गावांची संख्या १४ असून त्यांना पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरची संख्या ७ आहे. इतर साधनांनी पुरवठा होणाऱ्या गावांची संख्या ६० असून, इतर साधनांची संख्या ६६ आहे.

**तालुका निहाय टंचाईग्रस्त गावांची संख्या :**

अमरावती जिल्ह्यातील सर्वाधिक टंचाईग्रस्त असलेली गावे तालुकानिहाय १) चिखलदरा-७१, २) अमरावती-५१, ३) नांदगांव खंडेश्वर-३७, ४) वरूड-३२, ५) धारणी-३०, ६) तिवसा-२९, कमी संख्येने टंचाईग्रस्त असलेली तालुकानिहाय गावे १) धामणगांव रेल्वे-२५, २) चांदूर रेल्वे-२१, ३) अचलपूर-२१, ४) चांदूरबाजार-१६,

५) भातकुली-६, ६) दर्यापूर-४, ७) मोर्शी -३, ८) अंजनगांवसुर्जी - ३ अशा प्रकारची आहे.

तसेच अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांना वैयक्तिक नळजोडणी करून दिलेल्या लाभार्थींची संख्या व आलेल्या शासकीय खर्चा संबंधीची माहिती पुढील प्रमाणे आहे. भातकुली तालुक्या अंतर्गत ५१२ लाभार्थ्यांना नळ जोडणीसाठी रू. ७५.७ लाख खर्च आला तर धामणगांव रेल्वे तालुक्यातर्गत १५० लाभार्थ्यांना नळ जोडणी साठी २२.४१ लक्ष रू. खर्च आला. अंजनगांव सुर्जी तालुक्या अंतर्गत ४६९ लाभार्थींना नळजोडणी साठी ७६.७ लक्ष रू. खर्च आला, अचलपूर तालुक्यांतर्गत ६७ लाभार्थींना नळ जोडणी साठी ११.८ लक्ष रू. खर्च आला, चांदूरबाजार तालुक्यांतर्गत २७७ लाभार्थीला नळ जोडणीसाठी ३६.७८ लक्ष रू. खर्च आला तर मोर्शी तालुक्यांतर्गत २१ लाभार्थींना २.३३ लक्ष रू. खर्च आला. (स्त्रोत : ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, अमरावती)

अमरावती जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावाच्या संख्येत पुर्वीच्या तुलनेत वाढ होत आहे. ही वाढ थांबवून त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी शासकीय योजनेबरोबरच लोकसहभागाची नितांत गरज आहे. पिण्याच्या पाण्याचे नियोजन, संवर्धन, काटकसर, भूजलाच्या अतिउपसाला पायबंद, गैरवापरावर नियंत्रण, पावसाच्या पाण्याचे नियोजन, संग्रहण, बांधबंधारे करून जीरवण, असे अनेकांगी उपाय योजून टंचाईपासून जिल्ह्याची सुटका करणे शक्य होऊ शकते. त्यासाठी या उपायांच्या कार्यक्षम अंमलबजावणीची व जनजागृतीची फारच गरज आहे.

**महाराष्ट्रात ग्रामीण नागरी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व स्त्रोत:**

महाराष्ट्राच्या ग्रामीण क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पाहता २००१ च्या जनगणनेनुसार वस्ती असलेली गावे ४१०९५ व वस्ती नसलेली गावे २६१६ होती. ती वाढून २०११ मध्ये एकत्रित ४३,६६३ आहेत. महाराष्ट्रात शहरांची संख्या २००१ ला ३७८ होती. २०११ ला ती वाढून ५३५ झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात ११.२३ कोटी लोकसंख्या असून ५.८३ कोटी पुरूष असून ५.४० कोटी स्त्रिया आहेत. राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी ६.१५ कोटी जनता ग्रामीण भागात राहते आणि ५.०८ कोटी जनता नागरी भागात राहत आहे. राज्यात लोकसंख्येची घनता ३६५ प्रति चौ.कि.मी. असून दर हजारी पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९२५ आहे. तर साक्षरता प्रमाण ८२.९ प्रतिशत आहे.

राज्यातील अनेक भागात दरवर्षी पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण होत असते. गेल्या अनेक वर्षापासून राज्याचा या टंचाई निवारणासाठी विविध योजना अंतर्गत खर्च वाढत आहे. कधी दुष्काळ, कधी अवर्षण, कधी महापूर, कधी अतिवृष्टी त्यामुळे पिण्यायोग्य पाण्याची कमतरता, जलप्रदूषण, भूजलपातळीत होत असलेली घट, जल व्यवस्थापन व नियोजनाच्या कार्यक्षमतेचा अभाव, पुरेसा स्त्रोत व संवर्धनातील अडचणीमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक बिकट होत चालला आहे. महाराष्ट्रात औद्योगिकीकरण, नागरीकरण, लोकसंख्यावाढ, बांधकाम या क्षेत्राकडून पाण्याला प्रचंड मागणी होत आहे. म्हणून शासनास बारमाही पुरेल असे शाश्वत व नियमित शुद्ध पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी लागते

आणि त्या अंतर्गत येणारा खर्च ही प्रचंड असल्याचा दिसून येतो. २०१२–१३ मध्ये तर मराठवाड्यात भीषण पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली. पावसाने दगा दिल्याने ही समस्या निर्माण झालेली आहे. तसेच प्रांताच्या अन्य ग्रामीण भागातही पिण्याच्या पाण्याची स्थिती गंभीर आहे.

महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या मानकानुसार शहरी भागासाठी दरडोई दर दिवशी १३५ लिटर पाणी पुरेसे आहे तर ग्रामीण भागासाठी दरडोई दर दिवशी ४० लिटर पाणी पुरेसे आहे असे ठरविले गेले. महाराष्ट्राची भू–शास्त्रीय रचना जलसंधारणास पोषक नाही तसेच राज्यातील पिकरचना ही भूजलाच्या उपशाला प्रमाणाबाहेर चालना देते. राज्यात भूजल व भूपृष्ठीत पाण्याचे व्यवस्थापन करणारी कोणतीही ठोस योजना अस्तित्वात नाही. साहजिकच उन्हाळ्यात राज्यातील अधिकतर जिल्ह्यात पाणी टंचाई तीव्ररूप धारण करते.

पर्यावरणातील असमतोल, झपाट्याने वाढणारी लोकसंख्या पिण्याच्या पाण्याचा शाश्वत पुरवठा करण्यातील अनेकविध आव्हाने पाहता स्वच्छ पेयजलाची उपलब्धता व पुरवठा हा चिंतेचा विषय बनला आहे. मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर, पाण्यावरून पेटलेले दंगे, पाणी वाटपावरून राज्यांराज्यातील भांडणे, आणि शहरी व ग्रामीण उपभोक्त्यामधील रस्सीखेच यावरून ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या तीव्र तुटवड्याची कल्पना येते. पिण्याच्या पाण्याचा उल्लेख राज्यसूची अंतर्गत येत असला तरी १९७० च्या दशकाच्या सुरुवातीपासून गतिमान ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविला जातो. तथापि यामुळे पाणी पुरवठा करणे ही फक्त शासनाची जबाबदारी आहे अशी लोकांची समजूत झाली. या प्रश्नाचे राजकीय महत्त्व पाहता काही राज्यामध्ये पाणी पुरवठ्यावरील वाढत्या खर्चानुसार पाण्यावरील शुल्क वाढविणे टाळले गेले व अधिकतर उपभोक्त्यांना मोफत पाणी पुरवठा होऊ लागला. वास्तविक ८०–९० प्रतिशत पिण्याच्या पाण्याची मागणी निव्वळ भूजलाद्वारे पूर्ण केली जाते. या परिस्थितीचेही अध्ययन करण्याची गरज आहे.

राज्यात मान्सूनचा सर्वाधिक पाऊस सह्याद्री पर्वत रांगांच्या माथ्यावर पडतो. प्रतिवर्षी सरासरी ६००० मि.मि. तर हेच प्रमाण सह्याद्रीच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेतील प्रदेशात ५०० मि.मि. एवढे आहे. तर राज्याच्या पूर्वेकडील मराठवाडा व विदर्भ विभागासाठी हे प्रमाण १०००–१६०० मि.मि. च्या दरम्यान आहे. पावसाचे प्रमाण दरवर्षी बदलत असल्याने राज्याला अधूनमधून अवर्षणाला सामोरे जावे लागते. राज्यात एकूण लहानमोठ्या ४०० नद्या असून त्यांची एकूण लांबी २०,००० कि.मी. भरते. नदी खोऱ्यानुसार राज्याची कृष्णाखोरे, गोदावरी खोरे, तापी खोरे, नर्मदा खोरे व कोकणातील नद्याची खोरे अशा ५ प्रमुख विभागात विभागणी करता येते. ही खोरी अजून २५ उपखोऱ्यात विभागली जातात. यापैकी प्रत्येक खोऱ्यातील पाण्याची सरासरी वार्षिक उपलब्धता पुढील प्रमाणे आहे. राज्याला या स्त्रोतातून एकूण १,६३,८२० घ.मि.मि. भूपृष्ठीत पाणीसाठा उपलब्ध होत असला तरी आंतरराज्य पाणी वाटप करारानुसार राज्याला १,२६,३८७ घ.मि.मि. पाणी वापरासाठी मिळते.

'पाणी म्हणजे जीवन' या उक्तीप्रमाणेच मानवी जीवनात पाण्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यामुळेच स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि आरोग्य यांचा अतिशय घनिष्ट संबंध आहे. हा


सहसंबंध बिघडला तर त्याचे दूरगामी परिणाम मानवी समाजाला भोगावे लागतात म्हणून शुद्ध व पुरेशा पिण्याच्या पाण्याची एकाच ठिकाणी उपलब्धता व्हावी या दृष्टीने तसा स्त्रोत निर्माण करणे आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची साधने पुरविणे, पाण्याचे मानवी जीवनातील महत्त्व सर्वांना पटविणे, जनजागृती करणे, त्या अंतर्गत तळागळापर्यंत नळाद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, या अंतर्गत महाराष्ट्रात (२०११) नुसार जवळपास २/३ (६७.९) प्रतिशत कुटुंबांना नळाद्वारे पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध केली जाते. तर १४.४ प्रतिशत कुटुंबांना विहीरीद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होते. ९.९ प्रतिशत कुटुंबांना हात पंपाद्वारे ५.७ प्रतिशत बोअर वेलद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होते.

महाराष्ट्रात नागरीभागात नळाद्वारे पिण्याचे पाणी प्राप्त करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ८९.१ प्रतिशत आहे. मात्र ग्रामीण कुटुंबांना नळाद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याचे प्रमाण शहरी भागाच्या तुलनेत निम्मेच आहे. तसेच नागरी भागात नळाव्यतिरिक्त पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत म्हणून हातपंप व बोअरवेलचा वापर होतो. त्याचे प्रमाण ६.६ प्रतिशत आहे. ग्रामीण भागात नळाव्यतिरिक्त पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्त्रोत म्हणून विंधन विहिरीचा वापर अधिक होतो. त्यानंतर हातपंप व बोअरवेलचा नंबर लागतो.

महाराष्ट्रात विविध जिल्ह्यामध्ये कुटुंबांना नळाद्वारे पाणी पुरवठ्याच्या सुविधेमध्ये भिन्नता आढळून येते. ज्यामध्ये मुंबई व तिचे उपनगरात नळाद्वारे पिण्याच्या पाणी पुरवठ्याचे प्रमाण उच्चस्तरीय असल्याचे स्पष्ट होते. हे प्रमाण (९७.८ प्रतिशत) मुंबईत, तर ९६.५ प्रतिशत मुंबई उपनगरात आहे. तर जळगांव, कोल्हापूर, पुणे, धुळे, ठाणे या ठिकाणी हेच प्रमाण ८० प्रतिशत आहे. परंतु अगदी शेवटच्या गोंदिया, गडचिरोली व सिंदुदुर्ग जिल्ह्यात नळाद्वारे शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबत बरेच मागे आहे मागासलेले आहेत असे स्पष्ट होते. सिंदुर्ग मध्ये पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्त्रोत विहीरीच असल्याचे स्पष्ट होते. नळाद्वारे पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यात सुधारणा झालेल्या जिल्ह्यामध्ये रायगड, वर्धा, रत्नागिरी येथे ही वाढ गेल्या दहा वर्षाच्या काळात कुटुंबाच्या १० प्रतिशतने झाली आहे.

**आलेख १**

**कुटुंबांना पिण्याचे पाणी उपलब्ध होणाऱ्या स्त्रोताचे घरापासून अंतर**



भारत व महाराष्ट्राची तुलना केली असता मागील १० वर्षाच्या काळात कुटुंबांना घरात किंवा आसपासच्या स्त्रोताद्वारे किंवा नळाद्वारे पिण्याच्या पाणी पुरवठ्यात वाढ झालेली आहे. भारतात ही वाढ ७.६ प्रतिशत तर महाराष्ट्रात ६ प्रतिशत आहे.

ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कुटुंबांना जवळ म्हणजे घरांपासून ५०० मिटरच्या आत, तर शहरी भागात सर्वसाधारण जवळ म्हणजे १०० मीटरच्या आसपास, ग्रामीण भागात दूर म्हणजे ५०० मीटर पेक्षा अधिक अंतर, शहरी भागात दूर म्हणजे १०० मीटरपेक्षा अधिक अंतर मानले जाते. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत घराजवळच असावे कारण स्त्रियांना व मुलांना ते सोयीचे व महत्त्वाचे असते. त्याबाबत महाराष्ट्रात २०११ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार ५९.४ प्रतिशत कुटुंबांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता घराच्या जवळपास असल्याचे आढळून आले. ही वाढ २००१ च्या ५३.४ प्रतिशत पेक्षा अधिक आहे. शहरी भागातील कुटुंबांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा लाभ प्राप्त होणाऱ्याचे प्रमाण ७९.३ प्रतिशत आहे. तर ग्रामीण भागातील कुटुंबांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा लाभ प्राप्त होण्याचे प्रमाण ४२.९ प्रतिशत आहे. म्हणजेच आजही ग्रामीण भाग शहरी भागाच्या मानाने मागासलेला आहे. ग्रामीण भागात १०० मीटरच्या आतील स्रोतापासून पिण्याचे पाणी आणणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण केवळ ५.२ प्रतिशत आहे. तर ५०० मीटर किंवा त्यापेक्षा अधिक अंतरावरून पाणी आणणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १९.६ प्रतिशत आहे. तसेच महाराष्ट्रात जिल्हास्तरीय अभ्यासावरून असे निष्कर्ष पुढे आले आहेत की, ३५ पैकी ९ जिल्ह्यात जवळपास पाणी उपलब्ध होणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४० प्रतिशत पेक्षा कमी आहे. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत सर्वसाधारण सुविधा असलेल्या गोंदिया व गडचिरोली जिल्ह्याच्या तुलनेत वाशिम व यवतमाळ हे जिल्हे अधिक पुढारलेले आहेत.

विविध सामाजिक गटाच्या अध्ययनावरून अनुसूचित जातींतील कुटुंबांना आसपास पिण्याच्या पाण्याचे स्रोत उपलब्ध असण्याचे प्रमाण २००१ मध्ये ४४ प्रतिशत होते ते वाढून २०११ मध्ये ५४.८ प्रतिशत झाले. याच कालावधीत या सोयी सुविधेचा क्वचितच लाभ अनुसुचित जमातीच्या कुटुंबांना झालेला आहे. ते प्रमाण ३२ प्रतिशत वरून ३३.९ प्रतिशत वर गेलेले आहे.

राष्ट्रीय नमुना पाहणी अहवाल २०१० नुसार भारतात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणारी साधने ज्यांच्या आवाक्याबाहेर आहेत अशा मागासवर्गीय कुटुंबाचे प्रमाण एकूण कुटुंबापैकी ग्रामीण भागात २५ प्रतिशत आहे. तर शहरी एकूण कुटुंबांपैकी अशा कुटुंबाचे प्रमाण १२ प्रतिशत आहे. या बाबत महाराष्ट्रातील शहरी भागात जवळपास ७० प्रतिशत कुटुंबे असे आहेत की ज्यांचे स्वत:च्या मालकीचे पिण्याच्या पाण्याची साधने नाहीत किंवा अपुरे साधने आहेत. तसेच ग्रामीण भागात खालच्या स्तरातील ६० प्रतिशत कुटुंबे असे आहेत की ज्यांना पिण्याच्या पाण्याची स्वत:ची साधने नाहीत किंवा त्यापासून ते वंचित आहेत. या सोयी सुविधेच्या अभावामुळे प्रभावित झालेले मुख्य वर्ग म्हणजे अनुसूचित जाती व इतरमागास वर्गातील कुटुंबे आहेत. यावरून महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचे स्वरूप किती गंभीर आहे हे स्पष्ट होते.

महाराष्ट्रात २००८-०९ च्या अहवालानुसार आपल्या अधिकारातील पिण्याच्या पाण्याच्या

साधनाचा ग्रामीण भागात ७ लाख व शहरी भागात १.५ लाख कुटुबांनी वापर केलेला आहे. हे प्रमाण ग्रामीण भागात ५६.९ प्रतिशत आणि शहरी भागात ६.७ प्रतिशत होते. शहरी व ग्रामीण भागात गरीब कुटुंबाच्या तुलनेत निवडक अशा श्रीमंत वर्गालाच पिण्याच्या पाण्याच्या साधनांचा अधिक लाभ झाला. गरीब कुटुबांना मात्र गंभीर टंचाईचा सामना करावा लागतो. त्यामध्ये सुधारणेला भरपूर वाव आहे.

उच्च प्रतिच्या पिण्याच्या पाण्याच्या सोयी सुविधा ग्रामीण भागातील इतर मागासवर्गातील कुटुंबाच्या तुलनेत शहरी भागातील निवडक कुटुंबांनाच मिळतात. त्याचे प्रमाण ग्रामीण ३९ प्रतिशत असून शहरी प्रमाण ६२.५ प्रतिशत होते तसेच अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईतून मुक्त करण्यासाठी शहरी ७५ प्रतिशत व ग्रामीण ४२ प्रतिशत वाटा ठरवून देण्यात आला. अशा पद्धतीने महाराष्ट्रात एकंदर पिण्याच्या पाण्याची व इतर मुलभूत सोयी सुविधेची परिस्थिती पाहता यामध्ये वेगाने सुधारणा करण्याच्या दृष्टीने अनेकविध मार्गाने शासन प्रयत्नशिल असून धोरणात्मक उपाय करीत आहे. यामध्ये परिपूर्ण यश केव्हा मिळेल हे काळच ठरविल.

**मानवी आरोग्य व कल्याण :**

मानवी विकास निर्देशांक अहवालाच्या निकषानुसार आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक असे दूषित पाणी, स्वच्छतेचा अभाव, प्रदूषण निर्माण करणारे वातावरण, लोकसंख्येतील वाढ, प्रदूषके, औद्योगिक प्रदूषण, अपूऱ्या सुखसोयी, प्रामुख्याने कुटुंबाला व समाजाला घातक ठरत आहे.

मानवी अनारोग्य विशेषत: बालमृत्यूला कारणीभूत ठरत आहे त्यामुळे समाजाचे हित तर दूरच उलट अकल्याण होत आहे. म्हणून बालमृत्यू आणि मातामृत्यू दरात घट करण्याच्या दृष्टीने व अर्भक आयुर्मान वाढविण्याच्या दृष्टीने विविध व आवश्यक सोयी सुविधा तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे ध्येय सरकारी धोरणातून दिसून येते पण त्याला अपेक्षित यश मिळले नाही. कारण अघा(२०००) व नायर (१९९७) यांच्या सर्वेनुसार मातामृत्यू व बालमृत्यू दराचे प्रमाण विशेषता आदिवासी बहुल भागात सर्वाधिक आहे त्यात आजपर्यंत शासकीय यंत्रणेला अपेक्षित यश प्राप्त करता आले नाही. म्हणून व्यक्ती अथवा कुटुंबाला मिळणाऱ्या सुखसोयी, त्यांच्याकडे असलेली जमीन, घर व मालमत्तेचे स्वामीत्व याचे ही प्रमाण दिवसागणिक कमी-कमी होत आहे. एकूणच लोकसंख्या वाढीचा हा परिणाम आहे.

**तक्ता क्र.२**

**संपत्ती पंचक(Quintiles) चे आधारावर बालमृत्यूदर : महाराष्ट्र**

| अ.क्र. | पंचक | अर्भक | नवजात | शीशू | बालक | ५ वर्षा आतील |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | न्यूनत्तम | २४ | ७१.६ | ९५.६ | २३.५ | ११६.८ |
| २. | द्वितीय | ४.६ | ३२.६ | ३७.१ | ६.३ | ४३.१ |
| ३. | मध्यम | १०.९ | ४१.३ | ५२.३ | ६.२ | ५८.१ |
| ४. | चौथे | ९.७ | २६.७ | ३६.४ | ५.६ | ४१.८ |
| ५. | सर्वात वरचे | ४.५ | २२.९ | २७.४ | ६.४ | ३३.६ |

(स्त्रोत : IIPS and Macro International -2008)

उपलब्ध संपत्ती देशनांकाद्वारे घरातील सोई आणि संपत्तीवरील मालकी यांच्या अध्ययनावरून संपत्ती पंचकाच्या सर्वात न्यूनत्तम पंचकातील (Quintile) कुटुंबास बालमृत्यू दर कमी असतो. न्यूनत्तम पंचकातील अर्भक, नवजात, शीशू व बालक इत्यादींमध्ये मृत्यूदर जास्त असल्याचे तक्ता क्र. २ वरून स्पष्ट झाले आहे. तसेच सर्वात वरच्या पंचकातील कुटुंबात नवजाताचा मृत्यूदर केवळ २२.९, अर्भकाचा ४.५, शीशूचा २७.४ तर बालकाचा ६.४ आहे. यावरून हे दिसेल की वरच्या पंचकांसाठी कुटुंबातील हे सर्व प्रकारचे मृत्यूदर कमी-कमी होत गेले आहेत. तसेच ५ वर्षाखालील बालकाच्या संदर्भात मृत्यूदर हा पंचकातील सर्वात खालच्या पातळीवरील कुटुंबात सर्वात जास्त आहे.

एका संशोधन अहवालानुसार विविध शहरामध्ये बालमृत्यूचे प्रमाण भिन्न-भिन्न असल्याचे व ज्यामध्ये गलिच्छ नसलेल्या वस्त्यांच्या मानाने गलिच्छ वस्त्यातील अर्भक व बालमृत्यूचे प्रमाण उच्चपातळीवर असल्याचे आढळून आले. त्यातच या बालकांमध्ये दोष म्हणजे उंची नुसार किंवा वयानुसार वजन नसणे, पोषक आहाराची कमतरता असणे ह्या गंभीर बाबी समोर आल्या. अशी शहरे चेन्नई, दिल्ली, मिरत, इंदोर व नागपूर होत कारण येथील गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या लोकांमध्ये आरोग्य, राहणीमान व स्वच्छतेचा अभाव हेच कारण असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मलेरिया, न्युमोनिया, अतिसार, यासारखे आजार बालमृत्यूस कारणीभूत ठरतात म्हणून अशा वस्त्यांमध्ये आवश्यक त्या सर्वसोयी सुविधा पुरविणे नितांत गरजेचे आहे. त्या अंतर्गत शासनाने (गलीच्छ वस्तीतील) कमीत कमी १०० लक्ष लोकांना २०२० पर्यंत आरोग्याच्या सोयी पुरविण्याचे उद्दिष्ट निश्चित केले.

**नागरीकरण व गलिच्छ वस्तीतील लोकसंख्येतील वाढ :**

मानवी समाजाच्या विकासात व गतिमान नागरीकरणांतर्गत विविध सोयी सुविधा व सुखसोयी शिवाय इतर कोणते महत्त्वाचे घटक आहेत त्याचा शोध घेणे व त्याची गरज पूर्ती करणे महत्त्वाचे आहे. ज्यामुळे तिथे वाढत्या लोकसंख्येच्या अपप्रवृत्ती चालना मिळून गुन्हेगारीला वाव मिळणार नाही.

भारतात परंपरेनुसार रोजगार किंवा उत्पन्न मिळविण्यासाठी ग्रामीण जनतेचे शहरीभागात स्थलांतर होत आहे ज्याचा परिणाम म्हणून नागरी गलिच्छ वस्तीत भर पडत आहे. तज्ञ समितीच्या अहवालानुसार समाजातील दारिद्र्य रेषेखालील वाढती लोकसंख्या देशाच्या एकात्मतेला घातक ठरू शकते म्हणून वेळीच प्रभावी पाऊले उचलण्याची नितांत गरज आहे अशी शिफारस केली गेली. दारिद्र्य रेषेखालील समाजात विशेषे करून सामाजिक उपभोगातील वैयक्तिक उपभोगाची माहिती मिळविणे कठीण आहे. त्या परिस्थितीवर मात करून या समाजासाठी मुलभूत सोयी सुविधा जसे शिक्षण, आरोग्य, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, योग्य वातावरण या अटींची पूर्तता व रूपरेषा आखून त्याची प्रभावी अंमलबजावणीची गरज आहे.

अलीकडे भारतात ग्रामीण दारिद्र्याच्या तुलनेत नागरी दारिद्र्याचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते. २०११ च्या माहितीनुसार अलीकडील १० वर्षाच्या काळात महाराष्ट्रात दारिद्र्य रेषे खालील कुटुंबाच्या संख्येत वाढ होतांना दिसते. हे प्रमाण २००१ मध्ये ८ लक्ष होते ते वाढून २०११ मध्ये २५.६ लक्षावर गेले ही वाढ ग्रामीण भागात २५.६ प्रतिशत

तर शहरीभागत ३७.७ प्रतिशत होती. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या मते २००८-०९ मध्ये भारतात गलिच्छ वस्त्यांची संख्या ४८,९९४ होती. महाराष्ट्रातील घोषित व अघोषित गलिच्छ वस्तीचे प्रमाण भारताच्या जवळपास ३५ प्रतिशत आहे. तसेच या पाहणीनुसार महाराष्ट्रात गलिच्छ वस्तीच्या संख्या २००२ मध्ये १६,६६२ होती. ती २००८-०९ मध्ये १७,०१९ पर्यंत वाढली.

**महाराष्ट्र व भारतातील गलिच्छ वस्तीतील लोकसंख्या अनुमान :**

महाराष्ट्रात २०११ मध्ये गलिच्छ वस्तीतील लोकसंख्या १८.१५ लक्ष होती ती वाढून २०१७ पर्यंत २०.५६ लक्षाच्या घरात जाण्याची संभावना आहे. तर भारतात २०११ ला गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या लोकांची संख्या ९३.६ लक्ष होती ती वाढून २०१७ मध्ये १०४.६७ लक्षावर जाण्याची संभावना आहे म्हणजे दिवसेंदिवस गलिच्छ लोकसंख्येत वाढ होतांना दिसून येते. तिला पायबंद करण्याच्या दुष्टीने धोरणात्मक उपायांची नितांत गरज आहे.

**संदर्भ :**


१) अहवाल : मानवी विकास निर्देशांक अहवाल (महाराष्ट्र) २०१२
२) Government of India 2011.
३) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०११-१२) : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन.
४) IIPS and Macro International-2008.
५) राष्ट्रीय नमुना पाहणी : २००८-०९
६) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०११-१२, २०१२-१३) अमरावती


◆◆◆

# महाराष्ट्राचा मानव विकास : समानता आणि समावेशनाची व्युहनीती

**प्रशांत हरमकर**
सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती.

**प्रस्तावना :**

आर्थिक प्रगती घडून येत असतांना सर्व समावेशकता घडून येणे अधिक कठीण असते. याचे कारण सर्वसमावेशकता ही बहुआयामी संकल्पना आहे. सर्वसमावेशक वृद्धीचा परिणाम दारिद्र्यातील घटीवर दिसतो. अर्थात ही घट कमी असते. आरोग्य, मुलांचा शाळांमधील प्रवेश, उच्चशिक्षणामधील प्रवेश, शिक्षणाचा दर्जा, कौशल्य विकास इत्यादीमध्ये आधारभूत व महत्त्वपूर्ण सुधारणा घडून येतात. त्याचे प्रतिबिंब म्हणजे अधिक चांगल्या संधी निर्माण होतात. वेतन, रोजगार आणि जीविकेमध्ये सुधारणा होते. पाणी, वीज, रस्ते, निवास आणि स्वच्छता इत्यादी मुलभूत गरजांमध्ये सुधारणा होते. विशेषत: या सर्व गरजा वंचित आणि न्युन उत्पन्न गटातील लोकसंख्येच्या पूर्ण होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर स्त्रीया, मुले आणि समुह यात सुद्धा सर्वसमावेशकता घडवून आणायची आहे. याकरिता अर्थव्यवस्थेत बहुविधरित्या हस्तक्षेप करण्याची गरज आहे. नविन धोरणे व शासनाच्या कार्यक्रमावरच मानव विकासाचे यश अवलंबून नाही तर यश प्राप्तीकरिता संस्थात्मक आणि विकासाच्या दृष्टीकोनात बदल होण्याची गरज काळ सुसंगत आहे.

**महाराष्ट्राचा मानव विकास- दृष्टीक्षेप :**

राज्याचा मानव विकास अहवाल २०१२ हा महाराष्ट्राच्या मानव विकासाची प्रगती आणि सर्वसमावेशक वृद्धीच्या विस्तारावर भर देणारा आहे. अहवालामध्ये मानव विकासाची मांडणी करतांना पाच घटकाचा उपयोग करून विवेचन केले आहे. मानव विकासामध्ये वर्गीय विषमता दिसून येते. वर्गीय विषमता धर्म, सामाजिक गट, उत्पन्न गट, जिल्हे, लिंग आणि विशेषत: नागरी आणि ग्रामीण क्षेत्रामध्ये आढळून येते. लोकांना गरजा भागविण्यासाठी किती सुविधा प्राप्त झाल्या या आधारे समावेशनाचे विश्लेषण करता येते. मानव विकासाची संकल्पना तिरकस छेदाची (cross-cutting) आहे. अहवालामध्ये आर्थिक प्रगतीवर प्रकाश टाकत असतांना प्रगती कशी घडून आली याबाबतचे स्पष्टीकरण करतांनाच प्रगती कशी घडून यायला पाहिजे यावर विशेषत: भर दिलेला आहे. प्रगती घडून येतांना निरनिराळ्या पातळ्यांवर अंतर निर्माण झालेले आहे. यामध्ये पूल (bridge) बांधण्याची, उणीवा भरून काढायची आवश्यकता असल्याचे अहवालात म्हटले आहे. याकरिता अहवालाने धोरणात्मक सुसूत्रीकरणाचा सल्ला दिलेला आहे. मानव विकासाशी संबंधित सर्व वादप्रश्नांची प्रकरणांच्या स्वरूपात मांडणी केलेली आहे.

मानव विकास धोरणाचे सुसूत्रीकरण करण्यासाठी मुलभूत (key) तत्त्व धोरणामध्ये अंतर्भूत घेणे आवश्यक आहे. क्षेत्र आणि वर्गवारीनुसार गरजा या भिन्न आहेत. याला संबोधित करून धोरणात्मक दिशा देण्याची गरज आहे. राज्याला केवळ दिशा न देता विस्तृत उपयुक्त दिशा देण्याची आवश्यकता आहे. शिवाय मानव विकासाशी संबंधित वादप्रश्न सुक्ष्म व्यवस्थापनाशी निगडीत आहे. हे बदल संस्थात्मक चौकटीअंतर्गत घडवून आणायचे आहेत. वादप्रश्नाची सोडवणूक करण्याकरिता अंदाजपत्रकीय संसाधनाची आवश्यकता आहे. याबाबतचा समझोता विश्वसनीय असणे आणि प्रभावीपणे संबोधित करणे गरजेचे आहे. या मुलभूत तत्त्वाच्या आधारावर विस्तृत धोरणात्मक दिशा दिल्या जाऊ शकते. धोरणाची अंमलबजावणी करतांना क्षेत्रनिहाय शिफारशी लागू करणे आवश्यक आहे. याकरिता धोरणात्मक आकृतीबंधाचे तीन प्रकार केले आहे. यामुळे मानव विकास धोरणाचे वर्गीकरण करता येते. मानव संसाधनाचा सहभाग वाढण्याकरिता केवळ धोरणात्मक उपाय करण्याची गरज नाही तर मानव संसाधनाला उपयुक्त व्यवसाय मिळण्याची आवश्यकता आहे. त्याला जोडून त्यांना मिळणाऱ्या सुविधांमध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. याकरिता विशिष्ट कृती नियोजन (Action Plan) असण्याची आवश्यकता आहे. मर्यादित भौगोलिक क्षेत्रात, मर्यादित कालावधीमध्ये धोरणात्मक कार्यक्रमावर भर देण्याची आवश्यकता आहे.

**मानव विकास धोरणाची आवश्यकता :**

मानव विकास निर्देशांक हा गतिशील विकासाचा निर्देशांक आहे. त्यानुसार जिल्हा पातळीवर मानव विकास निर्देशांकामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. यासाठी शासनाला काळजीपूर्वक हस्तक्षेप करावा लागणार आहे. याचबरोबर न्युनत्तम मानव विकास निर्देशांक जिल्हे यांची ओळख पटण्याची आवश्यकता आहे. गरज लक्षात घेऊन व त्यांचे मुल्यमापन करून त्यानंतर विशेष कार्यक्रम पद्धती (Mission Mode) लागू होऊ शकते.

मानव विकास निर्देशांकाचा पहिला वादप्रश्न असा आहे की, उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी जिल्हाअंतर्गत क्षमताची कसून तपासणी करावी लागणार आहे. जिल्हा उत्पन्न निर्मिती क्षमताशी संबधित धोरणाची अंमलबजावणी केली तर मानव विकास निर्देशांकामध्ये वाढ होऊ शकते. त्यांना प्राप्त झालेल्या कामाची चौकशी करणे, माहिती होणे आवश्यक आहे. कारण वैयक्तिक पातळीवर मिळालेला रोजगार लाभदायक आहे का? अन्न व पोषणामध्ये सर्वांचा प्रवेश झाला का? कष्टकरी वर्गाचा, त्यांच्या संपूर्ण कुटूंबाचा शिक्षण आणि आरोग्य सुविधामध्ये सहभाग वाढला का? याकडे लक्ष देणे महत्त्वाचे असते. या अनुषंगाने रोजगार संधीची निर्मिती करावी लागते. केवळ आर्थिक कल्याणाचा विचार करून चालत नाही तर त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे मानव शक्तता (capabilities) वाढविण्यावर जोर द्यावा लागतो. राष्ट्रीय ग्रामीण जिविका कार्यक्रम (The National Rural livlihood Mission - NRLM) चांगल्या संधी निर्माण करून धोरणात्मक दिशा देण्याचा प्रयत्न करीत आहे. यामध्ये धोरणात्मक कार्यक्रमाच्या दुसऱ्या बाजूला जास्त महत्त्व द्यावे लागणार आहे. कारण त्याची भूमिका महत्त्वाची आहे. जिल्हा पातळीवर व्यावसायिक कौशल्याचा विकास करणे व त्याचे मूल्यमापन राष्ट्रीय ग्रामीण जिविका कार्यक्रमाद्वारे करणे आणि हा कार्यक्रम पुढे नेण्यासाठी

राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळ (National Skill Development Corporation) याची मदत होणे गरजेचे आहे. स्थानिक पातळीवरील घटकांचा विचार करून रोजगार संधी निर्माण करणे आवश्यक नाही का? याकरिता शक्ततावर भर द्यावा लागणार आहे. शक्ततावर भर देतांना सामुहिक क्षमता (synergies) विकसित करण्याची गरज आहे. यातून रोजगार निर्मिती झाली तर कौशल्याची घडण होते. सर्वसमावेशक वृद्धीचे उद्दिष्ट गाठण्याकरिता सुविधा मिळणे अपेक्षित असते.

**नागरी आणि ग्रामीण क्षेत्र :**

उपभोग वंचनाच्या अटीअंतर्गत महाराष्ट्रामध्ये ग्रामीण द्रारिद्र्य आहे. याचा संबंध भारताच्या वैशिष्ट्याशी जुळलेला आहे. याकडे लक्ष देण्याची गरज आहे. खेड्याच्या जोडणी (connectivity) मध्ये सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता आहे. ग्रामीण आणि नागरी क्षेत्रातील तफावत कमी करण्याची गरज आहे. उत्पन्न निर्मितीच्या क्षमता विकसित करतांना जेथे तफावत निर्माण झालेली आहे तेथे पुलाची जोडणी करून अंतर भरून काढायचे आहे. महाराष्ट्राच्या नागरी दारिद्र्याचे अधिक चांगले विश्लेषण एन.एस.एस.च्या संमकावरून करता येते. महाराष्ट्राचे नागरी क्षेत्र म्हणजे उच्च वृद्धी केंद्र आणि दारिद्र्यातील लोकांना उत्पन्न मिळून देण्याची संधी आहे. मात्र त्याच बरोबर नागरी भागात विस्तारलेले दारिद्र्य आहे. आरोग्य, शिक्षण, निवास, पाणी आणि स्वच्छता नागरी दारिद्र्यातील लोकांना पुरवणे गरजेचे आहे. दारिद्र्य निर्मुलन हे लक्ष असतांना भरीव शासकीय हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. प्रत्यक्ष रोख हस्तांतरण आरोग्य आणि शिक्षणाच्या खर्चाकरिता होणे आवश्यक असल्याचे अहवालात नमुद केले आहे. नागरी दारिद्र्याची संपूर्ण समस्या ग्रामीण दारिद्र्याच्या उग्रपणातून शहरांकडे विस्तारलेले आहे. म्हणून राज्यामध्ये परिणामकारक आरोग्य सुरक्षा आणि शिक्षण सेवांची तरतुद होणे आवश्यक आहे. जिल्हाच्या पातळीवर दारिद्र्य अणि सामाजिक आर्थिक मागासलेपणाचे मूल्यमापन करता येते. याबाबी लक्षात घेऊन धोरणाद्वारे बदल घडवून आणायची अत्यावश्यकता आहे.

राज्याच्या नागरी आणि ग्रामीण क्षेत्राला लोकसंख्येच्या आधारावर आरोग्य आणि शिक्षणाच्या सोईचा तुटवडा अजुनही टिकून आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधा व शिक्षणाचे भौगोलिक वितरण याची महत्त्वाची भूमिका मानव विकासामध्ये आहे. लोकसंख्येची गरज लक्षात घेऊन आरोग्य सुरक्षा व शिक्षण सुविधांना समानपणे संबोधित केले तर जिल्हामधील ग्रामीण आणि नागरी क्षेत्रातील असमानता कमी होण्यास मदत होईल. विशेषत्वाने सांगायचे झाले तर शिक्षण आणि आरोग्य सेवांची उपलब्धता, त्याची संरचना, प्रभावी सेवा व निष्पत्तीवर अवलंबून राहील. महाराष्ट्राच्या बाबतीत असे दिसून येते की, जिल्हामध्ये संसाधनाच्या वितरणाचा आधार एकमेव पुरवठा बाजूशी संबधित आहे. संसाधनाचे वितरण समानतेच्या आधारावर होणे आवश्यक आहे. मुलभूत सुविधाची मागणी गरजांवर अवलंबून आहे. म्हणून राज्याने आरोग्याचे निकष निश्चित केले पाहिजे. तात्काळ पाऊले उचलून याबाबतचा प्रादेशिक असमतोल दूर केला पाहिजे. आंतर-जिल्हा समानता घडवून आणता आली पाहिजे. त्यासाठी आरोग्य सेवाची तरतुद होणे आवश्यक आहे. महत्त्वाचा धोरणात्मक उपाय म्हणजे संसाधनाच्या वितरणाचा आधार अस्तित्वातील मागणी पुरवठ्यातील

तफावतीचा निकष असावा. आधिक्याने संसाधनाचे आंवटन त्याच प्रदेशात करावे जेथे दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. यानुसार जिल्हा नियोजन समितीच्या क्षमतेची बांधणी करावी. याकरिता सामाजिक सेवा क्षेत्रातील तफावती लक्षात घ्याव्या.

**आदिवासी क्षेत्र आणि स्त्रीयाची स्थिती :**

प्रदेशांच्या दरम्यान साक्षरतेमध्ये असमानता अस्तित्वात आहे. ग्रामीण-नागरी क्षेत्रात तफावत असतांनाच ग्रामण स्त्रीयांच्या कमी साक्षरतेचे प्रमाण लक्ष वेधून घेणारे आहेत. साक्षरतेच्या अटी अंतर्गत अनुसूचीत जमाती प्रवर्गातील स्त्रीयांच्या साक्षरतेच्या प्रमाणात फारच तफावत आहे. न्युनतम पातळीचा साक्षरता दर अनुसूचीत जमाती प्रर्वगातील स्त्रीयाचा आहे. याकरिता लिंग संवेदन समावेशन साक्षरतेमध्ये असण्याची गरज आहे. राज्याने यावर आधारित केंद्रवर्ती शिक्षणाचे धोरण राबवावे. साक्षरता दर वाढविण्यासाठी विशेष कार्यक्रम १३ गटांमध्ये राबवावा. विशेषत: साक्षरता संपादित करण्यासाठी जालना आणि नंदुरबार जिल्हांवर लक्ष केंद्रित करावे असे अहवालात नमुद केले आहे. विशेषत: अनुसूचीत जमातींच्या (S.T.) प्रर्वगातील स्त्रीयांवर लक्ष केंद्रीत करण्याची गरज अहवालात अधोरेखित केली आहे. आदिवासी बहुल भागात शिक्षणासाठीचा अंदाजपत्रकीय खर्च आदिवासी सहाय्यक नियोजन (Trible sub-plan) अंतर्गत होणे गरजेचे आहे. आदिवासी सहाय्यक नियोजनामध्ये शिक्षणाला प्राथमिकता देतांना शिक्षणासंबंधीचा सर्व खर्च आदिवासी बहुल भागामध्येच होणे आवश्यक आहे. विशेष कार्यक्रम राबवितांना मुलींचा शिक्षणातील सहभाग वाढविणे आवश्यक आहे. पुणे आणि नाशिक विभागातील मुलीचे शाळेत येण्याचे प्रमाण वाढले पाहिजे. याकरिता प्रयत्न होणे आवश्यक आहे. राज्यातील १३५ गटा अंतर्गत (block) स्त्रीयांच्या शिक्षणामध्ये नामांकनाचे (enrolment) प्रमाण राज्य सरासरीपेक्षा कमी आहे. म्हणून आश्रमशाळा, अंगणवाडी या संस्थांवर अधिक भर देण्याची आवश्यकता आहे. या संस्थांचा अधिक उपयोग करू शकलो तर आदिवासींचा बहुअंगानी विकास करणे शक्य होईल. आदिवासींचा विकास घडून येण्याकरिता आर्थिक-सामाजिक विकास घडवून आणणारे शिक्षण खेड्यापाड्यापर्यंत पोहचले पाहिजे. सुक्ष्म व्यवस्थापन कार्यक्रम राबवून एकूण उपस्थिती दर सुधारला पाहिजे यावर जोर द्यावा लागणार आहे. पुरूषांचा सहभाग असणारे कार्यक्रम व व्यूहरचना विकसित करावी लागणार आहे. गंभीर परिणामांना तोंड द्यावे लागण्याकरिता अशा प्रकारचे बदल घडवून आणावे लागणार आहे. त्याप्रकारची यंत्रणा विकसित करावी लागणार आहे. अस्तित्वातील प्रस्तुत करणारी व्यवस्था मुलींच्या आरोग्य, शिक्षण आणि रोजगारामध्ये प्रवेश वाढण्यास मदत करणारी असावी. म्हणून समस्यांचे निवारण करणारी व्युहरचना असणे आवश्यक आहे. एस.टी. आणि एस.सी प्रवर्गा मध्ये कुमारवयीन विवाह आणि जलद गर्भधारणा सारख्या समस्या आधिक्याने आहे. म्हणून परिस्थितीचे मापन करणे आणि त्यामधील भेद तपासण्याची आवश्यकता आहे. याबाबत सुद्धा सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन नियोजन व प्रत्यक्ष कृती विकसित करावी लागणार आहे.

**शिक्षण विषयक तरतूदी :**

आदिवासी मुलांची प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये अधिकाधिक नोंदणी व उपस्थिती वाढण्याची गरज आहे. शाळेतील न्युनतम

पातळीचा उपस्थिती दर आणि जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक लक्षात घेऊन त्यानुसार धोरणाची समन्वय साधावा लागणार आहे.

शाळेतील मुलांच्या उपस्थितीकडे पाहत असतांना समग्र पातळीवर मुलांच्या एकूण सापेक्ष प्रमाणात लिंगाच्या आधारावर शाळेतील गळतीचे प्रमाण शोधणे महत्त्वाचे आहे. क्षेत्रीय पातळीवर विचार केला तर ग्रामीण भागामध्ये शाळेतील गळतीचे प्रमाण अधिक आहे. शाळेतील गळतीचे प्रमाण रोखण्याकरिता मुलांच्या शिक्षणाचे क्षेत्र, आर्थिक, सामाजिक, लोकसंख्याशास्त्रीय आणि सांस्कृतिक कारके यांचा विचार करून धोरणात्मक समन्वय करावा लागणार आहे. कारण हिच कारके वंचितापर्यंत पोहचण्यासाठी अडचणी निर्माण करतात.त्याचबरोबर धोरणाची परिणामकारकता नष्ट करणारे घटक म्हणजे निवासस्थान, स्थलांतरण आणि सर्वेक्षणामध्ये आदिवासीबाबत संपूर्ण सांख्यिकीय माहिती उपलब्ध न होणे यास जबाबदार असल्याच अहवालाने म्हटले आहे.

शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षणाची गुणवत्ता वार्षिक अहवाल (Annual Status of Education Report 2006-10) च्या नुसार राज्यामध्ये शाळेत जाणाऱ्या मुलांची संपादन व कौशल्यही न्युनत्तम पातळी आहे. त्याचा संबंध शिकणे आणि शिकविणे यंत्रणेच्या प्रत्यक्ष कृतीशी जुळलेला आहे. मुलांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेची पातळी वाढण्याकरिता त्यादृष्टीने प्रयत्न होणे महत्त्वाचे आहे. यामधला मुख्य घटक शिक्षकांच्या गरजा आहेत. या सर्व गरजांना सहाय्य करून शिक्षणाची गुणवत्ता प्राप्त करायची आहे. या सर्वामध्ये मुलांना शिक्षणामध्ये टिकवून ठेवणे गरजेचे आहे. मुलांची गुणवत्ता वाढविण्याच्या अनुषंगाने शाळांचा दर्जा व मुलांचा सहभाग यास प्रवृत्त करण्याची गरज आहे.

**आरोग्य विषयक तरतूदी :**

चांगल्या आरोग्याशिवाय वैयक्तिक पातळीवर शक्तता वाढविणे आणि जीविकेच्या संधी निर्माण करणे अशक्य आहे. बालमृत्यु, कुपोषण आणि मातामृत्यु मध्ये ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागामध्ये घसरण झालेली आहे. पुरूषाच्या तुलनेत अजुनही स्त्रीयांना पुढाकार दिला जात नाही हे सामाजिक प्रवृत्तीच्या सांख्यिकीवरून स्पष्ट होते. आर्थिक-सामाजिक मागासलेपण आणि दारिद्र्याच्या संदर्भात आरोग्य सोई देतांना त्यामध्ये गुणवत्ता समाविष्ट असली पाहिजे. आरोग्य सुविधांचे मापन जिल्हा पातळीवर करणे आवश्यक आहे. परिणामत: चांगल्या आरोग्य सोई सर्वांपर्यंत पोहोचवता येतील. जलद व सर्वसमावेशक आर्थिक वृद्धी आणि मानव विकास याद्वारे महाराष्ट्र राज्याबाबत बोलायचे झाले तर बालमृत्यु, मातामृत्यु व कुपोषण याकरिता तात्काळ धोरणात्मक तरतूद करण्याची गरज आहे. पाझर प्रभावाद्वारे ही परिणामकारकता दिसणे महत्त्वाचे आहे. जन्मापूर्वीच्या व संदर्भीय सुविधाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. अर्भक मृत्यु व मातामृत्युमध्ये कपात करायची आहे. विशेषत: याची गरज मराठवाडा आणि नशिक, धुळे, जळगांव जिल्ह्यात असल्याचे अहवालात म्हटले आहे. विशेषत: एस.टी. प्रर्वगातील महिलांवर प्रकाश टाकत असतांना विविध प्रकारे राज्यामध्ये धोरणात्मक हस्तक्षेप करावा लागणार आहे. आधिक्याने झुंज द्यावा लागणारा वादप्रश्न म्हणजे स्त्रीयामधील रक्तअल्पता होय. याकरिताही राज्याला प्रत्यक्ष हस्तक्षेप करावा लागणार आहे.

बालक लिंग अनुपात (0-६ वर्षे) च्या आकडेवारीवरून स्पष्टपणे दिसून येते की, राज्याला समग्रतेच्या पातळीवर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. The Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques (Prohibition of Sex Selection) च्या आधारे बाल लिंग अनुपाताचे मापन होणे आवश्यक आहे. यामध्ये सर्व मुलभूत घटक गुंतलेले आहे. त्यामुळे सबळ कायदेशीर व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे. अधिकाराचा प्रत्यक्ष वापर स्त्रीयांना आणि मुलींना सक्षम बनविण्याकरिता झाला पाहिजे. प्रत्यक्ष कृती घडवून आणतांना तिचे मूल्यमापन करणे, त्याबाबतचे अहवाल मागविणे. यामुळे स्वयं-दुरूस्थी घडून येण्यास मदत होते. यामुळे सेवाची गुणवत्ता वाढविणे आणि अधिक लोकांना सामील करून घेणे शक्य होईल. त्यातून वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित व्यवस्थाबद्ध यंत्रणा निर्माण होऊ शकते.

महाराष्ट्रामध्ये सुदृढ आरोग्य क्षेत्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण, नागरी क्षेत्र, उत्पन्न गट, सामाजिक गट, प्रदेश व जिल्हे आणि लिंग यामध्ये असमानता आहे. ही असमानता प्राथमिक, द्वितीय व तृतीय आरोग्य सुरक्षा सेवांच्या बाबतीतही दिसून येते. मानव संसाधनाकरिता आरोग्य सेवांचा तुटवडा आहे. बालकांचे संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण, आरोग्य संस्थांमध्ये प्रसुतीचे प्रमाण वाढविणे, जन्मापूर्वीच्या आरोग्य सुरक्षांमध्ये अधिकाधिक समावेश करून घेणे आणि कुपोषणामध्ये कपात घडवून आणणे. या तरतुदी राज्यातील दारिद्र्यात राहणारे लोक, एस.टी. प्रवर्गातील माता आणि ग्रामीण क्षेत्राला लागू करणे व त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. विशेषत: आदिवासी क्षेत्रामध्ये मातृत्व व आरोग्य सुरक्षा सेवा ''आशा'' अंतर्गत पुरविल्या जातात. या सेवा पुरवितांना समानता असणे आवश्यक आहे. लक्षात घेतले पाहिजे की, एस.सी., एस.टी. आणि न्यून उत्पन्न गटातील लोक आधिक्याने सार्वजनिक आरोग्य सेवांवर अवलंबून असतात. म्हणून सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करून प्रवेश वाढविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आदिवासी बहुल आणि मागास जिल्हामध्ये या प्रकारच्या सुधारणा होणे आवश्यक आहे.

राज्याच्या प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय आरोग्य सुरक्षा सेवांच्या उपलब्धतेमध्ये प्रादेशिक असमानता आहे. असमानतेबाबतचा प्रश्न तातडीने सोडविण्याची आवश्यकता आहे. नागरी आणि ग्रामीण क्षेत्रात वैद्यकीय कर्मचारी आणि डॉक्टरांचे समान वितरण झालेले नाही. ग्रामीण भागात डॉक्टरांची नेमणूक होण्याकरिता विशिष्ट प्रावधान तयार करण्याची गरज अनिवार्य करणे आवश्यक आहे. ग्रामीण व आदिवासी बहुल भागत डॉक्टर उपलब्ध होण्याकरिता वित्तीय व वित्तीयेत्तर लाभ डॉक्टरांना मिळणे महत्त्वाचे आहे. जास्तीची परिचारिका महाविद्यालये सुरू होणे आणि आरोग्य सुरक्षा सेवांमध्ये सुधारणा घडून येण्यास उत्तेजन मिळाले पाहिजे. सुधारणा आणि अंमलबजावणी होत असतांना त्यासंबंधीचा अहवाल मिळण्याची आवश्यकता आहे. दवाखान्यांमध्ये औषधाची उपलब्धता असणे, सुदृढ आरोग्य सुरक्षा सेवा निर्माण करणे याकरिता पारदर्शकता वाढविण्याची आवश्यकता आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि सामुदायिक आरोग्य केंद्राद्वारे समान आरोग्य सुरक्षा मिळाल्या पाहिजे. मात्र नागरी क्षेत्रामध्ये ग्रामीण क्षेत्राप्रमाणे हुबेहुब प्रारूप तयार करणे शक्य नाही. नागरी क्षेत्रामधील आरोग्य क्षेत्र प्रवेश शक्ती निर्माण करणारा

आहे. नागरी क्षेत्रामध्ये रोख रक्कम हस्तांतरण आणि कुपन दारिद्र्यातील लोकांना देऊन खाजगी आरोग्य सेवांमधील प्रवेश वाढविणे आवश्यक आहे. सोबतच धोरणात्मक सुधारणा घडवून आणतांना आधार (Unique Identification Number) द्वारे दारिद्र्यातील लोकांना योग्य मार्गाने परिणामकारकरित्या लाभ प्राप्त होतील. पर्याय म्हणून खाजगी आरोग्य संस्थाद्वारे लाभ मिळणे व त्याचा विस्तार करणे आवश्यक आहे. जेणे करून आरोग्य सुविधा गरजाच्या पल्ल्यापर्यंत पोहचविता आल्या पाहिजेत. आरोग्य सुरक्षा सेवाकरिता केंद्र आणि राज्याचा निधी एकत्रितपणे खर्च करण्याची गरज आहे.

आरोग्य क्षेत्राला प्राथमिकता देत असतांना अहवालामध्ये काही शिफारशी सांगितल्या आहेत. उदा.आरोग्य क्षेत्राचे सामर्थ्य वाढविणे. याकरिता संरचनात्मक सुधारणा, मानव संसाधन कौशल्य, दर्जेदार नियमावरीलवरूप व्यवस्थापनाचा उपयोग करणे आवश्यक आहे. नवीन जन्मलेल्या बाळाकरिता सुरक्षा केंद्र असावे व या सुरक्षाजालाचा विस्तार करावा. दर्जेदार उपचार पद्धती अंतर्गत नवीन बाळाचा जन्म व्हावा. याकरिता उच्चत्तम संस्थात्मक पातळीची प्रसूती, सुविधा असावी. निवासाच्याच ठिकाणी जन्मलेल्या बाळासाठी सुरक्षा कार्यक्रमासंबंधीची तरतूद असावी. ज्याची अंमलबजावणी 'आशा' कार्यकर्तीद्वारे करता येईल. आरोग्य सुविधाच्या संदर्भातील सेवा, आजाराचे निदान दर्जात्मक पद्धतीने होणे करिता विकसित कृती आराखड्यावर विशेष प्रकाश टाकण्याची गरज आहे. जेणेकरून आरोग्य सेवा खेडे, पाडे आणि वंचितापर्यंत पोहचविता येईल. अर्भक आणि मातामृत्यु याचे नियमितपणे अंकेक्षण (auditing) व्हायला पाहिजे. मर्त्यतेमध्ये कपात घडवून आणण्यासाठी सुधारणात्मक कार्यक्रमासाठी उच्च दबाव गट (high-burden blocks) तयार करणे गरजेचे आहे. सर्व प्रकारचा धोरणात्मक हस्तक्षेप करून राज्याद्वारे आरोग्यावरील खर्चामध्ये वाढ घडवून आणायची आहे. संसाधनाच्या क्षमतेपेक्षा कमी उपयोगिता प्राप्त होण्याचे प्रतिबिंब म्हणजे आरोग्य क्षेत्रावर अत्यंत कमी प्रमाणात होणारा खर्च होय. क्षमतेपेक्षा कमी उपलब्ध निधी असल्यामुळे विशेष पुरक नियोजनाची आवश्यकता आहे.

**पोषणासंबंधी तरतूदी :**

पोषण हे शक्तता वाढविण्याचे महत्त्वाचे साधन आहे. आदिवासी समुहाकरिता पोषण व शिक्षणाची गरज अहवालात स्पष्टपणे अधोरेखित केली आहे. त्या अनुषंगाने अहवालात काही तरतूदी सांगितल्या आहे. पोषणाकरिता मातांना केंद्रवर्ती मानल्या गेले पाहिजे. पोषणासंबंधी कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रशिक्षित अंगणवाडी सेविकांमार्फत केल्या गेली पाहिजे. याकरिता पुरक पोषणाची व्यवहारी कृती करणे, ६ ते २३ महिने वयोगटातील मुलांचा आहार, वेगवेगळ्या वयोगटातील रक्तअल्पता मधील अडथळे, अर्भक आणि मुलांच्या पोषणाशी संबंधित सामाजिक प्रथा याला संबोधून प्रत्यक्ष कृती करावी लागणार आहे. याकरिता अंगणवाड्यांमार्फत प्रत्यक्ष स्थानापर्यंत मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. आरोग्य कार्यकर्ती म्हणजे 'आशा' मार्फत माता आणि बालकांना वाद प्रश्न प्राथमिकतेने हाताळण्याची गरज आहे. आशा कार्यक्रमाची गती वाढवत गेल्यास बालक आरोग्य सुरक्षेमध्ये वाढ घडून येईल. अर्भक आणि बालक यांच्या पोषणामध्ये सुधारणा करणे याकडूनच त्याची क्षमता वर्धित होईल.

अहवालामध्ये पोषणासंबंधी तरतूदी सुचवित असतांना कुटुंबाद्वारे भाजीपाला आणि फळे यांचा आहारामधला समावेश वाढला पाहिजे. विशेषत: मुलासाठी पुरक आहारामध्ये वाढ झाली पाहिजे. याकरिता कुटुंबांना शिक्षित आणि मार्गदर्शन करण्याची गरज आहे. स्थानिक पातळीवरचा भाजीपाला आणि फळे कसा महत्त्वाचा असतो याचे महत्त्व पटवून देता आला पाहिजे. यालाच जोडून बालक आणि माताच्या पोषणामध्ये व आरोग्यामध्ये सुधारणा घडवून आणणे व त्यानुसार कार्यक्रम राबविणे व हस्तक्षेपाची गरज आहे. माता आणि बालकांचे कमी होणारे पोषण यामध्ये दिर्घकालीन गुंतवणूक करावी लागणार आहे. याबाजू लक्षात घेऊन राज्याला मध्यम आणि दिर्घकालीन लाभापर्यंत पोहचण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राचा सार्वजनिक आरोग्याचा दर्जा सुधारण्यासाठी सर्व सार्वजनिक आणि खाजगी आरोग्य सुरक्षा कायदे राबविले पाहिजे. Medical Termination of Pregnancy Act 1971, PCPNDT Act, Bombay Nursing Home Act 1949 इत्यादी कायदे एकत्रित करून त्याच्या छत्रछायेखाली कार्यक्षम आरोग्य सुरक्षा सेवा निर्माण करता आली पाहिजे. यामुळे आरोग्य सेवाची परिणामकारकता वाढेल.

**निवास दारिद्र्य :**

महाराष्ट्रामध्ये स्वच्छता आणि स्वच्छ पिण्याचे पाणी यांच्या सुविधाबाबत उणीवा आहे. अस्वच्छ पाण्यातून पसरणारे अनेक अपरिमित आजार आहेत. आरोग्याच्या परिणामांशी प्रत्यक्षपणे घनकचरा व्यवस्थापन जुळलेले आहे. याला वैश्विक पातळीवर आळा घालण्याची गरज आहे. महाराष्ट्र हे झपाट्याने नागरीकरण होणारे राज्य असल्यामुळे अनेक कुटुंबाची झोपडपट्‌यामध्ये राहण्याची संख्या वाढत आहे. याला संबोधूनच निवास दारिद्र्याला प्राथमिकता देण्याची गरज आहे. निवासाच्या बाबतीत पाऊल उचलायचे असेल तर त्यांना पुरेसे उत्पन्न मिळणे किंवा भत्ता मिळणे आवश्यक आहे. निवासाच्या व्यवस्थेवरूनही दारिद्र्याची मांडणी करता येते. यावरून दारिद्र्य रेषा सुधारण्यास मदत होते. दारिद्र्यामध्ये पुरेशा निवासाची गटात प्रतिबिंबित होणे गरजेचे आहे. याकरिता निवास किंवा घरकुलाचा कार्यक्रम राबविणे पुरेसे नाही तर दारिद्र्य रेषेच्या खाली किती कुटुंबे आहेत त्याचे मापन होणे आवश्यक आहे. अनेक घरांमध्ये खाजगी वस्तूमुळे सुखावहता आलेली आहे. मात्र उत्पन्न वाढीशिवाय आणि दारिद्र्य कपातीशिवाय निवास दारिद्र्यामध्ये घट होऊ शकत नाही. घराकरिता अल्पदरावरील कर्जाचा पुरवठा करून दिला तर दारिद्र्यातील लोकांचा स्तर उंचावेल व सुधारणा घडून येईल. नागरी क्षेत्रातील समावेशनाला उत्तेजन देण्याकरिता घरांच्या मागणीसाठी अल्पदरावरील कर्ज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील वाढत्या नागरीकरणामुळे घरांचा निर्माण होणारा तुटवडा व त्यासाठी होणारी झटापट हा नागरी सुधारणाचाच अखंड भाग आहे. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी नुतनीकरण कार्यक्रम (Jawaharlal Nehru National Renewal Mission - JNNURM) च्या अंतर्गत नागरी क्षेत्रामध्ये सुधारणा केल्या गेल्या होत्या. यामध्ये सहा प्रकारच्या सुधारणा आहेत. त्यापैकी दोन सुधारणांची जबाबदारी नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविलेली आहे. याकरिता महानगरपालिकेद्वारे नागरी क्षेत्रातील दारिद्र्यातील लोकांकरिता आरोग्य सेवाच्या

तरतुदीसाठी वेगळा अंदाजपत्रकीय खर्च करावा. नागरी क्षेत्रातील दारिद्र्यातील लोकाकरिता मुलभूत सोईची तरतूद असावी. स्थानिक संस्थांनी घरे, पाणी पुरवठा, स्वच्छता व आरोग्य विषयक सुविधा यांच्या साठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सेवांचा अंर्तभाव करतांना वैधानिक सुधारणा राज्याच्या पातळीवर करण्याची आवश्यकता आहे. याकरिता समुह सहभाग कायदा तयार करण्याची गरज आहे. त्यामुळे नागरिकांचे संस्थानिकरण होण्यास मदत होईल. नागरी क्षेत्रामध्ये मुलभूत सुविधा करिता सभा घेण्याची संकल्पना रूजविल्या जाईल. ज्यामुळे विकासामध्ये नागरिकांचा सहभाग वाढेल. त्याचबरोबर निवास प्रकल्पाच्या सभोवतालच्या जमिनीचा विकास २० ते २५ प्रतिशत पर्यंत करण्याची पर्यायी व्यवस्था घडवून आणल्या जाऊ शकते. याकरिता आर्थिकदृष्ट्या मागासलेले आणि न्युन उत्पन्न गटातील लोकांच्या सहभागाने याप्रकारचा विकास घडवून आणता येऊ शकतो.

झोपडपट्ट्यामध्ये मुलभूत सोईची तरतूद करीत असतांना झोपडपट्टी आणि नागरी दारिद्र्य लक्षात घेऊन निवास आणि बांधकाम याची माहिती घेऊन याबाबत व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. झोपडपट्ट्यांच्या समुहाची ओळख पटणे आवश्यक आहे. तसेच नविन झोपडपट्ट्यांच्या समावेशनाची पद्धती विकसित करणे गरजेचे आहे.

**पिण्याचे पाणी आणि स्वच्छता :**

आदिवासी कुटुंबे आणि खेडे या ठिकाणच्या परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील १५ जिल्हातील ४० प्रतिशत कुटुंबाकडे त्याच्या राहण्याच्या परिसरात पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत नाही. याला पिण्याचे पाणी व आरोग्य विषयक सुधारणा कार्यक्रमाशी जोडण्याची आवश्यकता आहे. पिण्याचे पाणी आणि आरोग्य विषयक समस्या यामध्ये उच्चतम सहसंबंध आहे. पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेबरोबरच प्रसाधन गृहाची व्यवस्था असणे आवश्यक आहे. आदिवासी उपयोजना अंतर्गत प्रसाधन गृहाचा विस्तार करण्यात आला. मात्र स्वच्छतेच्या अटी अंतर्गत समाधानापासून महाराष्ट्र राज्य अजूनही दूर आहे. मिलेनियम डेव्हलपमेंट गोलची उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या अटी अंतर्गत मुलभूत स्वच्छता आणि सुरक्षित पिण्याचे पाणी यामध्ये अशाश्वत प्रवेश वाढलेला आहे. मिलेनियम डेव्हलपमेंट गोलची उद्दिष्टे आणि आरोग्यामध्ये सुधारणा करायच्या असेल तर तात्काळ प्रादेशिक असमानतेला संबोधित केले पाहिजे. स्वच्छता आणि पिण्याचे पाणी यांचे महत्त्व लक्षात घेऊन त्यावर प्रकाश टाकायची गरज आहे. कारण याचा परिणाम व्यक्तिगत, कुटुंब आणि समुहाच्या आरोग्यावर होतो. पाणी आणि स्वच्छता यामध्ये प्रवेश वाढत असतांना समानता आणि समावेशन खात्रीशीरपणे घडून येईल याची हमी देता आली पाहिजे. जिल्हा कृती नियोजन आराखडा तयार करतांना स्वच्छता व पिण्याचे पाणी यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देतांना प्रदुषणाचे अडथळे आहेत. प्रदुषणामुळे अशुद्ध पाणी निर्माण होते. म्हणून गट, प्रदेश, जिल्हा आणि राज्याच्या पातळीवर पाणी हे मुलभूत संसाधन आहे, असा दृष्टिकोन विकसित करण्याची गरज आहे. शाश्वत विकासासाठी पाण्याचे व्यवस्थापन होणे आवश्यक आहे.

**समारोप :**

महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल २०१२ मध्ये अनेक धोरणात्मक शिफारशी केलेल्या आहे.

यापैकी बऱ्याच शिफारशी पूर्वीपासूनच धोरणाच्या स्वरूपात राबवित असल्याचे प्रत्ययास येते. मात्र पूर्वी राबविलेल्या धोरणाचा मंद प्रभाव मानव विकासावर दिसून आलेला आहे. तो प्रभाव अधिक वाढविण्याची गरज आहे. मानव विकासाला अधिक गती देण्यासाठी सबळ सामाजिक संरचना उभ्या होण्याची शिफारस अहवालात स्पष्ट केलेली आहे. म्हणून वंचितांचा, उपेक्षितांचा आणि खालच्या तळातील लोकांच्या स्थितीचा विचार करून लोककल्याणकारी दृष्टिकोनाचा पाया अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

**संदर्भ :**


1. Govt. of Maharashtra (2014) : Maharashtra Huan Development Report 2012, Sage Publication, New Delhi.
2. Govt. of Maharashtra (2002) : Maharashtra Human Development Report 2002.
3. Dev Mahendra(2014) : Inclusive growth in India, Oxford University Press.
४. अमित भादुरी (२०११) : प्रतिषेसह विकास (अनुवाद-संतोष दास्ताने), नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया.
५. जहागिरदार मुक्ता (२०११) : अर्थवेध, सेंटर फॉर एकानोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती.


◆◆◆

## श्रद्धांजली

*विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या चिमूर येथील १९व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य बाळ कुळकर्णी यांचे दुःखद निधन झाले आहे. परिषद त्यांच्या दुःखात सहभागी आहेत. ते परिषदेच्या कार्यात नेहमी सहभागी होत होते. त्यांच्या मृत्युमुळे परिषद एका अभ्यासू व लोकप्रिय सभासदास कायमची मुकली आहे. परिषदेतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली !*

## श्रद्धांजली

*ऑक्टोबर २०१४ मध्ये भारतीय महाविद्यालयाचे माजी प्राचार्य अण्णासाहेब वैद्य यांचे अमरावती मुक्कामी दुःखद निधन झाले. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचा व त्यांचा सुरवातीपासूनच जवळचा संबंध होता. विशेष म्हणजे परिषदेच्या तिसऱ्या वार्षिक अधिवेशनाचे (१९७२-७३) आयोजन त्यांच्या नेतृत्वात भारतीय महाविद्यालय, अमरावती येथे झाले होते. (कै.) प्राचार्य वैद्य हे वक्ता म्हणूनही प्रसिद्ध होते. अनेक आंदोलनातही त्यांचा सहभाग होता.*

*त्यांना परिषदेच्या वतीने विनम्र श्रद्धांजली !*

ISSN 2320-0197

# अमरावती महसूल विभागातील मानव विकास – एक टीप

**महादेव आसाराम रिठे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
राजे छत्रपती कला महाविद्यालय,
बुलडाणा.

**प्रस्तावना :**

आर्थिक विकास म्हणजे केवळ भौतिक साधनांचा विकास नव्हे तर भौतिक विकासाबरोबर मानवी साधनांचा विकास अधिक महत्त्वाचा असतो. सर्वसामान्य माणसांना आपल्या पसंतीचे जीवनमान जगण्यासाठी आवश्यक असलेल्या विकल्पांची व्याप्ती वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे मानव विकास असून दीर्घ व आरोग्यदायी जीवन जगणे, ज्ञान प्राप्त करणे आणि चांगल्या प्रतीचे राहणीमान उपभोगणे यासारख्या अत्यावश्यक बाबींचा त्यात अंतर्भाव असतो. मानवी गुणवत्ता वाढविण्यासाठी विकासाचे वास्तव ध्येय निर्देशित करणारी संकल्पना म्हणजे मानवी विकास होय.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सुरवातीला राज्याच्या मानव विकास निर्देशांकासंबंधीची वैशिष्ट्ये व नंतर अमरावती विभागातील जिल्हानिहाय स्थितीचे अध्ययन करून निष्कर्ष काढण्यात आले आहे.

**मानव विकास निर्देशांकाची संकल्पना :**

मानव विकास निर्देशांक ही संकल्पना १९९० मध्ये युनोच्या विकास कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या अर्थतज्ज्ञ महेबुब–उल–हक आणि अमर्त्य सेन यांनी मांडली. तेव्हापासून दरवर्षी मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला जातो. भारत सरकारने सन २००१ मध्ये पहिला मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला तर महाराष्ट्राने सन २००२ मध्ये 'राज्य मानव विकास अहवाल' प्रसिद्ध केला आहे. जिल्हास्तरावरील मानव विकास निर्देशांक परिगणित करतांना उपलब्ध आकडेवारीच्या मर्यादेमुळे (१) दीर्घ व आरोग्यपूर्ण जीवनासाठी अर्भक मृत्यूदर (२)ज्ञानासाठी साक्षरता दर व शाळेतील शिक्षणाकरिता सरासरी वर्ष (३) आर्थिक साध्यासाठी दरडोई जिल्हा उत्पन्न या निर्देशांकांचा उपयोग केला. महाराष्ट्र शासनाने दरवर्षी मानव विकास अहवाल तयार करण्याचे ठरविले होते. परंतू नियोजन विभागातील पुरेशा मनुष्यबळाच्या अभावी दर पाच वर्षांनी अहवाल तयार करण्याचा निर्णय २०११ मध्ये घेण्यात आला.

**राज्य मानव विकास निर्देशांक मापन पद्धती:**

प्रत्येक निर्देशांकासाठी विशिष्ट देशाची वंचितता खालील सूत्राने परिगणित करण्यात येते.

$$\text{निर्देशांक}_{(\text{क}, \text{ख})} = [(\text{महत्तम}\ _{\text{ख}}{}^{\text{क्ष}}\ _{(\text{क}, \text{ख})} - \text{क्ष}_{(\text{क},\text{ख})}]\ \text{विस्तार}_{(\text{क})}$$

**सर्वसाधारण निर्देशांक**

$$\text{निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{लघुत्तम मूल्य}}{\text{महत्तम मूल्य} - \text{लघुत्तम मूल्य}}$$

मानव विकास निर्देशांक = आयुर्मान निर्देशांक, शैक्षणिक निर्देशांक व देशांतर्गत स्थूल उत्पन्न

निर्देशांक यांची सर्वसाधारण सरासरी

**महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक २०१२ :**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेने २०१२ चा महाराष्ट्र मानव विकास अहवाल तयार केला. परंतू हा अहवाल जून २०१४ मध्ये प्रकाशित करण्यात आला. साक्षरता दर, अर्भक आयुर्मान दर व दरडोई निव्वळ जिल्हांतर्गत उत्पन्न या तीन निर्देशांकाचा वापर करून तयार केलेल्या मानव विकास निर्देशांक २०१२ ची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) मानव विकास निर्देशांकात वाढ :**

सन २००१-०२ ते २०११-१२ या कालावधीत महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक ०.६६६ वरून ०.७६२ पर्यंत वाढला आहे. साक्षरता दर, शाळांची पटसंख्या, अर्भक मृत्युदर व उत्पन्न या सर्व निर्देशांकामध्ये या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सुधारणा झाली आहे.

**२) उत्पन्न व जिल्हा निहाय क्रम :**

जिल्ह्यांचा विकास हा राज्याच्या विकासापेक्षा कमी अधिक आहे. मुंबई हा सर्वात श्रीमंत तर वाशिम सर्वात गरिब जिल्हा ठरला आहे. वाशिम, गडचिरोली, लातूर, नांदेड, हिंगोली, उस्मानाबाद, बुलडाणा, नंदूरबार, जालना हे जिल्हे अहवालानुसार गरीब जिल्हे तर मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, रायगड, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद हे जिल्हे अहवालानुसार श्रीमंत ठरले आहेत. जिल्ह्यातील विषमता मोजण्यासाठी स्थिर किंमतीनुसार दरडोई उत्पन्न लॉरेन्स रेशोचा उपयोग करण्यात आला असून हा अनुपात २.२२ टक्के वरून २.१२ टक्के पर्यंत कमी झाला आहे. सर्वच जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली आहे.

**३) इतर राज्यांशी तुलना :**

सन २०१०-११ या वर्षासाठी आंतरराष्ट्रीय पद्धतीने तयार केलेल्या देशातील विविध राज्यांच्या क्रमवारीत महाराष्ट्राचा चौथा क्रमांक लागतो. सर्वोच्च स्थानी केरळ तर सर्वात खाली ओरीसा राज्य आहे. देशातील सरासरी मानवविकास निर्देशांक ०.५०४ आहे. महाराष्ट्राचा साक्षरता दर हा नेहमी देशाच्या साक्षरता दरापेक्षा जास्त असतो. साक्षरता दरात २०११-१२ या दहा वर्षात ७७.३ वरून ८२.०९ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. साक्षरतेच्या संदर्भात महाराष्ट्राचा बारावा क्रमांक लागतो.

**४) साक्षरता दर :**

सर्व शिक्षण अभियानांतर्गत राज्यातील शिक्षण खर्चात २००६-०७ ते २००९-१० या काळात १२ टक्के वाढ नोंदविण्यात आली. अहवालानुसार नंदूरबार जिल्ह्याचा एकूण साक्षरता दर ६३ टक्के तसेच महिला साक्षरता दर ५३.९ टक्के हा महाराष्ट्रात सर्वात कमी आहे. तर मुंबई उपनगर एकूण साक्षरता दर ९०.९ टक्के आणि महिला साक्षरता दरात ८६.९ टक्के नी पहिल्या स्थानावर आहेत. साक्षरता दरातील सर्वाधिक लिंगाधारीत असमानता जालना जिल्ह्यामध्ये आढळते.

राज्यातील विविध जातीगटांचा विचार केल्यास ६१.९ टक्के हा सर्वात कमी साक्षरता दर अनुसूचित जमातीमध्ये आहे. अनुसूचित जमातीचा साक्षरता दर शहरी व ग्रामीण भागात सर्वात कमी आहे. तसेच साक्षरता दरातील लिंगाधारीत असमानता सुद्धा आदिवासींमध्येच सर्वात जास्त आहे.

**५) आरोग्य :**

महाराष्ट्रातील माता मृत्युदरामध्ये सुद्धा घट

झाली आहे. १९९७-९८ मध्ये मातामृत्यु दर १६६ तर २००८-०९ मध्ये तो १०४ इतका होता. २०११ च्या जनगणनेनुसार २००१ ते २०११ या दहा वर्षात राज्यातील घरांची संख्या ३१.१ टक्क्यांनी वाढली असून ग्रामीण भागात ही वाढ २५.६ टक्के तर नागरी भागात ३७.७ टक्के आहे. त्याचप्रमाणे शौचालय असणाऱ्या कुटुंबाच्या प्रमाणात १८ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागातील ३८ टक्के तर शहरी भागातील ७५ टक्के कुटुंबांकडे शौचालये आहेत. शौचालयांच्या बाबतीत अनुसूचित जाती-जमातीच्या कुटुंबांची परिस्थिती सुद्धा सुधारली आहे.

**राज्य मानव विकास निर्देशांक आणि अमरावती विभाग :**

सन २००२ व २०१२ या वर्षात महाराष्ट्र शासनाने दोन अहवाल तयार केले. या दोन्ही अहवालांचा विचार करता सन २००२ ते २०१२ या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सुधारणा झाली आहे. अमरावती विभागातील बुलडाणा, यवतमाळ, वाशिम, अकोला, अमरावती या पाच जिल्ह्यांमधील २००१ व २०१२ च्या निर्देशांकातील बदलाचे तुलनात्मक अध्ययन पुढीलप्रमाणे करता येते.

**तक्ता १ : जिल्हा निहाय मानव विकास निर्देशक**

| जिल्हा | एकूण साक्षरता दर (Total Literacy Rate) | | शिशू मृत्यू दर (IMR) | | दरडोई जिल्हा घरगुती उत्पादन (१९९९-२००० च्या किंमतीनुसार) (PCDDP) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २००१ | २०११ | २००१ | २००७-०८ | २००१ | २००८-०९ |
| अकोला | ८१.४ | ८७.६ | ४४ | २८ | १५८२२ | २४०५५ |
| अमरावती | ८२.५ | ८८.२ | ६१ | ५९ | १६२११ | २१८०४ |
| वाशिम | ७३.४ | ८१.७ | ५२ | ४६ | १०१५२ | १४८८५ |
| यवतमाळ | ७३.६ | ८०.७ | ६१ | ४७ | १३५६२ | २४११८ |
| बुलडाणा | ७५.८ | ८२.१ | ४९ | ३४ | १०७२९ | १९४८७ |
| **अमरावती विभाग** | **७७.३४** | **८४.०६** | **५३** | **४३** | **१३२९५** | **२०८७०** |

वरील सारणीवरून दिसून येते की,

१) अमरावती विभागातील सन २००१ च्या तुलनेत २०११ च्या साक्षरता दरामध्ये वाढ झाली आहे. अकोला जिल्ह्याचा २००१ मध्ये एकूण साक्षरता दर ८१.४ होता त्यामध्ये वाढ होऊन २०११ मध्ये ८७.६ इतका झाला. तसेच अरावती ८२.५ वरून ८८.२, वाशिम ७३.४ वरन ८१.७, यवतमाळ ७६.६ वरून ८०.७ तर बुलडाणा जिल्ह्याचा साक्षरता दर ७५.८ वरून ८२.१ पर्यंत पोहोचला. अमरावती विभागाचा २००१ मध्ये साक्षरता दर ७७.३४ इतका होता. त्यामध्ये वाढ होऊन २०१२ मध्ये ८४.०६ इतका झाला.

२) एका निश्चित कालावधीत एका वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकांच्या मृत्युदराला शिशू-मृत्यूदर म्हटले जाते. मा.वि.नि.-२०१२ मधील अमरावती विभागातील २००१ च्य आकडेवारीनुसार सर्वात कमी शिशू-मृत्यूदर अकोला (४४) तर सर्वात जास्त अमरावती व यवतमाळ (६१) या दोन जिल्ह्यात होता. २००७-०८ च्या आकडेवारीमध्ये सुद्धा सर्वात कमी शिशू-मृत्यूदर अकोला (२८) जिल्ह्याचा तर सर्वात जास्त अमरावती (५९) जिल्ह्याचा दिसून येतो. मात्र यवतमाळ जिल्ह्याने याबाबत प्रगती

केलेली आढळते. अमरावती विभागाचा शिशू-मृत्यू दर ४३ नोंदविला गेला. तो साधारणपणे महाराष्ट्राच्या बरोबरीत आहे.

३)२००१ मध्ये सर्वात जास्त दरडोई जिल्हा घरगुती उत्पादन अकोला (१५८२२ रू.) जिल्ह्याचे होते. तर सर्वात कमी दरडोई उत्पादन वाशिम (१०१५२ रू.) जिल्ह्याचे होते. २००८-०९ मध्ये यवतमाळ (२४११८ रू.) जिल्ह्याचे दरडोई उत्पादन सर्वात जास्त तर सर्वात कमी वाशिम (१४८८५ रू.) जिल्ह्याचे होते. वाशिम जिल्ह्याचे दरडोई उत्पादन दोन्ही काळामध्ये सर्वात कमी होते.

**तक्ता २ : मानव विकास निर्देशांकासंबंधी जिल्हानिहाय दर्जा**

| जिल्हा | २००१ चा निर्देशांक | दर्जा | २०११ चा निर्देशांक | दर्जा |
|---|---|---|---|---|
| अकोला | ०.६३१ | उच्च | ०.७२२ | उच्च |
| अमरावती | ०.६३३ | उच्च | ०.७०१ | मध्यम |
| वाशिम | ०.५५४ | निम्न | ०.६४६ | निम्न |
| यवतमाळ | ०.५९२ | मध्यम | ०.७०० | मध्यम |
| बुलडाणा | ०.५६७ | निम्न | ०.६८४ | मध्यम |

उपरोक्त सारणीवरून दिसून येते की, २००१ मध्ये अमरावती विभागातील अकोला (०.६३१) व अमरावती (०.६३३) या जिल्ह्यांना मानव विकास निर्देशांकामध्ये उच्च स्थान मिळाले होते. यवतमाळ (०.५९२)जिल्ह्याला मध्यम तर बुलडाणा (०.५६७) व वाशिम (०.५५४) जिल्ह्यांना निम्न दर्जामध्ये समाविष्ट करण्यात आले होते.

सन २०११ मध्ये केवळ अकोला (०.७२२)जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांकामधील उच्च दर्जा कायम राहिला असून अमरावतीला (०.७०१) मध्य दर्जा प्राप्त झाला आहे. त्याचप्रमाणे बुलडाणा जिल्ह्याचे स्थान निम्न दर्जामधून मध्यम दर्जामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. तर वाशिम जिल्ह्याचे स्थान मात्र निम्न दर्जामध्ये कायम राहिले आहे.

**समारोप :**

महाराष्ट्र राज्याने २००१ ते २०१२ असे दोन मानव विकास निर्देशांक तयार केले आहेत. या दोन्ही अहवालावरून दिसते की, राज्याच्या व जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकात वाढ झाली आहे. २०१२ च्या अहवालानुसार बुलडाणा जिल्ह्याचे स्थान निम्न दर्जामधून मध्यम दर्जामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. तर वाशिम जिल्ह्याचे स्थान मात्र निम्न दर्जामध्ये कायम राहिले आहे. वाशिम जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांकाचा दर्जा वाढविण्यासाठी शासनाने खास उपाययोजना राबविल्या तर येणाऱ्या काळामध्ये निश्चितपणे त्यामध्ये वाढ होईल.

**संदर्भ :**

१. महाराष्ट्र मानव विकास अहवाल - २००२
२. महाराष्ट्र मानव विकास अहवाल - २०१२
३. परिवर्तनाचा वाटसरू - सप्टेंबर २०१४
४. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी - २००९-१०
5. www.maharashtra.gov.in
6. www.mahades.maharashtra.gov.in

◆◆◆

ISSN 2320-0197

# मानव विकासाचा पायाभूत घटक : शिक्षण

**राजश्री आनंद रायभोग**
सहाय्यक प्राध्यापक,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
किरण नगर, अमरावती

**प्रस्तावना :**

मानव विकासाच्या प्रक्रियेचे मुख्य उद्दिष्ट मानवी क्षमतांचे वा शक्ततांचे विस्तारीकरण करणे हे होय. मानवी शक्ततांच्या विस्तारीकरणात महत्त्वपूर्ण असलेल्या अनेक घटकांपैकी चांगले शिक्षण हा पायाभूत असा घटक आहे. शिक्षण हे व्यक्तीच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे माध्यम असून त्याद्वारे व्यक्तीला ज्ञान व कौशल्य प्राप्त करता येतेच, परंतु उत्पादक अशा रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होतात. रोजगाराचे साधन प्राप्त होते. बाराव्या पंचवार्षिक योजनेत शिक्षण हे जलद व सर्व समावेशक विकासाचे मुख्य साधन मानले आहे. शिक्षण हे असे साधन आहे की ज्यामुळे देशातील सर्व लोकांचा अगदी तळागाळातील, मागासलेल्या वर्गातील, समाजापासून दूर राहणाऱ्या लोकांचा तसेच महिलांचा विकास होऊ शकेल. अशा रितीने शिक्षण हे सामाजिक, प्रादेशिक व लिंगभेदातील अंतर कमी करण्याच्या प्रयत्नांचा मुख्य स्त्रोत बनून सर्व व्यक्तींच्या क्षमतांचा विकास घडवून आणू शकते.

महाराष्ट्राच्या मानव विकास अहवालात शिक्षणाबाबत साक्षरतेची प्रवृत्ती व प्रकार, पट नोंदणी, शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग, शाळेतील साहित्य इ.च्या आधारे महाराष्ट्र राज्यातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बाबतीत सद्यस्थिती व आपल्याला काय साध्य करायचे ह्याबाबत विचार केला आहे. माध्यमिक शिक्षणाचे (इयत्ता ८ वी पर्यत) महाराष्ट्र राज्यात सार्वत्रिकीकरण झाल्याने ह्या शिक्षणाचा याठिकाणी विचार केला आहे. प्राप्त आकडेवारीवरून शिक्षणाबाबतची प्रादेशिक विषमता स्पष्ट होते तसेच शहरी व ग्रामीण शिक्षण, मुले व मुलींचे शिक्षण, सामाजिक स्तर व उत्पन्न स्तराच्या आधारे शिक्षणाच्या बाबतीत विषमता आढळून येते. तसेच या अहवालात मागील १० वर्षाच्या प्रगतीचा आढावा घेतला आहे.

**स्त्री शिक्षण :**

ज्ञानप्राप्ती व धनप्राप्ती यांच्यामध्ये सहसंबंध असतो. तद्वतच स्त्रीसाक्षरता (शिक्षण) व बालकांचे आरोग्य, आहार व सुरक्षितता यामध्ये देखील सहसंबंध आढळतो ह्याचे विवेचन या अहवालात केले आहे. स्त्री जर शिक्षित असेल तर मुलांच्या शाळेतील सहभागामध्ये वाढ घडून येते हे आकडेवारीद्वारे स्पष्ट केले आहे. मागील १० वर्षात पुरूषांच्या तुलनेत (३%) स्त्रियांच्या साक्षरतेत १० प्रतिशत वाढ झाली. असे असले तरी आज स्त्रीसाक्षरतेचे प्रमाण ७५.५ प्रतिशत तर पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८९.८ प्रतिशत आहे. राष्ट्रीय साक्षरतेच्या तुलनेत महाराष्ट्राचा साक्षरता

दर ८ प्रतिशतने जास्त आहे तरी साक्षरतेच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात १२ वा क्रमांक (८२.९ प्रतिशत २०११) लागतो.

साक्षरता दराचे वेगवेगळ्या स्तरावर स्पष्टीकरण केल्यास त्यामध्ये बरेच विचलन आढळून येते. विशेषत: अनुसूचित जमातीबाबत स्त्रियांचा साक्षरता दर कमी आढळून येत असून शहरी व ग्रामीण साक्षरता दरात तफावत आहे. याकरिता धोरणात बदल करणे आवश्यक आहे. शिक्षण हेच, अंतर कमी करण्याचे महत्वाचे माध्यम आहे.

**विद्यार्थ्यांची नोंदणी :**

२००९ चया शिक्षणाचा अधिकार कायद्यामुळे शाळांच्या संख्येत व मुलांच्या नोंदणीत वाढ होत आहे. प्रत्येक दशकात शाळांच्या संख्येत १० प्रतिशतने, प्राथमिक शिक्षकांमध्ये २२ प्रतिशतने तर विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये २७ प्रतिशतने वाढ झाली आहे. असे असूनही कळंब, अक्कलकुवा व सोयेगाव या गावात शाळा नोंदणी झालेल्या विद्यार्थ्याचे प्रमाण कमी होते. याला कळंब येथे पारधी समाज जास्त, अक्कलकुवा येथे स्थानांतरण तर सोयेगाव येथे ऊसतोडणी अशी कारणे होती. अशा ठिकाणी नोंदणी वाढावी म्हणून बसच्या पासची व्यवस्था, मध्यान्ह भोजन व मुलींना हजेरी भत्ता अशा सवलतीचा उपयोग केला गेला. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत पुणे व नाशिक विभागात स्त्री विद्यार्थ्यांची नोंदणी राज्याच्या सरासरीपेक्षाही कमी आहे ही बाब स्पष्ट झाली. DISE ने २०११-१२ मध्ये केलेल्या खंडनिहाय पाहणीवरून लक्षात आले की १२५ खंड व ८ महानगरपालिकेत स्त्री विद्यार्थ्यांची नोंदणी राज्याच्या सरासरीपेक्षाही कमी आहे तसेच सामाजिक वर्गवारीनुसार व यांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक नोंदणीत खूपच अंतर आहे.

शिक्षणाच्या बाबतीत विद्यार्थ्यांची नोंदणी हा महत्वाचा निर्देशक असला तरी त्यावरून विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभाग (हजेरी) स्पष्ट होत नाही. नोंदणी झालेली सर्व मूले शाळेत जातीलच अशी शक्यता वाटत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष विद्यार्थी सहभागापेक्षा नोंदणी संख्या जास्त असू शकते. तशा प्रकारची आकडेवारी अहवालात दिलेली आहे. प्राथमिकपेक्षा माध्यमिक शाळेतील हजेरीदर कमी असलेला स्पष्ट होतो.

**शाळाबाह्य मुले व गळती :**

शाळाबाह्य मुलांचे प्रमाण हे अनुसूचित जमाती प्रवर्गात जास्त आहे. कोकण, नाशिक, औरंगाबाद विभागात हे प्रमाण ५ प्रतिशतच्या जवळ आहे. या मुलांवर काम करण्याची वेळ येणे हेच त्यांना शाळाबाह्य ठेवण्याचे मुख्य कारण आहे. तसेच बालवयापेक्षा पुढच्या वयात शिक्षणाचा खर्च जास्त येतो. त्यामुळे लहान वयातच ते उत्पन्न मिळवायला लागून शिक्षणाप्रती अनास्था निर्माण होते. लहान वयातच शिक्षण घेतले तर ते पुढील शिक्षण घेण्यासाठी उत्सुक, उद्युक्त होतात, ही वस्तुस्थिती आहे.

मुंबईसारख्या शहरात एम्ब्रॉयडरी, जरी, लेदरवर्क इ. कामात बालकामगार गुंतले आहेत. यादृष्टीने शिक्षणाचा अधिकार याबाबत लोकांमध्ये जागरूकता आणण्यासाठी विशिष्ट लोकांना तशा प्रकारचे शिक्षण देणे आवश्यक आहे. जेणेकरून शाळाबाह्य मुले शाळेपर्यंत पोहचू शकतील. परंतु या प्रवर्गाचे विकेंद्रीत स्वरूपात राहणे, वारंवार स्थलांतर करणे आणि शाळेत नियमित न येणे यामुळे प्रक्रियेमध्ये अडथळे येऊ शकतात.

विद्यार्थ्यांच्या गळतीला विशेषत: ग्रामीण भागात पालकांची मुलांना शिकवण्याची अनास्था तर शहरी भागात आर्थिक अडचण हे मुख्य कारण

आढळले. याशिवाय मुलांची शिकण्याप्रती अनास्था ही कारणीभूत ठरते. अमरावती विभागातील चिखलदरा खंडात ५० प्रतिशत मुले शाळेत येत नाही. बीड जिल्ह्यात ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यात मुले कापसाच्या हंगामात शाळेत येत नाही. याकरिता मुलांना शिकण्यात रूची वाटेल अशा पद्धतीचा उपयोग करणे आणि प्राथमिक शिक्षणाचे राज्यस्तरावर सार्वत्रिकीकरण होण्याच्या दृष्टीने नीती राबविणे आवश्यक आहे.

**शालेय प्रेरके :**

मोफत शिक्षण हे २००७–०८ मध्ये महाराष्ट्र राज्यात ९२.७ प्रतिशत मुलांनी प्राप्त केले. तसेच प्राथमिक स्तरावर मुले व मुली असे वर्गीकरण केल्यास मुलींचे प्रमाण मुलांच्या तुलनेत जास्त आहे. तसेच विविध सामाजिक वर्गामध्ये अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाने जास्त लाभ घेतला.

मध्यान्ह भोजन हे शालेय नोंदणी व उपस्थिती वाढविण्यावर अनुकूल प्रभाव टाकणारा घटक आहे. मध्यान्ह भोजनामुळे मुले जातीभेदाच्या वर येऊन एकत्र येत आहे. त्याचप्रमाणे त्यांच्यामध्ये एकसंघभावना वाढण्यास मदत होते. यशदा या संस्थेने २००८–०९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणावरून असे आढळले की ८६ प्रतिशत मुले मध्यान्ह भोजन घेतात. त्यामुळे विद्यार्थ्याची उपस्थिती वाढण्या–बरोबरच मुलांना शाळेत वर्षभर गुंतवून ठेवता येते.

**गुणवत्तापूर्ण शिक्षण :**

मुले शाळेत काय शिकली याचे मोजमाप करण्याचे वार्षिक परीक्षा हेच एकमेव साधन आहे. याशिवाय आपल्याकडे दुसरी पद्धत नाही. तेव्हा विद्यार्थ्यांची गुणवत्ता व स्पर्धात्मकता पाहण्यासाठी त्यांची वाचण्याची व गणित करण्याची क्षमता तपासली जाते. २००६ ते २०१० या काळात १ ली व २ रीच्या मुलांची वाचन व अंकज्ञान क्षमता बरी होती परंतु २०११ मध्ये ती घटली. ३ री व ४ थीच्या मुलांची क्षमता देखील घटलेली दिसते. ग्रामीण भागातील ५ व्या वर्गातील मुलाला २ रीचे पुस्तक देखील व्यवस्थित वाचता येत नाही. प्रति चार मुलातून एका मुलाला असे वाचन जमत नाही. या संदर्भात महाराष्ट्राची कामगिरी ही भारतापेक्षा चांगली आहे. परंतु ही समाधानकारक स्थिती निश्चितच नाही.

देशांमध्ये ५ वी तील ५० प्रतिशत मुलांना वाचन जमत नाही. कारण २५ प्रतिशत मुले स्थलांतरणामुळे शाळेतील अभ्यास व्यवस्थित करू शकत नाही. तसेच ५० प्रतिशत पेक्षा जास्त मुलांना तीन आकडी संख्येला एककाने भाग देणे देखील जमत नाही. त्यामानाने महाराष्ट्राने समाधानकारक प्रगती केली आहे.

मुलांनी घेतलेले शिक्षण हे व्यवहारात उपयोजनासाठी असावे, वापरता यावे त्याबाबत आणखी संशोधन होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रासारख्या जलद गतीने शहरीकरणाकडे जाणाऱ्या राज्यात गैरकृषी कामांच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होणे व तरूणांना त्या प्राप्त होणे आवश्यक आहे जेणेकरून त्यांनी मिळवलेले ज्ञान, कौशल्य यांचा ते प्रत्यक्षात वापर करून उत्पादकता वाढवू शकतील.

संपूर्ण शिक्षणप्रणालीचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे १० वी ची परीक्षा किवा शाळेची अंतिम परीक्षा होय. त्यानुसार प्रत्येक राज्य बोर्डाची स्थापना करून त्याआधारे परीक्षा घेते.यशस्वी विद्यार्थ्याच्या प्रमाणावर परिक्षा पद्धती व बोर्डाच्या कामगिरीचे यश अवलंबून असते. उत्तीर्ण होण्याबाबत साधारणत: असे दिसून येते की मुलींचे प्रमाण मुलांच्या तुलनेत जास्त आहे. अनूसूचित जाती व जमाती या

प्रवर्गातील मुलांचे प्रमाण हे इतर मागासवर्गीय प्रवर्गातील मुलांपेक्षा कमी असलेले आढळून येते.

**शालेय संसाधने :**

शालेय वातावरण ज्या बाबींवर आधारीत असते. त्याबाबींचा संसाधनामध्ये समावेश होतो. यामध्ये शिक्षण, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, प्रशिक्षित शिक्षक व शिक्षकांकडील शिक्षकेत्तर कामाच्या जबाबदाऱ्या या मुद्द्यांचा आढावा घेता येईल.

महाराष्ट्रामध्ये एकूण प्राथमिक शिक्षकापैकी साधारणत: ४५ प्रतिशत शिक्षिका आहेत. मुंबई, पुणे, ठाणे,नागपूर येथे ६० प्रतिशतपेक्षा जास्त शिक्षिका आहेत तर हिंगोली गडचिरोली येथे २५ प्रतिशतपेक्षा ही कमी शिक्षिका आहेत. शाळांच्या संख्येच्या संदर्भात ६७ प्रतिशत शाळांमध्ये शिक्षिका आहेत.

विद्यार्थी शिक्षक प्रमाण हे २००४-०५ ते २००८-०९ या काळात घसरले तर २०११-१२ मध्ये वाढले. प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण हा एक महत्त्वाचा घटक आहे. कारण प्रशिक्षणामुळे शिक्षकांची क्षमता वाढते. महाराष्ट्रात प्राथमिक शाळेतील सर्व नियमित शिक्षक प्रशिक्षित आहेत तर करारपद्धतीत ८७ प्रतिशत प्रशिक्षित आहेत. शिक्षकाने मुलांना शिकवण्यासाठी वर्गात हजर असणे आवश्यक आहे. परंतु शिक्षकांचे शिक्षणेत्तर कामात गुंतण्याचे प्रमाण (१.९ प्रतिशतवरून ५.३ प्रतिशत) वाढत आहे. परिणामत: वर्गात उपस्थित राहण्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो.

**शालेय आधार संरचना :**

युनिसेफ(UNISEF) द्वारे, DISE व NUEPA यांनी केलेल्या सर्वेक्षणावरून साधारणत: शाळेची इमारत ही प्रत्येक शाळेजवळ होती. परंतु इतर पूरक सोयी जसे मुलींचे स्वतंत्र स्वच्छतागृह २४ प्रतिशत शाळांजवळ नाही. अपंगासाठी (ramp) रॅम्प ३५ प्रतिशत शाळांजवळ नाही तर खेळाचे मैदान ३८ प्रतिशत शाळांजवळ नाही. ४१ प्रतिशत शाळांना संरक्षक भिंती नाही. तसेच विद्यार्थी व वर्गखोलीचे प्रमाण यातही २००४-०५ मध्ये ४१ वरून २०१०-११ मध्ये ३१ पर्यंत घट झाली.

स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय, प्रयोगशाळा, काम्प्युटर इ.सोयी देखील नाहीत. विज्ञान प्रयोजगशाळेची गरज ४३ प्रतिशत शाळांना, तर ८२ प्रतिशत शाळांना संगणक प्रयोगशाळा व ७२ प्रतिशत शाळांना इंटरनेटची आवश्यकता आहे.

**शैक्षणिक अंदाजपत्रक :**

एकूण अंदाजपत्रकात शिक्षणासाठी जी तरतूद केली जाते, त्यामध्ये २००४-०५ ते २००९-१० या ५ वर्षात दुप्पटीने वाढ झाली. परंतु स्थूल राष्ट्रीय उत्पादाच्या प्रतिशत प्रमाणाच्या स्वरूपात मात्र ३.१ वरून २.९ पर्यंत घट झाली आहे. शैक्षणिक अंदाजपत्रकात प्राथमिक शिक्षणाला सर्वात जास्त प्राधान्य आहे. २०११-१२ या वित्तीय वर्षात शिक्षणावरील एकूण खर्चाच्या ५० प्रतिशत खर्च प्राथमिक शिक्षणावर केला गेला. शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत केंद्र व राज्याचा वाटा ६५:३५ असा आहे. २००६-०७ ते २००९-१० या काळात महाराष्ट्रातील खर्च १२ प्रतिशत तर बिहारमध्ये ७८ प्रतिशत तर राजस्थानमध्ये ७९ प्रतिशत होता.

जेव्हा प्रति विद्यार्थी खर्चाचा अभ्यास केला जातो तेव्हा राज्यस्तरीय शैक्षणिक खर्चाची प्रवृत्ती चांगल्या प्रकारे लक्षात येते. भारत सरकार शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत प्राथमिक स्तरावरील प्रति विद्यार्थ्यांवर ९५० रू. खर्च करते. भारतातील निरनिराळ्या राज्यात याबाबत तफावत दिसून येईल. राजस्थान व छत्तीसगडमध्ये १३०० रू. प्रतिविद्यार्थी तर महाराष्ट्रात ८७५ रू. प्रति विद्यार्थी खर्च केले

जातात. जेव्हा राज्यातील प्राथमिक खर्चाबाबत अंदाजपत्रकीय तरतूद आणि केंद्राचे अनुदान यांचे एकत्रीकरण केले तेव्हा महाराष्ट्रातील प्रतिविद्यार्थी खर्च ९६३५ रू. एवढा असून तो पश्चिम बंगाल व मध्यप्रदेश आणि राजस्थान यांच्या तुलनेत जास्त होता.

थोडक्यात महाराष्ट्राचा साक्षरता दराबाबत २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये (७६.९ वरून ८२.९ ) प्रगती झालेली दिसून येत असली तरी समानतेच्या दृष्टीकोनातून व शिक्षणाच्या गुणवत्तापूर्ण पातळीकरिता अजून प्रयत्नांची शिकस्त होणे आवश्यक आहे.

**ग्रामीण महाराष्ट्रातील शिक्षणा सुधारणा करण्यासाठी नियोजन :**

Indian Institute of Education ने २००४ मध्ये नंदूरबार, जालना व यवतमाळ या तीन मागासलेल्या जिल्ह्याच्या अभ्यासावरून गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दृष्टीने. शिक्षणाचे धोरण ठरवितांना काही महत्त्वाच्या बाबी लक्षात घ्याव्या याकरिता शिफारशी केल्या आहेत.

१) सध्याचे शाळेचे नियम लहान वस्तीसाठी लागू होत नाही. राज्यातील हवामान, पाऊसपाणी व स्थलांतरांचा कालावधी लक्षात घेऊन जर धोरण ठरविले तर सार्वत्रिकरित्या शाळेतील नोंदणी व उपस्थिती वाढू शकेल.

२) स्थानिक संस्कृती लक्षात घेऊन अभ्यासक्रम तसेच पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह व खेळाचे मैदान असल्यास उपस्थिती वाढून गळतीचे प्रमाण कमी होईल.

३) शालेय वातावरणात ग्रामीण व मागासलेल्या विद्यार्थ्यांना वर आणण्याच्या दृष्टीने NGO चे सहकार्य घेऊन उपक्रम राबविणे व शिकण्याचा कल वाढेल असे प्रयत्न करणे.

४) वर्गातून घेतलेल्या ज्ञानाचा त्यांना प्रत्यक्ष व्यवहारात वापर करता येईल अशाप्रकारे त्यांच्या क्षमता वाढविणे व परिक्षा घेणे.

५) शिक्षकांची निवड स्थानिक पातळीवरून तसेच त्यांच्या प्रवर्गातून केल्यास शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेत चांगल्या प्रकारे शिकवू शकेल. शिक्षणाचे प्रमाण व दर्जा वाढविण्यावर भर देण्यास प्रेरणा मिळेल.

६) मध्यान्ह भोजनाची परिणामकाकारक अंमलबजावणी करण्यात यावी. जेणेकरून विद्यार्थ्यांची गळती थांबेल.

स्थानिक समाजाने शाळा व शालेय प्रक्रियेला स्वीकारणे ही त्यांच्यात शाळेची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने पहिली पायरी आहे, जेणे करून शाळा बाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण घटेल.

मानव विकासात शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी लक्षात घेणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सूचवलेल्या उपायांची कार्यक्षम व परिणामकारक अंमजबजावणी करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१) Govt.of Maharashtra (2014) : Maharashtra Human Development Report, 2012.

२) जहागिरदार मुक्ता (२०११) : अर्थवेध, सेंटर फॉर एकॉनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती.

३) Dholkia Ravindra (2003) : Regional Disparity in Economic & Human Development, EPW No. 39.

◆◆◆

# मानव विकास कार्यक्रम : यवतमाळ जिल्हा

**आर.बी. भांडवलकर**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
अमोलचंद महाविद्यालय, यवतमाळ

**प्रास्ताविक :**

कोणत्याही विकासाचा केंद्रबिंदू मानव असतो. हा विचार आता सर्वमान्य झाला आहे. तसेच विकास हे प्रत्येक देशाचे, समाजाचे, कुटुंबाचे आणि व्यक्तीचे उद्दिष्ट असते नव्हे मानव विकास हा सर्वांगीण विकास करण्याची गुरूकिल्ली आहे. एखाद्या राज्यात किंवा देशात होणाऱ्या आर्थिक विकासाचे फायदे काही लोकांपर्यत मर्यादीत ठेवायचे नाहीत तर ते अधिकाधिक गरजू लोकांपर्यत परिणामकारकरित्या पोहचविणे हे विकास साध्य करण्याइतकेच महत्वाचे आहे. कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये मानव विकास ह्या संकल्पनेला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. भारताचा आणि राज्याचा विकास हा ग्रामीण विकासाशी निगडीत आहे. सन १९५१ ते २०१४ या कालखंडामध्ये भारताने फार मोठा विकास केल्याचे दिसून येते. या कालखंडामध्ये अतिरिक्त लोकसंख्या वाढ ही भारताच्या आर्थिक व सामाजिक विकासाला खीळ घालणारी ठरली आहे. कारण लोकसंख्येची वाढ आणि विकासाची वाढ ह्यात समन्वय असल्याचे दिसत नाही. सन २००१ ते २०११ या दशकामध्ये जगाच्या लोकसंख्येत १२.९७ टक्के वाढ झालेली आहे. याच काळात भारताच्या लोकसंख्येत १७.६४ टक्के वाढ झाली तर लोकसंख्येत प्रथम क्रमांक असलेल्या चीनच्या लोकसंख्येत ५.४३ टक्के वाढ झाली. ही वाढ देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला गतिमान करणारी नाही उलट ती एक गंभीर समस्या ठरली आहे. दुसऱ्या बाजूने लोकसंख्या ही श्रमशक्तीचा पुरवठा करणारा आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा पैलू आहे. त्यामुळे मानवी संसाधनाच्या विकासाचा प्रश्न उपस्थित होतो.

देशाचे राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न यावरून देश विकसित, अविकसित समजला जात असे, परंतु यावरून त्या देशाचे वास्तवचित्र स्पष्ट होत नव्हते म्हणून विकासाचे सर्वसमावेशक निर्देशांक तयार करून आर्थिक विकासाचे मापन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मानव विकास ही संकल्पना मांडण्याचे श्रेय पाकिस्तानातील अर्थतज्ञ महबुब – उल–हक आणि भारतीय अर्थतज्ञ अमर्त्य सेन यांना दिले जाते.तसेच Martha Nussbaum,Ingrid Raheyns, Des Gasper,Sabina Alkire यांचे सुद्धा योगदान महत्त्वाचे ठरले आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या विकास कार्यक्रमाद्वारे (UNDP) सदस्य राष्ट्रासाठी सन १९९० पासून दरवर्षी मानव विकास अहवाल प्रसिद्ध करण्यात येतो. प्रत्येक सदस्य देशाचा विकास निर्देशांक काढून देशाची मानव विकासानुसार क्रमवारी लावणे हे या अहवालाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

मानव विकास ही संकल्पना आर्थिक वृद्धी आणि आर्थिक विकास या संकल्पनेपेक्षा व्यापक असल्यामुळे योजनाकार, संशोधक आणि धोरणकर्ते

या सर्वांच्या दृष्टीने स्वीकारणीय बनलेली आहे. नव्हे तर आर्थिक विकासाने मानवाचा विकास साधला गेला तरच आर्थिक प्रगती खऱ्या अर्थाने फलस्वरूप ठरली असे म्हणता येईल. मानव विकास निर्देशांक तीन निकषाच्या आधारे काढला जातो १) लोकांचे सरासरी आयुर्मान २) शैक्षणिक स्तर ३) राहणीमानाचा दर्जा (दरडोई उत्पन्न). थोडक्यात शिक्षण, आरोग्य आणि उत्पन्न या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूंसाठी दिलेला लढा व त्याची प्रत्यक्षात झालेली पूर्तता याचा मिलाफ म्हणजे मानव विकास होय. म्हणजेच लोकांना उपलब्ध असलेल्या निवड पर्यायाचा विस्तार करण्याची प्रक्रिया होय. मानवी गुणवत्ता वाढविण्यासाठी विकासाचे वास्तव ध्येय निर्देशित करणारी संकल्पना म्हणजे मानव विकास होय. संयुक्त राष्ट्रसंघाने मानव विकास निर्देशांक तयार करतांना विचारात घेतलेल्या पैलूचे मूल्य ० ते १ च्या दरम्यान असते. ज्या देशाचा निर्देशांक ०.८०० पेक्षा जास्त असेल तो देश उच्च मानव विकास असणारा तर ०.५०० ते ०.८०० च्या दरम्यान असणारा देश मध्यम निर्देशांक असणारा आणि ०.५०० पेक्षा कमी निर्देशांक मूल्य असणारा अल्प मानव विकास असणारा देश समजला जातो. भारत मध्यम प्रतीचा मानव विकास साध्य करणाऱ्या देशाच्या यादीत समाविष्ट आहे.

आज जगातील सर्वच देश लोकसंख्येच्या गुणवत्तेवर भर देणाऱ्या मानव विकासाला प्राधान्य देत आहे.'जागतिक मानव विकास अहवाल- २०१४' हा २३ जुलै २०१४ रोजी प्रसिद्ध झाला. जागतिक क्रमवारीत भारत ०.५८६ निर्देशांकासह १३५ व्या स्थानी असून मानव विकासाच्या बाबतीत भारताची तुलना फक्त सब-सहरान आफ्रिकेतील मागास देशासोबतच होवू शकते. जगाचा सरासरी मानव विकास निर्देशांक (०.७०२) आहे. त्यापेक्षा भारतातचा निर्देशांक (०.५८६) लक्षणीय स्वरूपात अल्प आहे. मानव विकास निर्देशाकांच्या कसोटीवर मागील तीन दशकात भारताचा सरासरी वार्षिक वृद्धीदर कमालीचा निराशाजनक असून भारताची वाटचाल अतिशय संथ आहे. सन १९८०-९० च्या दशकात मानव विकास निर्देशांकाचा सरासरी वृद्धीदर १.५८, सन १९९०-२००० च्या दशकात सरासरी वृद्धीदर १.१५ तर २०००-२०१३ दरम्यानच्या वृद्धीदर १.४९ इतका आहे. भारतात नियोजन आयोगाद्वारे सन २००९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या मानव विकास अहवालामध्ये १५ राज्याचे मानव विकास निर्देशांक तयार केलेले गेलेत. त्यामध्ये महाराष्ट्राचा चवथा क्रमांक (०.५७२) होता. महाराष्ट्र राज्याने आपला पहिला मानव विकास अहवाल सन २००२ मध्ये प्रकाशित केला. त्यानुसार राज्यातील सर्वात जास्त मानव विकास निर्देशांक मुंबई व मुंबई उपनगर (१.००) जिल्ह्याचा असून सर्वात कमी मानव विकास निर्देशांक गडचिरोजी जिल्ह्याचा (०.२१) आहे.

थोडक्यात, भारतात विविध राज्यात विविध विभागातील सर्वात जास्त व सर्वात कमी मानव विकास निर्देशांकातील विषमता गुणांक (३६.५५) महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मानव विकास निर्देशांकात विभाग निहाय असमानता दिसून येते. पर्यायाने महाराष्ट्रात प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे. सन २०१२-१३ नुसार कोकणविभागाचा मानव विकास निर्देशांक (०.७२३) सर्वात जास्त असून औरंगाबाद विभागाचा मानव विकास निर्देशांक (०.६१३) सर्वात कमी आहे. सन २०१४ मध्ये 'महाराष्ट्र मानव विकास निर्देशांक अहवाल २०१२' प्रकाशित करण्यात

आला. या अहवालामध्ये बराच बदल झालेला दिसून येतो.

महाराष्ट्र राज्याच्या मानव विकासावर दृष्टीक्षेप टाकल्यास असे दिसून येते की, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यामध्ये मागासलेपणाचे प्रमाण खूप जास्त आहे. विदर्भातील यवतमाळ जिल्हा आदिवासी बहुल म्हणून ओळखला जातो. सन २००२ नुसार यवतमाळ जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक ०.२२ असून राज्यात जिल्ह्याचा शेवटून दुसरा क्रमांक आहे. मानव विकास निर्देशांकानुसार यवतमाळ जिल्हा हा खाली असून मुंबई व बृहनमुंबई आणि यवतमाळ जिल्हा यामध्ये साधारणपणे पाचपट अंतर आहे. मानव दारिद्य निर्देशांकामध्ये यवतमाळ जिल्हा २५ व्या क्रमांकावर आहे. म्हणजेच वंचित लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. साक्षरता दर ७४.०६ टक्के आहे हा दर राज्य साक्षरता दरापेक्षा कमी आहे. साक्षर स्त्रियापैकी ९० टक्के स्त्रिया बेरोजगार आहे. जिल्ह्याचा अर्भक मृत्यूदर १२४ आहे. तर बालमृत्यू दर १४३ आहे. हा दर राज्य सरासरीपेक्षा जास्त आहे. जिल्ह्याच्या मागासलेपणांची विकासातील असमतोल आणि अनुशेष ही प्रत्यक्ष कारणे आहेत.अलीकडे हा जिल्हा ग्रामीण शेतकऱ्यांच्या आत्महत्यामुळे संपूर्ण देशात ओळखला जातो. नव्हे तर साक्षरता दर, दरडोई स्थूल उत्पादन, जिल्ह्याचे निव्वळ व दरडोई उत्पन्न, दरडोई उपभोग खर्च, घरगुती उद्योगधंदे, प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक क्षेत्रातील उद्योगधंदे, विशेष आर्थिक क्षेत्र आणि प्रशासकीय सेवेतील अनुशेष इत्यादी बाबतीत खूपच मागे आहे.

**३. महाराष्ट्र मानव विकास मिशन :**

महाराष्ट्र राज्यातील १२ अतिमागास जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक उंचावण्याकरिता दि.२९ जून २००६ च्या शासन निर्णयान्वये 'महाराष्ट्र मानव विकास मिशन'ची स्थापना करण्यात आली आहे. आरोग्य, शिक्षण आणि उत्पन्न वाढ याबाबीशी संबंधित स्थानिक गरजेनुसार विविध योजना आपल्या कार्यक्षेत्र जिल्ह्यातील २५ तालुक्यामध्ये राबविल्यामुळे तालुक्याच्या मानव विकासंबंधीच्या अनेक निर्देशांकात लक्षणीय वाढ झाली. सन २०११-१२ पासून २२ जिल्ह्यातील १२५ तालुक्यामध्ये सदर कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, झरी-जामणी, उमरखेड, आर्णी, महागांव, घाटंजी, केळापूर, मारेगांव व कळंब अशा ९ तालुक्याचा समावेश करण्यात आला. तसेच उमरखेड, घाटंजी, पांढरकवडा, आर्णी या 'क' वर्ग नगरपालिकांचा समावेश सुद्धा करण्यात आला. मानव विकास कार्यक्रम या क्षेत्रातील गावांमध्ये प्रभावीपणे राबवून यवतमाळ जिल्ह्यात शिक्षण, आरोग्य व स्वयंरोजगारविषयक सोयी-सुविधा लाभार्थ्यांपर्यत पोहचविण्याचा प्रयत्न जिल्हा नियोजन व विकास अंतर्गत करण्यात आला.

तक्ता क्र.१ वरून जिल्ह्यातील शैक्षणिक स्तर उंचावण्याकरिता मानव विकास कार्यक्रमांतर्गत १० वी तील ४७३८ आणि १२ वीतील १७१३ मुलांमुलीकरिता शिकवणी वर्ग सुरू करण्यात आले तसेच १९२ अभ्यासिका सुरू करून ३४६७० विद्यार्थ्यांना लाभ प्राप्त झाला. प्रत्येक तालुक्यातील एसटी महामंडळाला विद्यार्थ्यांच्या वाहतुकीकरिता प्रत्येकी पाच बस याप्रमाणे एकूण ४५ बसगाड्या उपलब्ध करून देण्यात आल्यात. त्यांचा ४०२८ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.२२६ शाळा प्रयोगशाळांना साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. यामुळे निश्चितच शिक्षणाच्या दृष्टीने प्रगती झाल्याचे आढळून येते. आरोग्य सुविधेअंतर्गत ० ते ६ वयोगटातील बालकाची तपासणी करून तसेच गरोदर

तक्ता क्र.१

यवतमाळ जिल्ह्यात मानव विकास कार्यक्रमाची स्थिती

[redacted]

| | |
|---|---|
| [redacted] | …रिता साय क्षण |
| [redacted] | …र्च [redacted] लाख |
| [redacted] | २६ |
| [redacted] | ३० |
| [redacted] | ३० |
| [redacted] | ३० |
| [redacted] | ३० |
| [redacted] | २४ |
| [redacted] | ३० |
| [redacted] | ३० |
| [redacted] | २९ |
| [redacted] | २५९ |

[redacted]

मातांची तपासणी करून कुपोषण आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. बाळंत महिलांना त्यांच्या बुडणाऱ्या मजुरी पोटी रूपये ६.१६८ लाख चे वाटप करण्यात येवून त्यांच्या आरोग्याची सुद्धा काळजी घेण्यात आली. आदिवासी क्षेत्रातील किशोरवयीन मुलींच्या आरोग्याची दखल घेवून त्यांना व्यवसाय प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात आले. एकूण १२१८० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतलेला आहे. तसेच २६७७ लाभार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराकरिता कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवून २५९ लक्ष रूपये खर्च करण्यात आले. थोडक्यात या कार्यक्रमाचा परिणाम सन २०१२ मध्ये महाराष्ट मानव विकास अहवाल प्रकाशित झाला. त्यामध्ये यवतमाळ जिल्ह्याच्या दृष्टीने सकारात्मक दिसून येतो.

सन २००२ च्या मानव विकास अहवालामध्ये शेवटून दुसरा क्रमांक असणाऱ्या यवतमाळ जिल्ह्याचा समावेश मध्यम वर्गामध्ये झाला आणि तो शेवटून १३ क्रमांकावर सन २०१२ च्या अहवालामध्ये पोहचलेला दिसतो. सन २०१२ च्या अहवालानुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २७,७५,४५७ असून स्त्रियांची संख्या १३,४९,८६४ एवढी आहे. एक हजार पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण ९४७ असून लोकसंख्येची घनता २०४ आहे. मानव विकास निर्देशांक १० वर्षामध्ये ०.५९२ वरून ०.७०० पर्यंत वाढलेला आहे. तसेच जिल्ह्याचा GER ७०.३ वरून ८४.९ तसेच IMR ६१ वरून ४७ पर्यंत घटला आहे. साक्षरतेचे प्रमाण सुद्धा ७३.६ प्रतिशत वरून ८०.७ प्रतिशतपर्यंत झाले आहे. हे आकडे महाराष्ट्राच्या सरासरीच्या थोड्याफार प्रमाणात कमी असले तरी यासंपूर्ण चढत्या आलेखामध्ये मानव विकास कार्यक्रमांची भूमिका महत्त्वाची ठरल्याचे दिसून येते. जिल्ह्यात घाटंजी, झरी-जामणी, आणी, मारेगांव तालुक्यात फ्लोराईडयुक्त पिण्याच्या पाण्यामुळे कुपोषण व आजारपणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळून येते. याभागात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा कार्यक्रम मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविणे गरजेचे आहे. जिल्ह्यात आरोग्य सुविधा उपलब्ध होण्याचे दृष्टीने प्राथमिक आरोग्य उपचार केंद्राची संख्या, ग्रामीण रूग्णालये नव्याने स्थापन करून ती अद्यावत करण्याची गरज निमाण झाली आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात बऱ्याच प्रमाणात स्थिती समाधानकारक असली तरी आरोग्याचे बाबतीत असमाधानकारक अवस्था आहे. मानव विकास निर्देशांकाच्या तिसऱ्या महत्त्वाचे घटकामध्ये रोजगार व स्वयंरोजगारांच्या संधी जिल्ह्यात निर्माण झाल्या नाहीत. वास्तविक जिल्ह्यातील कापूस व सोयाबीन या शेतीउत्पादनावर प्रक्रिया उद्योग धंदे निर्माण होण्यास मोठा वाव आहे. तसेच उपलब्ध खनिज संपत्ती आणि जंगले यावर आधारित लघु उद्योग उभे राहिल्यास दरडोई उत्पन्नात वाढ होण्यास मदत होवू शकते. या सर्व उपायांचा वापर पूर्ण क्षमतेने केल्यास निश्चितच यवतमाळ जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक उच्च पातळीपर्यंत पोहोचू शकेल. याकरिता मानव विकास कार्यक्रमांची भूमिका महत्त्वाची असून त्यांच्या कार्यकक्षेमध्ये वाढ करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**संदर्भ :**


१) मानव विकास अहवाल २००२ व २०१२ म.रा.
२) यवतमाळ जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल
३) मानव विकास मिशन, औरंगाबाद वार्षिक अहवाल २०१२-१३.


◆◆◆

# भारतातील प्रांतनिहाय मानव विकासाची तुलनात्मक स्थिती

**वैभव अर्मळ**
संशोधन सहाय्यक, वुमेन्स स्टडी सेंटर,
सं.गा.बा.अमरावती विद्यापीठ, अमरावती

**प्रस्तावना :**

विकासाच्या संदर्भात मानव विकासाची कल्पना आजकाल महत्त्वाची मानली जाते. मानव विकासाच्या दृष्टीने एखाद्या देशाची स्थिती लक्षात घेणे महत्त्वाचे आहे तसेच इतरांच्या तुलनेत आपण कुठे आहोत, याचीही उत्सुकता असते. त्यामुळे मानव विकासाचा देशनिहाय किंवा प्रांतनिहाय विचारही महत्त्वाचा आहे. मानव विकास अधिक चांगल्या प्रकारे साध्य केलेल्या देशांच्या परिस्थितींचे, त्यांनी मानव विकास वाढविण्यासाठी केलेल्या उपायांचे स्वरूपातून मानव विकासा बाबतीत मार्गदर्शन प्राप्त होऊ शकते. या दृष्टीने या ठिकाणी भारताच्या तसेच भारतातील भिन्न प्रांताच्या तुलनात्मक आढावा घेण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. मानव विकासाचा मानव विकास अहवालात मानव विकासाची संकल्पना, मानव विकासांच्या संदर्भात वेगवेगळे विषय, मानव विकासासाठी कशा प्रकारे प्रयत्न व्हावेत याचे मार्गदर्शन असते. तसेच जगातील भिन्न देशांतील मानव विकासाच्या दृष्टीने स्थितीचे विवरण व तुलना असते. UNDP ने १९९० पासून मानव विकास अहवाल तयार करण्यास सुरूवात केली. त्यानंतर जगातील अनेक देशांनी आपापल्या देशांचे मानव विकास अहवाल तयार करण्यास सुरूवात केली. भारताने सर्वप्रथम १९९९ मध्ये मानव विकास अहवाल तयार करून एकूण भारतातील स्थिती तसेच प्रांतनिहाय स्थितीचे विवेचन केले आहे. तसेच मानव विकासाच्या भावी वाटचाली साठी उपाय सूचवले गेले. भारताप्रमाणेच भारतातील बहुतेक राज्यांनी मानव विकास अहवाल तयार केलेलेआहे. भारतात सर्वप्रथम मध्यप्रदेश या राज्याने मानव विकास अहवाल तयार केला. मध्यप्रदेश या राज्याचे आतापर्यंत सर्वात जास्त म्हणजे १९९५, १९९८, २००२ व २००७ असे चार अहवाल प्रकाशित झालेले आहे.

**मानव विकास – अर्थ व स्वरूप :**

''विकास'' ही जगातील सार्वधिक महत्त्वपूर्ण बाब मानली जाते. विकासात उत्पन्न वाढीला महत्त्व दिले जातेच परंतु ते पुर्णत: पुरेसे नाही. कारण एक देशाचे उत्पन्न किंवा दरडोई उत्पन्न जास्त असूनही दारिद्र्याचे प्रमाण अधिक दिसते, तसेच दरडोई उत्पन्न जास्त असूनही आरोग्य व साक्षरतेचा दर कमी दिसतो. म्हणजेच विकासाची अनुभूती ही पूर्णत: येत नाही. त्यामुळे विकास या संकल्पनेत केवळ आर्थिक विकासाचा वा उत्पन्न वाढीचा विचार न करता मानव विकास या संकल्पनेचा उदय झाला. मानव विकास या संकल्पनेत उत्पन्नाला ज्या प्रमाणे १/३ प्रमाण दिले त्याप्रमाणे आरोग्य व शिक्षण या घटकांना सुद्धा प्रत्येकी १/३ प्रमाण दिल्याने मानव विकास संकल्पना

महत्त्वाची मानली गेली. शिक्षण, आरोग्य आणि उपजिविकेचे साधन या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या पैलूंसाठी दिलेला लढा आणि प्रत्यक्षात झालेली पूर्तता, म्हणजेच मानव विकास होय. लोकांना मिळणाऱ्या संधीचा परीघ मोठा करण्याची प्रक्रिया म्हणजे मानव विकास होय. लोकांना दीर्घ व निरोगी जीवन जगण्याची, शिक्षण घेण्याची व चांगले राहणीमान उपभोगण्याची संधी मिळणे हे मानव विकासात महत्त्वाचे मानले जाते. यातून निवडीची कक्षा विस्तारणे व कल्याण किंवा सुस्थिती प्राप्त करणे याचं सांगड मानव विकास या संकल्पनेत घातली जाते. सक्षम मानव निर्मितीसाठी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शुद्ध पिण्याचे पाणी या सुविधा महत्त्वाच्या आहेत आणि या सर्व सुविधा प्राप्त करण्यासाठी झालेले प्रयत्न म्हणजे मानव विकास वृद्धींगत करणे होय.

**मानव विकास निर्देशांकाचे स्वरूप :**

१९९० पासून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमातर्फे अमर्त्य सेन आणि महबूब उल हक यांच्या प्रेरणेतून मानव विकास अहवाल प्रकाशित केले जातात. मानव विकास अहवालांमध्ये शिक्षण, आरोग्य व उत्पन्न हे निकष महत्त्वाचे मानले गेले. त्यामुळे मानव विकासाची ही प्रमुख निर्देशके आहेत. या निर्देशकांच्या आधारे मानव विकास कितपत झाला आहे हे समजायला मदत होते. मानव विकास निर्देशांक तयार करतांना आरोग्याच्या विचारात आयुर्मान, शिक्षणाच्या विचारात साक्षरता दर व शिक्षणाची सरासरी वर्ष, राहणीमानाच्या विचारात स्थूल राष्ट्रीय उत्पन्न व क्रयशक्तिच्या स्वरूपात दरडोई उत्पन्न या प्रमुख बाबी विचारात घेवून मानव विकास निर्देशांक काढला जातो. या परिमाणानुसार प्रत्येक राष्ट्रातील स्थितीचे अध्ययन करण्यासाठी विशिष्ट सूत्राद्वारे भूमितीय मध्य काढून मानव विकास निर्देशांक मूल्य काढल्या जाते.

$$HDI = \sqrt[3]{(\text{दीर्घायु जीवन} \times \text{ज्ञान} \times \text{राहणी मानाचा दर्जा})}$$

सुत्राप्रमाणे मिळालेल्या गुणांकानुसार मानव विकासाच्या पुढील चार वर्गवारी केल्या जातात.मानव विकास देशनांक हा सर्वाधिक १ असू शकतो.

| अ.क्र. वर्गवारी | गुणांक |
|---|---|
| १. अति उच्च मानव विकास | ०.८०० पेक्षा जास्त |
| २. उच्च मानव विकास | ०.७०० ते ०.७९९ |
| ३. मध्यम मानव विकास | ०.५५० ते ०.६९९ |
| ४. निम्म मानव विकास | ०.५५० पेक्षा कमी |

देशाचे, प्रांतांचे मानव विकास निर्देशांक ज्या गटात मोडतात, त्यानुसार त्यांची वर्गवारी करण्यात येते.

**भारताच्या संदर्भात मानव विकास देशनांक :**

भारतात सर्वप्रथम १९९९ मध्ये मानव विकास अहवाल तयार करण्यात आला. या अहवालामध्ये राज्य व राष्ट्रीय पातळीवर असणारा शिक्षणाचा दर्जा, आरोग्य पातळी, रोजगार, राहणीमानाची पातळी या सर्वांचा आढावा घेतला आहे. २००१ मधील भारताच्या मानव विकास अहवालामध्ये भारतातील राज्यांतर्गत विविध निकषांच्या आधारे तुलना केली आहे. भारताच्या २०११ च्या मानव विकास अहवालात ''सामाजिक समावेशन'' हे सुत्र मध्यवर्ती ठेवून त्याचा होणारा एकत्रित परिणाम व त्यातून निष्पन्न होणारी विकासाची प्रक्रिया विशद केली आहे. या सर्व अहवालांमधून भारताच्या मानव विकासाची नेमकी स्थिती मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. भारतातील भिन्न प्रांताची मानव विकासाच्या दृष्टीने तुलना करण्यासाठी भारतातील प्रांतनिहाय मानव विकास निर्देशांक मूल्य व सापेक्ष स्थितीनुसार त्याच्या क्रमांकाचा विचार करू.

**तक्ता क्र.१**

**भारतातील प्रांतनिहाय मानव विकास निर्देशांक**

| अ.क्र. | प्रांत | HDI १९९९-२००० | Rank १९९९-२००० | HDI २००७-०८ | Rank २००७-०८ |
|---|---|---|---|---|---|
| १. | केरळ | ०.६७७ | २ | ०.७९० | १ |
| २. | दिल्ली | ०.७८३ | १ | ०.७५० | २ |
| ३. | हिमाचल प्रदेश | ०.५८१ | ४ | ०.६५२ | ३ |
| ४. | गोवा | ०.५९५ | ३ | ०.६१७ | ४ |
| ५. | पंजाब | ०.५४३ | ५ | ०.६०५ | ५ |
| ६. | इशान्यकडील राज्ये (आसाम सोडून) | ०.४७३ | ९ | ०.५७३ | ६ |
| ७. | महाराष्ट्र | ०.५०१ | ६ | ०.५७२ | ७ |
| ८. | तामिळनाडू | ०.४८० | ८ | ०.५७० | ८ |
| ९. | हरियाणा | ०.५०१ | ७ | ०.५५२ | ९ |
| १०. | जम्म काश्मीर | ०.४६५ | ११ | ०.५२९ | १० |
| ११. | गुजरात | ०.४६६ | १० | ०.५२७ | ११ |
| १२. | कर्नाटक | ०.४३२ | १२ | ०.५१९ | १२ |
| १३. | पं.बंगाल | ०.४२२ | १३ | ०.४९२ | १३ |
| १४. | उत्तराखंड | ०.३३९ | १६ | ०.४९० | १४ |
| १५. | आंध्रप्रदेश | ०.३६८ | १५ | ०.४७३ | १५ |
| १६. | आसाम | ०.३३६ | १७ | ०.४४४ | १६ |
| १७. | राजस्थान | ०.३८७ | १४ | ०.४३४ | १७ |
| १८. | उत्तरप्रदेश | ०.३१६ | १८ | ०.३८० | १८ |
| १९. | झारखंड | ०.२६८ | २३ | ०.३७६ | १९ |
| २०. | मध्यप्रदेश | ०.२८५ | २० | ०.३७५ | २० |
| २१. | बिहार | ०.२९२ | १९ | ०.३६७ | २१ |
| २२. | ओरिसा | ०.२७५ | २२ | ०.३६२ | २२ |
| २३. | छत्तीसगड | ०.२७८ | २१ | ०.३५८ | २३ |
| | भारत | ०.३८७ | | ०.४६७ | |

(स्रोत : भारताचा मानव विकास अहवाल २०११)

भारताच्या मानव विकास अहवाल २०११ मध्ये विविध प्रांतनिहाय मानव विकास निर्देशांक मूल्य दर्शविण्यात आले. भारताचे मानव विकास निर्देशांक मूल्य १९९९-२००० मध्ये ०.३८७ तर २००७-०८ मध्ये ०.४६७ झाल्याचे दिसते. म्हणजे दोनही वेळेस भारताचे मानव विकास निर्देशांक मूल्य हे निम्न मानव विकास या गटात मोडल्याचे दिसते. परंतु UNDP च्या २०१४ च्या अहवाला प्रमाणे भारताचे मानव विकास निर्देशांक मूल्य ०.५८६ असून भारत त्या दृष्टीने ''मध्यम मानव विकास'' गटाच्या वर्गवारीमध्ये मोडतो.

१९९९-२००० मधील भारताच्या सरासरी

मानव विकास निर्देशांक मूल्यापेक्षा भारतातील १७ प्रांतांचे मानव विकास निर्देशांक मूल्य अधिक होते व ६ प्रांताचे मानव विकास निर्देशांक मूल्य सरासरीपेक्षा कमी होते.

तसेच २००७-०८ मधील भारताच्या मानव विकास निर्देशांक मूल्यापेक्षा १५ प्रांताचे मानव विकास निर्देशांक मूल्य अधिक होते तर ८ प्रांताचे मानव विकास निर्देशांक मूल्य कमी होते. याचा अर्थ सरासरी मानव विकास निर्देशांकापेक्षा जास्त निर्देशांक असलेल्या प्रांतांची संख्या कमी होवून सरासरी खालील प्रांतांची संख्या वाढली आहे.

भारतातील सर्व प्रांतांचे मानव विकासाच्या दृष्टीने असलेले क्रमांक बघितले तर असे दिसून येते की, काही प्रांताचे मानव विकास क्रमांक स्थिर आहे तर काहींचे क्रमांक मागे पुढे झाल्याचे दिसते. १९९९-२००० मध्ये पंजाब, तामिळनाडू, कर्नाटक, पं.बंगाल, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व ओरिसा अशा एकूण आठ प्रांताचे मानव विकासाच्या दृष्टीने असलेले क्रमांक २००७-०८ मध्ये स्थिर आहे. १९९९-२००० पेक्षा २००७-०८ च्या मानव विकास क्रमांकात केरळ, हिमाचल प्रदेश, ईशान्येकडील राज्ये (आसाम सोडून), जम्मू कश्मीर, उत्तराखंड, आसाम, झारखंड या राज्यांच्या क्रमांकात सुधारणा दिसते तर दिल्ली, गोवा, महाराष्ट्र, हरियाणा, गुजरात, राजस्थान, बिहार, छत्तीसगड या राज्यांच्या संदर्भात १९९९-२००० पेक्षा २००७-०८ मध्ये मानव विकास क्रमांक मागे आल्याचे दिसते.

**प्रांतनिहाय मानव विकास :**

भारताच्या सर्व राज्यांचा मानव विकासाच्या संदर्भात संक्षेपाने भारतातील पाच प्रातांचा थोडा सविस्तर विचार करू. स्थूल आढावा घेतल्यानंतर भारतातील नमुना पाच प्रांतांच्या मानव विकासाचे स्वरूप व त्यांचे तुलनात्मक विवेचन करावयाचे आहे. महाराष्ट्र, केरळ, हिमाचल प्रदेश, आंधप्रदेश व मध्यप्रदेश या पाच नमुना प्रांतांतील मानव विकासाच्या संदर्भात तुलना करावयाची आहे. तसेच महाराष्ट्राच्या तुलनेत इतर चार प्रांताचा विचार करावयाचा आहे. या पाच प्रांतातील अद्ययावत मानव विकास अहवाल विविध कालखंडातील आहे. या गोष्टींची नोंद केली पाहिजे. महाराष्ट्राचा मानव विकास अहवाल २०१२ चा आहे. तर केरळ-२००७, हिमाचल प्रदेश-२००२, आंध्रप्रदेश-२००७ व मध्यप्रदेश-२००७ हा मानव विकास अहवालाचा कालखंड आहे. प्रथमत: भारताच्या मानव विकास अहवाल, २०११ नुसार या पाच नमुना प्रांतांची तुलना करू. तसेच तीन घटकांच्या आधारावर तुलना करतांना महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१३-१४ या अहवालाचा आधार घेतला आहे.

**तक्ता क्र. २**

**नमुना प्रांतांच्या मानव विकासाची तुलना**

| अ. क्र. प्रांत | मानव विकास निर्देशांक १९९९-२००० | मानव विकास निर्देशांक २००७-०८ |
|---|---|---|
| १. केरळ | ०.६७७ | ०.७९० |
| २. हिमाचल प्रदेश | ०.५८१ | ०.६५२ |
| ३. महाराष्ट्र | ०.५०१ | ०.५७२ |
| ४. आंध्रप्रदेश | ०.३६८ | ०.४७३ |
| ५. मध्यप्रदेश | ०२८५ | ०.३७५ |
| भारत | ०.३८७ | ०.४६७ |

(आधार : भारताचा मानव विकास अहवाल-२०११ प्रमाणे)

भारतातील १९९९-२००० मधील भारताच्या मानव विकास निर्देशांक ०.३८७ पेक्षा केरळ, हिमाचल प्रदेश व महाराष्ट्र या प्रांताचा मानव विकास निर्देशांक अधिक होता तर आंध्रप्रदेश व

मध्यप्रदेश या प्रांताचा कमी होता. २००७-०८ मधील भारताच्या मानव विकास निर्देशांक ०.४६७ पेक्षा केरळ, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र व आंध्रप्रदेश या प्रांताचा मानव विकास निर्देशांक अधिक होता तर मध्यप्रदेश या प्रांताचा कमी होता.

प्रांतनिहाय पाच प्रांताचा विचार केला असता असे दिसून येते की, सर्व म्हणजे पाचही प्रांताचा मानव विकास निर्देशांक १९९९-२००० पेक्षा २००७-०८ मध्ये वाढला आहे. या पाच प्रांतामध्ये सर्वात जास्त मानव विकास निर्देशांकामध्ये वाढ ही केरळ प्रांताची (०.११३) ने झाली तर सर्वात कमी मानव विकास निर्देशांकामध्ये वाढ ही हिमाचल प्रदेश व महाराष्ट्र या प्रांताची (०.०७१) ने झाली आहे. १९९९-२००० मध्ये या पाच प्रांतापैकी केरळ व हिमाचल प्रदेश हे दोन प्रांत मध्यम मानव विकास गटाच्या वर्गवारी मध्ये मोडले तर महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश हे प्रांत निम्म मानव विकास या गटाच्या वर्गवारीमध्ये मोडल्याचे दिसते. २००७-०८ मध्ये या पाच प्रांतापैकी केरळ, प्रांत उच्च मानव विकास गटाच्या वर्गवारीत मोडतो. तसेच हिमाचल प्रदेश व महाराष्ट्र हे दोन प्रांत मध्यम मानव विकास गटाच्या वर्गवारीमध्ये मोडतात. तर आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश हे दोन प्रांत निम्म मानव विकास गटाच्या वर्गवारीमध्ये मोडतात.

**प्रति व्यक्ती उत्पन्नातील भिन्नता :**

स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात व क्रयशक्तीच्या स्वरूपात वाढ झाल्यास मानव विकास निर्देशांकात वाढ होण्यास मदत होते. कारण देशातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी त्याचा उपयोग होतो. उत्पन्नात वृद्धी झाल्यास देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा वृद्धींगत होण्यास मोठ्या प्रमाणात फायदाचे होतो. त्यामुळे मानव विकासात वृद्धी करण्यासाठी उत्पन्न हा घटक मोलाची कामगिरी बजावतो.

**तक्ता क्र. ३**

**प्रांतनिहाय चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न**

| अ. क्र. | प्रांत | चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न | मानव विकास निर्देशांक |
|---|---|---|---|
| | | २०१२-२०१३ | २०११ |
| १. | केरळ | ८८,५२७ | ०.७९० |
| २. | हिमाचल प्रदेश | ८३,८९९ | ०.६५२ |
| ३. | महाराष्ट्र | १,०३,९९१ | ०.५७२ |
| ४. | आंध्रप्रदेश | ७८,९५८ | ०.४७३ |
| ५. | मध्यप्रदेश | ४४,९८९ | ०.३६५ |

(आधार : भारताचा मानव विकास अहवाल-२०११ प्रमाणे)

भारताच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा (६७,८३९ रू.)केरळ, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र व आंध्रप्रदेश या प्रांताचे दरडोई उत्पन्न हे अधिक आहे. तर मध्यप्रदेश या प्रांताचे उत्पन्न भारताच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा कमी आहे. २०१२-१३ प्रमाणे चालू किंमतीनुसार सर्वात अधिक दरडोई उत्पन्न महाराष्ट्र या प्रांताचे आहे तर सर्वात कमी दरडोई उत्पन्न मध्यप्रदेश या प्रांताचे आहे. केरळ या

प्रांताचे दरडोई उत्पन्न हे महाराष्ट्र या प्रांतापेक्षा कमी असूनही मानव विकास निर्देशांकाचे मूल्य सर्वात अधिक आहे.

**भारतातील प्रांतनिहाय साक्षरतेची टक्केवारी :**

उच्च दर्जाच्या मानव विकासासाठी शिक्षण महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणामुळे प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होते. शिक्षणाचा दर्जा वाढण्यासाठी साक्षरतेची टक्केवारी अधिक असणे आवश्यक आहे. त्यासाठी प्राथमिक, माध्यमिक व उच्च किंवा विद्यापीठाच्या शिक्षण विषयक सोयी सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. उच्च प्रतीची शिक्षणाची व्यवस्था असल्यास साक्षरतेची टक्केवारी वाढून मानव विकासाचे उद्दिष्ट साध्य होण्यास हातभार लागतो.

**तक्ता क्र. ४**

**प्रांतनिहाय साक्षरता व मानव विकास**

| अ.क्र. | प्रांत | साक्षरतेची टक्केवारी | | | मानव विकास निर्देशांक २०११ |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकूण | |
| १. | केरळ | ९६.११ | ९२.०७ | ९४.०० | ०.७९० |
| २. | हिमाचल प्रदेश | ८९.५३ | ७५.९३ | ८२.८० | ०.६५२ |
| ३. | महाराष्ट्र | ८८.३८ | ७८.८७ | ८२.३४ | ०.५७२ |
| ४. | आंध्रप्रदेश | ७४.८८ | ५९.१५ | ६७.०२ | ०.४७३ |
| ५. | मध्यप्रदेश | ७८.७३ | ५९.२४ | ६९.३२ | ०.३६५ |
| | भारत | ८०.८८ | ६४.६३ | ७२.९८ | ०.४६७ |

(आधार : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४)

२०११ मध्ये एकूण तसेच पुरूष व स्त्री साक्षरतेच्या टक्केवारीचा विचार केला तर असे दिसून येते की भारताच्या तुलनेत (७२.९८) केरळ, हिमाचल प्रदेश व महाराष्ट्र या प्रांताची साक्षरतेची टक्केवारी भारताच्या टक्केवारीपेक्षा अधिक आहे. तर आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश या प्रांताची मात्र कमी आहे. केरळ, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र यांची सरासरी साक्षरता ८० प्रतिशत पेक्षा जास्त तर ती आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश या प्रांतात ७० प्रतिशतपेक्षा कमी आहे. पुरूष साक्षरतेबाबत पहिला गट ९० प्रतिशत पेक्षा अधिक असून फक्त केरळ प्रांतांचा त्यात समावेश होतो. तर उर्वरित चार प्रांतात तो त्यापेक्षा कमी आहे. स्त्री साक्षरतेबाबत ८० प्रतिशत पेक्षा अधिक दर केरळ, हिमाचल प्रदेश व महाराष्ट्र या प्रांतांमध्ये आहे तर आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश या प्रांताची साक्षरता कमी आहे. पाच प्रांताचा साक्षरतेबाबत तुलनात्मक विचार केला तर साक्षरतेचा सर्वात जास्त सरासरी दर केरळ प्रांताचा (९४ प्रतिशत) आहे. पुरूष व स्त्री साक्षरता प्रमाणाबाबतही केरळ प्रांत प्रथम क्रमांकावर आहे. सरासरी साक्षरता दराबाबत केरळ नंतर अनुक्रमे हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र व मध्यप्रदेशचा क्रमांक लागतो. तसेच पुरूष व स्त्री साक्षरतेबाबतही त्याप्रमाणेच क्रमांक लागतो. आंध्रप्रदेश या प्रांताचा सरासरी, तसेच पुरुष व स्त्री साक्षरतेबाबत शेवटचा क्रमांक लागतो.

**आरोग्य या घटका संदर्भात प्रांतनिहाय स्थिती:**

चांगले आरोग्य असण्यासाठी राहणीमानाचा दर्जा अधिक असणे आवश्यक आहे. आरोग्य विषयक सोयीसुविधा असल्यास मृत्यूदर कमी होवून व्यक्तीला निरोगी जीवन मिळून त्याचा विकास होतो. पुरेशा

सार्वजनिक आरोग्य सेवांचा अभाव असल्याने ज्या प्रमाणात विकास व्हायला हवा त्या प्रमाणात होत नाही. चांगल्या आरोग्यामुळे राहणीमानाचा दर्जा, सरासरी आर्युमान यामध्ये वाढ होऊन मानव विकास वृद्धींगत होण्यास मदत होईल.

**तक्ता क्र.५**

**भारतातील प्रांतनिहाय जन्मदर, मृत्यूदर, अर्भक मृत्यूदर**

| अ.क्र. | प्रांत | जन्मदर २०१२ | मृत्यूदर २०१२ | अर्भक मृत्यूदर IMR २०१२ | मानव विकास निर्देशांक २०११ |
|---|---|---|---|---|---|
| १. | केरळ | १४.९ | ६.९ | १२ | ०.७९० |
| २. | हिमाचल प्रदेश | १६.२ | ६.७ | ३६ | ०.६५२ |
| ३. | महाराष्ट्र | १६.६ | ६.३ | २५ | ०.५७२ |
| ४. | आंध्रप्रदेश | १७.५ | ७.४ | ४१ | ०.४७३ |
| ५. | मध्यप्रदेश | २६.६ | ८.१ | ५६ | ०.३६५ |
| | भारत | २१.६ | ७.० | ४२ | ०.४६७ |

(आधार : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४)

भारताच्या सरासरी जन्मदरापेक्षा (२१.६) मध्यप्रदेश या प्रांताचा जन्मदर अधिक आहे. तर इतर चार प्रांताचा जन्मदर कमी आहे. भारताच्या सरासरी मृत्यूदरापेक्षा (७.०) आंधप्रदेश व मध्यप्रदेश या प्रांताचा मृत्यूदर अधिक आहे. तर इतर तीन प्रांतांचा मृत्यूदर कमी आहे. भारताच्या सरासरी अर्भक मृत्यूदरापेक्षा (४२) अर्भक मृत्यूदर मध्यप्रदेश या प्रांताचा अधिक आहे तर इतर चार प्रांताचा कमी आहे.

**सारांश :**

उपरोक्त तीनही घटकांचा विचार करता असे दिसते की, केरळचा मानव विकास देशनांक सर्वाधिक आहे. तर मध्यप्रदेशचा सर्वात कमी. प्रती व्यक्ती उत्पन्नाचा विचार केला तर महाराष्ट्रातील प्रती व्यक्ती उत्पन्न सर्वात जास्त आहे. पण मानव विकास देशनांकात तो तिसऱ्या क्रमांकावर आहे. साक्षरतेच्या दराबाबत केरळ सर्वात वरच्या स्थानावर असून त्यापाठोपाठ हिमाचल प्रदेश व महाराष्ट्र आहे. मानव विकास देशनांकातील नमुना राज्यांचा क्रम असाच आहे. जन्मदर, मृत्यूदर आणि अर्भक मृत्यूदर केरळ मध्ये अन्य प्रांतांच्या तुलनेत सर्वात कमी आहे. जन्मदर आणि मृत्यूदर कमी राखण्यात हिमाचल प्रदेश आणि महाराष्ट्र केरळच्या पाठोपाठ आहेत.

साक्षरता दर वगळता मध्यप्रदेशात अन्य सर्व दर अन्य प्रांतांच्या तुलनेत प्रतिकूल असून तो पाच प्रांतांच्या क्रमवारीत सर्वात खाली दिसून येत आहे.

**संदर्भ :**


१) जहागिरदार दि.व्यं.(२००७) : आर्थिक जगत, खंड २, सेंटर फॉर एकॉ. ॲन्ड सो. स्टडीज, अमरावती.

२) जहागिरदार मुक्ता (२००३) : मानव विकास : आशय व निष्पत्ती, अर्थसंवाद, खंड २७.

३) Sakiko Fukada -Parrf (2007) : Readings in Human Develop., Oxford Uni. Press.

४) UNDP (2014) : Human Development Report.

५) Govt. of India (2011) : Human Development Report of India.

६) महाराष्ट्र शासन(२०१४) : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४


◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# बालकामगार समस्या व समाधान

## लेखक – आर.के.शेख

(प्रकाशक –प्रशांत पब्लिकेशन्स्, जळगांव. नोव्हें २०१४ किंमत: २७५/–)

**उमेश भा.घोडेस्वार**
अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला(महाराष्ट्र).

'बालकामगार : समस्या व समाधान' हे श्री शिवाजी महाविद्यालय अकोला येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.आर.के.शेख यांचे बालकामगारा–वरील मराठीतील दुर्मिळ पुस्तकांपैकी एक आहे. एक अभ्यासू प्राध्यापक म्हणून लेखक सुपरिचित आहेत. या पुस्तकाला अर्थतज्ञ डॉ.दि.व्यं.जहागीरदार यांची छोटेखानी प्रस्तावना असून त्यात त्यांनी डॉ.शेख यांच्या बालकामगाराविषयी असलेल्या अभ्यासू संशोधन व लेखनकार्याच्या गुणांना दाद दिली आहे.

विशेष म्हणजे यावर्षीच्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३८ व्या वार्षिक अधिवेशनात या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. तसेच याच वर्षीसाठी कैलाश सत्यार्थी व मलाला युसूफझाई यांना नोबेल घोषित झाले, या दोहोंना सदर पुस्तक अर्पण करुन बालकामगाराविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. बालकामागासारख्या ज्वलंत विषयावर २००७ मध्ये डॉ.शेख यांनी आचार्य पदवी संपादित केली आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय 'अकोला जिल्ह्यातील लघुउद्योगात काम करणाऱ्या बालकामगारांच्या समस्या व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण' हा होता.

संशोधनातून प्राप्त बालकामगारांविषयी प्रकाशित व प्रकाशित माहिती व बालकामगार विरोधी विविध कायदेस्वरुपातील माहिती एकत्रित करुन पुस्तक रुपाने प्रकाशित करुन अतिज्वलंत समस्येवर लेखकाने प्रकाश टाकला आहे. सदर पुस्तकात एकूण ७ प्रकरणांचा अंतर्भाव केला आहे. पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणामध्ये लेखकाने बालकामगाराचे स्वरुप यथोचितरित्या व्यक्त केले आहे. बालकामगारांचे वास्तव जणू त्यांनी शब्दरुपात वाचकांसमोर मांडले आहे. दुसऱ्या प्रकरणात बालकामगारांचा अर्थ, उगम व इतिहास यावर दृष्टीक्षेप टाकला आहे. बालकामगार या समस्येला औद्योगिक क्रांतीची पार्श्वभूमि आहे, शिवाय बालकामगार ही नव्याने उद्भवलेली समस्या नसून पूर्वकाळापासूनचीच आहे. म्हणजे प्राचीन भारतात देखील तिचे अस्तित्व कमी–अधिक प्रमाणात दिसून येते असे महत्वाचे प्रतिपादन लेखकाने केले आहे. सदर प्रकरणात वाचकाला बालकामगार म्हणजे नेमके कोण ? त्यांची परिभाषा नेमकी कोणती ? या प्रश्नांची समर्पक उत्तरे मिळतात.

पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणात बालकामगार कारणे, परिणाम व समस्या याचा उहापोह केलेला आहे. बालकामगार समस्या आणि कारणे परस्परसंबंधित आहेत. दारिद्र्य, बेकारी, पालकांचे अज्ञान, शैक्षणिक व कौटुंबिक प्रश्न, वाढती लोकसंख्या, कायद्यातील पळवाटा इत्यादी कारणे लेखकाने विशेषत्वाने मांडलेली आहेत.

बालकामगारांची व्याप्ती (Magnitude of

Child labour) ही पुस्तकाच्या चौथ्या प्रकरणात स्पष्ट केली आहे. यामध्ये १९७१ पासून तर २०११ पर्यंतची जनगणनानिहाय आकडेवारी देवून सदर पुस्तकात अद्यावत माहिती प्राप्त झाली आहे असे म्हणावे लागेल. वाचकाला या प्रकरणामधून बालकामगारांची व्याप्ती लक्षात येईलच सोबतच बालकामगारांचे वर्गिकरण देखील समजून येईल. तसेच लेखकाने भारतातील बालकामगारांची आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमि स्पष्ट केली आहे. तद्वतच आंतरराष्ट्रीय श्रम संघटना(ILO), राष्ट्रीय सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन(NSSO),राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प (NCLP) यांच्या व्दारे प्रस्तुत आकडेवारी व बालकामगारांविषयी माहिती नेमक्या व समर्पक भाषेत मांडण्याचा वास्तुपाठ लेखकाने दिलेला आहे.

बालकामगार ही एक समस्या आहे व त्यावर उत्तर देखील आहे असा महत्वपूर्ण विचार लेखकाने व्यक्त केला आहे. पुस्तकाच्या शीर्षकाला सार्थ अशी रचना सदर पुस्तकात दिसून येते. बालकामगारांच्या समस्या दूर करण्यासाठी कायदेशीर तरतूदी पुस्तकाच्या ५ प्रकरणात विशेषत्वाने मांडल्या आहेत. यामध्ये भारतीय संविधानातील बालकांविषयी असणाऱ्या विविध अनुच्छेदांचा मागोवा घेतला आहे. यासोबतच गेल्या १०० वर्षात भारतात बालमजुरीबाबत करण्यात आलेले कायदे स्पष्ट केलेले आहेत. १८८१ च्या फॅक्टरी ॲक्टपासून तर २०१४ चे बाल न्याय विधेयकावर लेखकाने समतोल बुध्दीने विश्लेषण केलेले आढळून येते.

बालकामगार या समस्येवर लेखकाने आचार्य पदवीकरिता संशोधन केलेले आहे, त्यासाठी विदर्भातील अकोला जिल्ह्यातील बालकामगांवर त्यांनी अभ्यास केलेला आहे. एका जिल्ह्यातील बालकामगारांचे जे प्रश्न व समस्या आहेत तेच कमीअधिक प्रमाणात सर्व जिल्ह्यात आढळून येतात. पुस्तकाच्या ६ व्या प्रकरणात अकोला जिल्ह्यातील लघू उद्योगात काम करणाऱ्या बालकामगारांच्या समस्या व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण केलेले आहे. यामध्ये बालकामगार निर्मूलनासाठी असलेले प्रकल्प, कार्यक्रम व कायदेविषयक माहिती वाचकांना निश्चितच उपयोगी ठरेल.

पुस्तकाचा शेवट ७ व्या प्रकरणाने होतो. ज्यामध्ये लेखकाने बालकामगारांसारख्या ज्वलंत प्रश्नावर केलेल्या अभ्यासावरुन जे महत्वाची निष्कर्ष काढले आहेत व ज्या उपाययोजना सूचविल्या आहेत त्यांचे विश्लेषण आढळून येते. केवळ एका जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील बालकामगारांची समस्या ही बहुआयामी आहे. उत्पन्न वितरणात व सामाजिक जागृतीत सुधारणा केल्यास या समस्येचे परिणामकारकरित्या उच्चाटन करणे शक्य होईल असा महत्वाचा निष्कर्ष लेखकाने काढला आहे.

थोडक्यात, बालकामगार समस्या व समाधान हे पुस्तक वाचल्यावर अभ्यासकांना या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात येते असे म्हणावे लागेल. अर्थशास्त्रातीलच नव्हे तर सामाजिक शास्त्रांतर्गत विविध विषयांच्या अभ्यासकांना व सुजाण वाचकांना सदर पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. बालकामगारासारख्या महत्वाच्या प्रश्नावर मराठी भाषेत पुस्तकांचा अभाव दिसून येतो परंतु डॉ.आर.के.शेख ह्यांच्या या पुस्तकाच्या रुपाने ही उणीव भरुन निघेल अशी रास्त अपेक्षा..!

◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# अर्थमंथन

**लेखक : दि.व्यं.जहागिरदार आणि मुक्ता जहागिरदार**

(प्रकाशक – सेंटर फॉर इकॉनॉमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती. किंमत: २५०/-, पृष्ठसंख्या –१८८)

**सोनल जनबंधू**
अर्थशास्त्र विभाग,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.

सेन्टर फॉर एकोनॉमिक ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती यांनी दि.व्यं.जहागिरदार आणि मुक्ता जहागिरदार लिखित 'अर्थमंथन' हे पुस्तक प्रकाशित केले आहे. १८८ पृष्ठ असलेल्या पुस्तकामध्ये एकूण १५ लेख आहे. या लेखाचे पाच प्रकारामध्ये वर्गीकरण करता येते. अर्थशास्त्र आणि नीतीशास्त्र यावर १ लेख, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रांवर ५ लेख, आर्थिक विकास, शिक्षण आणि पर्यावरण यावर ३ लेख, अभिमतपंथीय आणि केन्स यावर ३ लेख आणि भारतीय आर्थिक विचारवंतावर ४ लेख लेखकद्वयांनी लिहिलेले आहे.

पहिल्या लेखामध्ये अर्थशास्त्र आणि नीतीशास्त्र यांच्या मधील संबंधाचे विश्लेषण अभिमतपंथीय अर्थशास्त्रज्ञापासून अमर्त्य सेन यांच्या विचाराच्या चौकटीमध्ये लेखकांनी केले आहे. विवेकी वर्तनाचा विचार सामाजिक अर्थव्यवस्थेच्या बाबत कशा प्रकारे करता होईल याची मांडणी अमर्त्य सेन यांना अभिप्रेत आर्थिक विचाराच्या सहय्याने केली आहे.

दुसऱ्या लेखामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांताचे विवेचन केले आहे. परंपरागत आणि आधुनिक व्यापार सिद्धांत विकसित औद्योगिक देशात लागू होतात. विकसनशील देशांना ते लागू पडत नाही म्हणून विकसनशील देशांचा विकास घडवून आणणाऱ्या विकासनीतीच्या घटकावर आधारित आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांताचे विश्लेषण होण्याची गरज असल्याचे अधोरेखित करतात.

जोसेफ स्टिगलिट्झ आणि उदारीकरणाच्या संदर्भात विचार तिसऱ्या लेखामध्ये केला आहे. आर्थिक वृद्धी आणि उदारीकरण यामधील संबंध सरळ, निसंदिग्ध आणि शाश्वतीचा नसल्याचे लेखकांचे मत आहे. मात्र त्याचवेळी पूर्व आशियाई देशांनी तर्क आणि अनुभवाच्या आधारे प्रमेय मांडून आर्थिक वृद्धी आणि उदारीकरणामध्ये यश प्राप्त केल्याचे दिसून येते. समान लाभ आणि स्वाश्रयी विकास उदारीकरणाने प्राप्त होईल का असा प्रश्न लेखकांनी उपस्थितत केला आहे.

क्रुगमनला अभिप्रेत खुल्या व्यापाराचे विश्लेषण चवथ्या लेखामध्ये केलेले आहे. नवीन आर्थिक भूगोल सिद्धांतमध्ये कृषी क्षेत्रात संचयी कार्यकारण प्रभावामुळे विशेषीकरण केलेल्या देशाला सुद्धा संरक्षणाची अनिवार्य गरज निर्माण होते. या उलट निर्माणी क्षेत्रात केंद्राकर्षी व संचयी प्रक्रिया वेगवान व दृढमूल झाल्यामुळे निर्माणी क्षेत्रात विशेषीकरण झालेल्या देशांच्या उत्पन्नात वाढ होते. कृषी क्षेत्रात विशेषीकरण केलेल्या देशाला एकही

फायदा न मिळाल्यामुळे विषमता वाढते यावर लेखकद्वयांनी सहमती दर्शवली आहे. क्रुगमनची प्रतिमाने चांगल्या प्रकारे सिद्ध होत असून वास्तव स्थितीची सैद्धांतिक मांडणी हे क्रुगमन प्रतिमानाचे वैशिष्ट सांगितले आहे.

जगदीश भगवती यांच्या समता व्यापार तत्त्वाचे विवेचन पाचव्या लेखामध्ये केलेले आहे. अमेरिका समता व्यापाराचे तत्त्व इतर देशाच्या पुढे जाण्याकरिता वापरतो. समता व्यापार तत्त्व आणि नैतिक उद्दिष्टाच्या आवरणाचा वापर सोईस्कर साधन म्हणून वर्चस्व टिकविण्याकरिता आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये केला जातो . सध्याचे समता व्यापार तत्त्व न्यायाची उपेक्षा करते. म्हणून बाजार अर्थव्यवस्था या बाजारपेठीय समाज कशा प्रकारे बनणार नाही याचा गांभीर्याने विचार होण्याची गरज लेखकांनी स्पष्ट केली आहे.

सहाव्या लेखामध्ये शिक्षणाच्या आर्थिक विकासाच्या अनुषंगाने आढावा घेतांना शिक्षण हे विकासाचे सर्वाधिक महत्त्वाचे आदान आहे. उत्पादन वृद्धीकरिता शिक्षण आवश्यक आहे. भारतासारख्या देशाला शिक्षणाचा प्रभावीपणे उपयोग करावा लागतो कारण शिक्षण क्षमताच्या विस्ताराचे साधन आहे. भारतामध्ये शिक्षणासाठी विविध आयोग नेमल्या गेले, त्यांनी शिफारशी मोठ्या प्रमाणावर केल्या. मात्र शिक्षणासंबंधी राष्ट्रीय योजनेची मध्यवर्ती दृष्टी हरविल्याचे जाणवते. भारत शिक्षण साधन न बनण्याची खंत लेखकद्वयाने व्यक्त केली आहे.

लेखक प्रदूषणाची समस्या ही विषय विभाजनाची सिमा ओलांडून जाणारी समस्या मानतात. आर्थिक प्रश्नाची लक्षण वैशिष्टे प्रदूषणाच्या प्रश्नात आढळतात. म्हणून प्रदूषण समस्येचे आर्थिक विश्लेषण केल्या जाणे आवश्यक आहे. हितसंबंधाच्या पार्श्वभूमीवर प्रदूषणाचा प्रश्न सोडवावा लागतो पर्यावरणाचा मानवी समृद्धीसाठी उपयोग हा अवास्तव दृष्टीकोन असल्याचे लेखक स्पष्ट करतात. कार्बन करासारखी मौद्रिक संसाधने प्रदूषण नष्ट करू शकत नाही. प्रदुषणयुक्त विकासात मानवी कल्याणाला प्रतिकूलता असल्याचे लेखक दर्शवितात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत मागासवर्गीयांच्या विकास व्यूहनीतीचा परामर्ष आठव्या लेखामध्ये घेतला आहे. विकास आणि विषमता आर्थिक जगाचे वास्तव आहे. विकासाचे विश्लेषण होतांना विषमतेचे सखोलपणे विश्लेषण होत नसल्याचे लेखक दर्शवितात. भारतातील मागासवर्गीयांच्या मागासपणाच्या संदर्भात लेखक असे म्हणतात की, व्यवसाय कौशल्याचा अभाव व व्यवसाय नाकारले जाणे यामधून खुल्या बाजारात स्पर्धाक्षमतांचा अभाव निर्माण झाला. जन्मावरून योग्यता ठरू लागल्यामुळे श्रमविभाजनाऐवजी श्रमिकांचे विभाजन होऊ लागले यामधून वर्गीय विषमता वाढली. सत्ता, शिक्षण आणि रोजगारमधील आरक्षणामुळे विकासाची उर्ध्वगामी प्रक्रिया सुरू झाली. मात्र प्रत्याघाती परिणामुळे वर्गांतर्गत विषमता वाढली. संधीपासून खरे मागसवर्गीय वंचीत राहू नये याकडे लेखक लक्ष वेधतात.

नववा लेख पर्यावरणाशी संबंधित आहे. अतिरंजित विश्वासामुळे संसाधनाचा अविवेकी, अतिरेकी आणि निष्काळजीपणे उपयोग होत आहे. पर्यावरणाबद्दलची आस्था दुर्लक्षली जात आहे. विकास म्हणजे पर्यावरणाचा सातत्यक्षम वापर होय. पर्यावरण संधारण आणि आर्थिक वृद्धीतील सुसंगतीकरिता उपभोगाची युक्त पातळी, मनुष्याचा

सर्वांगीण विकास आणि समतोल विकास ही उद्दिष्टे असणे आवश्यक आहे. यामुळेच विकासाला खरा दर्जा व मूळ आशय प्राप्त होईल असे मत लेखक प्रकट करतात.

निर्हस्तक्षेप नीतीचे विश्लेषण अभिमतपंथीय अर्थशास्त्रज्ञाच्या विचाराच्या अनुषंगाने दहाव्या लेखात केले आहे. अभिमतपंथीय अर्थशास्त्रज्ञांनी निर्हस्तक्षेप नीतीचे समर्थन केले आहे. असे जरी असले तरी ॲडम स्मिथने काही बाबतीत शासन हस्तक्षेप महत्त्वाचा मानला. किंमत वृद्धीचा विपरित परिणाम होऊ नये याकरिता शासन हस्तक्षेप महत्त्वाचाच मानला आहे. महत्तम सामाजिक कल्याण व सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी शासनाचा हस्तक्षेप योग्य आहे हे मिलचे मत लेखक ठसवून सांगतात.

रोजगार सिद्धांताचे विश्लेषण अकराव्या लेखात केले आहे. चांगल्या समाजाची निर्मिती म्हणजे बेरोजगारीचे निवारण होय. केन्सच्या मते प्रभावी मागणी रोजगार निर्मितीला कारणीभूत ठरते. समाजामध्ये पूर्ण रोजगार निर्माण होण्यासाठी आवश्यक ऐवढी प्रभावी मागणी नसल्यामुळे शासन हस्तक्षेप महत्त्वाचा ठरत असल्याचे केन्सने म्हटले आहे. रोजगार निर्मितीमध्ये निर्माण झालेले दोष मौद्रिक स्वरूपाचे असतात. शासकीय हस्तक्षेपाबरोबर खाजगी उपक्रमशीलतेला महत्त्व रोजगार निर्मितीसाठी केन्सने दिल्याचे लेखक द्वयाच्या विश्लेषणातून स्पष्ट होते.

अभिमतपंथीय अर्थशास्त्राच्या विचाराच्या आधारे आर्थिक वृद्धीचे विवेचन बाराव्या लेखात केले आहे. अभिमतपंथीय अर्थशास्त्रज्ञाच्या मते उत्पादन वृद्धी ही अनंतकाळ चालणारी प्रक्रिया नसून विशिष्ट मर्यादेतनंतर संपुष्टात येणारी आहे. अंतिमत: विकासाची प्रक्रिया वृद्धी शुन्य होऊन स्थिरावस्थेत परिवर्तीत होत असल्याचे अभिमतपंथीय अर्थशास्त्रज्ञाचे मत आहे. स्थिरावस्थेचे विवेचन स्मिथ आणि रिकार्डोने पुरवठा बाजूने केले तर माल्थस आणि मिलने मागणी बाजूने केले. विकास आणि मानवी जीवनाच्या श्रेष्टतर बाबीकडे लक्ष देण्यासाठी आवश्यक व उपयुक्त टप्पा या दृष्टीकोनातून विकासाकडे व विकासाच्या स्थिरावस्थेकडे बघावे हे अभिमतपंथीयाचे तत्त्व लेखक महत्त्वाचे मानतात.

रानडेचे आर्थिक विचार आणि संसोधन पद्धतीचा परामर्ष तेराव्या लेखात घेतला आहे. ब्रिटीश काळात चुकीचे जमीन धोरण, अल्प भांडवल, उद्योगाचे मागासलेपण, शेतीक्षेत्राचा प्रचंड विस्तार व प्रभाव ही भारतातील दारिद्र्याची कारणे असल्याचे रानडेंनी स्पष्ट केले आहे. रानडेंनी निगमन पद्धती ऐवजी ऐतिहासिक पद्धतीचा उपयोग सामाजिक शास्त्राचे विवेचन करण्याकरिता महत्त्वाचा मानला. ऐतिहासिक पद्धतीचा उपयोग करून शास्त्रीय पद्धतीने आर्थिक प्रश्नावर रानडेंनी आपली मते मांडल्याचे स्पष्ट केले आहे. आर्थिक विचारांना पोषक अशी तात्विक पायाभरणी न्यायमूर्ती रानडे यांनी केल्यामुळे यर्थार्थपणे भारतीय अर्थशास्त्राचे जनक असल्याचे लेखक संबोधतात.

समन्वयवादी अर्थशास्त्रज्ञ म्हणून धनंजयराव गाडगीळांच्या आर्थिक विचाराचा आढावा घेत गाडगीळांची विचारसरणी स्पष्ट केली आहे. विघटीत समाजाचे एकसंघीकरण, राजसत्तेचे विकेंद्रीकरण, लोकाभिमुख आर्थिक विकास व लोक सहभाग ही गाडगीळांची त्रिसुत्री स्पष्ट केली आहे. गाडगीळ सुत्रामुळे केंद्राकडून राज्यांना मिळणाऱ्या निधीच्या लहरीपणात सुधारणा झाली. गाडगीळ सुत्रामुळे वस्तुनिष्ट निकष चवथ्या पंचवार्षिक योजनेपासून

उपयोगात आणल्या जाऊ लागले त्याचबरोबर प्रादेशिक असमतोलावरही त्यांनी भर दिला. 'स्थर्यासह विकास' ही व्युहनीती वापरून चवथ्या पंचवार्षिक योजनेची मांडणी केल्याचे लेखकांनी स्पष्ट केले आहे.

शेवटच्या पंधराव्या लेखामध्ये प्रा.व्ही.के.आर.व्ही.राव यांच्या आर्थिक विचाराच्या साध्य या पैलूचे सखोलपणे विश्लेषण केले आहे. साध्ये आणि साधने अनेक असतांना तांत्रिक कार्यदक्षतेपेक्षा आर्थिक कार्यदक्षता महत्त्वाची मानली. मात्र मनुष्याचे जगणे आणि मनुष्याचा विकास हा केंद्रबिंदू असला पाहिजे, या दृष्टीकोनातून आर्थिक धोरणाची मांडणी व पुर्नमूल्यांकन होणे आवश्यक असल्याचे लेखक मानतात. राजकीय अर्थशास्त्रात समाजाची उद्दिष्टे साध्य करण्यापेक्षा समाजा जवळची साधने वाढवण्यावर भर आहे. आर्थिक विचाराच्या प्रवाहात व प्रयत्नात साधने वाढवण्यावर भर आहे. आर्थिक प्रयत्नाने वृद्धी झाली मात्र समाजाची उद्दिष्टे साध्य झाली नाही. याबाबत स्पष्टीकरण प्रा. रावांच्या साध्य पैलूद्वारे लेखकांनी केले आहे.

लेखकव्दयाने नीतीशास्त्र, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, शिक्षण; पर्यावरण आणि आर्थिक विकास, अभिमतपंथीय अर्थशास्त्र व केन्स आणि भारतीय आर्थिक विचारवंत या विविध पैलूद्वारे या पुस्तकाची मांडणी केलेली आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट म्हणजे अनेक नवीन आर्थिक पारिभाषिक संज्ञा व शब्द आहेत. उदा. बाजार सामीप्य, ऱ्हसित महाशक्ती सिंड्रोम, बलात्प्रवेशवाद, भ्रांतिमुक्त स्वहीत, आत्मसात्कारी क्षमता इत्यादी. हे पारिभाषिक शब्द अर्थपूर्ण आणि विचार स्पष्ट करणारे आहे म्हणून हे पुस्तक अधिक शास्त्रीय स्वरूपाचे झाले आहे. अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थी यांना संदर्भ ग्रंथ म्हणून अत्यंत उपयुक्त आहे. गुरूपौर्णिमच्या पर्वावर हे पुस्तक प्रकाशित होत आहे याबद्दल गुरूवर्य डॉ. दि.व्यं.जहागिरदार आणि डॉ. मुक्ता जहागिरदार यांना हार्दिक शुभेच्छा देतो व यापुढेही आपले लेखन त्यांनी याच प्रकारे सुरू ठेवावे अशी सदिच्छा व्यक्त करतो.

◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# विदर्भातील आर्थिक आणि सामाजिक विचार

**लेखक : प्रा.सौ. संगिता टक्कामोरे**

(प्रकाशक - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर-१० किंमत: १००/-, पृष्ठ संख्या १३२)

**वर्षा गंगणे**
एम.बी.पटेल कॉलेज, देवरी,
जि.गोंदिया.

विदर्भातील आर्थिक आणि सामाजिक विचार हे प्रा. संगिता टक्कामोरे लिखित पुस्तक आर्थिक व सामाजिक घडामाडींचे विशेषण करणारे आहे. विदर्भाविषयी स्वतंत्रपणे विचार करून त्याबाबत थोर विचारवंत, समाजसुधारक व अभ्यासक यांचे विचार या पुस्तकातून मांडण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. तो स्तुत्य असाच आहे. या पुस्तकातील चौदा प्रकरणे म्हणजे नवनवीन विचारांची सुवासिक फुलेच आहेत, ज्याची माळ या पुस्तकरूपाने वाचकांचे हातात पडली आहे.

सदर पुस्तकातून आचार्य विनोबा भावेंसारख्या थोर विभूती, स्वातंत्र्यासाठी झगडणारे शांतीदूत व बापूंच्या काळातील पहिले सत्याग्रही व त्यांचे खेड्यांचा विकास व ग्रामजीवनाबाबत विचार वाचावयास मिळतात. 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ग्रामीण जीवनविषयक दृष्टीकोन' या लेखातून ग्रामगीतेतील मजकूराचा परिचय होतो. ग्रामस्वच्छतेचे महत्त्व मांडणारा लेख म्हणजे त्या काळच्या समाजाचा आरसाच होय ज्यात उदयाच्या स्वच्छ भारताचे स्वरूप स्पष्टपणे बघायला मिळणे डॉ. पंजाबराव देशमुखांचे शैक्षणिक व कृषीविषयक कार्य, बाबा आमटेंची अतुलनीय समाजसेवा, त्यासाठी अहोरात्र केलेले प्रयत्न व जीवाची पराकाष्ठा म्हणजे आनंदवनाची साकार कल्पना. या सर्वांचा परिचय या पुस्तकातून सर्व वाचक व अभ्यासकांपर्यंत करून देण्यात आला आहे.

विदर्भ राज्याच्या घडामोडींचे व विकासाचे स्वप्न उराशी बाळगून असलेले समाजवादी तत्वाचे समर्थक डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांच्या 'शेती विकास आणि विदर्भ राज्याची संकल्पना' या लेखामधून शेतीतील विविध प्रयोग, संशोधन, समस्या व शाश्वत विकासाचा मार्ग याविषयी माहिती मिळते. डॉ. विजय कवीमंडन यांच्या 'विदर्भातील शेतीची दुरावस्था' या लेखातून त्यांचा कृषीविषयक सखोल अभ्यास व कृषी पुत्रांविषयीचा कळवळा 'कृषी सबलीकरण' या शब्दातून व्यक्त होतो. 'भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती' हा डॉ. अंजली कुळकर्णींचा लेख भारताच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यास समर्थ आहे. 'विदर्भातील शेतकऱ्यांच्या वाढल्या आत्महत्या' या ज्वलंत विषयावरील लेखातून कमलाकर हनवंते यांनी अधिकोषांची भूमिका अभ्यासपूर्णरित्या मांडली आहे.

याशिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे असलेले कुलगुरू डॉ.विनायक देशपांडे लिखित 'विदर्भाच्या आर्थिक विकासाच्या समस्या' यातील विचार वास्तववादी आहेत. याशिवाय डॉ.मृणालिनी फडणवीस, विजय जावंधिया, मधुकर

किंमतकर यांचे विदर्भ विकास विषयक विचार उचलून धरण्यासारखे आहेत.

महाराष्ट्राचे वर्तमान मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांचे महात्मा गांधीचे स्वावलंबीत्वाबाबत विचार व तुकडोजी महाराजांची ग्रामस्वराज्याची संकल्पना केंद्रबिंदू मानून विकासाचे प्राधान्यक्रम ठरविणे हे विदर्भ विकासाच्या सर्वांगिण प्रगतीच्या दिशेने उचललेले एक ठोस पाऊल म्हणता येईल.

थोडक्यात महाराष्ट्रातील व प्रकर्षाने विदर्भातील महान, ध्येयवादी व समाजधुरीणांचे विदर्भ विकासाबाबतचे विचार सदर पुस्तकातून वाचावयास मिळणे म्हणणे दुग्धशर्करा योग्यच म्हणावा लागेल. विविध अभ्यासकांचे विकासाविषयक दृष्टीकोन या पुस्तकाच्या रूपात आपल्या समोर आले आहेत. या कार्यात लेखिकेचा फार मोठा वाटा आहे.

सदर पुस्तक १३२ पृष्ठांचे असून त्याची किंमत केवळ १००/- इतकी माफक आहे. पुस्तकाच्या शेवटी डॉ.खादेवाले सरांचे शुभाशिर्वाद आहेत. त्याचेच फळ म्हणजे या पुस्तकाला मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३८ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनात मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक प्राप्त झाले आहे.

या पुस्तकांतील विविध अभ्यासकांचे लेख त्यांचे प्रांजळ मत, लेखिकेने त्यांच्याशी साधलेले संवाद, माहितीचे संकलन व त्याची एकसुत्रात बांधणी या सर्व बाबी कौतुकास्पद अशाच आहेत. विविध क्षेत्रातील विचारवंतांचे अर्थव्यवस्था व विकासविषयक विचार यातून एकत्रितपणे नजरेखालून घालवता येतात हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य. सदर पुस्तकातून विदर्भातील आणखी काही ज्वलंत प्रश्नांवर विचारमंथन करता आले असते. काही लेखांमधून एकच मुद्दा वारंवार आला आहे त्याऐवजी भृणहत्या, स्त्रीअसुरक्षितता, अपहरण, नक्षलवाद, बालश्रमिक, भूमीहिन शेतमजूरांचे प्रश्न, स्वतंत्र विदर्भाची गरज यासारख्या विषयांना हात घालता आला असता. त्यामुळे पुस्तकाचे सर्वसमावेशक स्वरूप समोर आले असते. पण हा एक मुद्दा वगळता सर्व लेख आशयपूर्ण असेच आहेत.

लेखिकेचा व्यासंग, सतत अध्ययनस्त राहण्याची आवड यामुळे अशा सारख्या अभ्यासपूर्ण पुस्तकांची त्यांच्याकडून भविष्यातही निर्मिती होवो अशी इच्छा व्यक्त करून डॉ.संगिता टक्कामोरे यांचे अभिनंदन करते.

◆◆◆

**इंदिरा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय, राळेगांव, (जि. यवतमाळ)**
**येथे संपन्न झालेल्या .....**

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे वार्षिक अधिवेशन (२०१३-१४)

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे वार्षिक अधिवेशन दि. १५ व १६ फेब्रुवारी २०१४ (शनिवार व रविवार) रोजी अमरावती महसूल विभागातील इंदिरा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय, राळेगांव, जि. यवतमाळ येथे संपन्न झाले. उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष डॉ.दि.व्यं.जहागिरदार होते. प्रमुख उपस्थितीमध्ये ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय धनवटे, नलिनीताई पराते, विठ्ठलराव आडे, डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, प्राचार्य डॉ.वाय.पी.देशपांडे, डॉ.एस.बी.कटमुसरे व डॉ.आर.बी.भांडवलकर हजर होते. द्वीप प्रज्वलानंतर स्वागत गीत होऊन उद्घाटन सोहळ्याला उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याचे आणि अधिवेशन आयोजनाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाय.पी.देशपांडे यांनी केले. परिषदेची भूमिका डॉ. आर.बी.भांडवलकर यांनी प्रास्ताविकातून व्यक्त केली. उद्घाटनपर भाषणामध्ये डॉ.दि.व्यं.जहागिरदार यांनी अर्थशास्त्र विषयाचे महत्त्व, अर्थशास्त्रात भारतीयांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगून मानवी कल्याण आणि नितीशास्त्र यांची अर्थशास्त्राशी असणारी सांगड अभ्यासपूर्ण पद्धतीने पटवून दिली. यावेळी अधिवेशनानिमित्य प्रकाशित स्मरणिकेचे आणि अर्थमीमांसा संशोधन पत्रिकेचे विमोचन करण्यात आले. डॉ.एस.बी.कटमुसरे लिखित 'राष्ट्रसंत तुकडोजींची सामाजिक आणि आर्थिक दृष्टी' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार यांनी परिषदेच्या कार्याचा संक्षिप्त इतिहास आपल्या भाषणातून व्यक्त केला. ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय धनवटे यांनी 'महाराष्ट्रातील जलसंपत्ती व सिंचन सुविधांच्या प्रगतीचा प्रादेशिक असमतोल विशेष संदर्भ : विदर्भ' या विषयावर अभ्यासपूर्ण भाषण केले. उद्घाटन सोहळयाचे अध्यक्ष मा.प्रा.वसंतराव पुरके यांनी अर्थशास्त्र ह्या विषयाचे संदर्भात संत तुकाराम महाराजाचे विचार व्यक्त केले. ग्रामगीता ही अर्थशास्त्र अभ्यासकांना मार्गदर्शक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यानंतर उद्घाटन सोहळ्याचे आभार प्रदर्शन प्रा.डी.एस.गुर्जर यांनी केले. अशा पद्धतीने अधिवेशनाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

भोजनावकाशानंतर अधिवेशनाच्या पहिल्या सत्रामध्ये 'खेळ सिद्धांत' या विषयावरील सत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.मृणालिनी फडणवीस, सूत्र संचालक प्रा. लाजवंती टेंभूर्णे आणि वृत्तसंकलक म्हणून प्रा. गढीकर यांनी कार्य केले. डॉ.एच.ए.हुद्दा,

डॉ.गजानन पाटील, प्रा. सिद्धार्थ मेश्राम, प्रा.धीरज कदम, डॉ. समित माहोरे, प्रा.डी.के. राठोड, प्रा.डी.एस.गुर्जर यांचे शोधनिबंध सादर झाले. सदर विषयाया चर्चेत डॉ.मृणालिनी फडणवीस, डॉ.दि.व्यं.जहागिरदार, डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ.प्रशांत हरमकर यांनी सहभाग घेतला. चहापानानंतरच्या दुसऱ्या विषयावर डॉ.विष्णू कुटे, प्रा. संजय दांदडे, प्रा.आरती खडतकर, डॉ.एस.बी.कटमुसरे, डॉ.जगदिश हटवार, प्राचार्य डॉ.आर.जी.टाले, डॉ.करमसिंग राजपूत, डॉ.वासंती निचकवडे, डॉ.लाजवंती टेंभूर्णे, प्रा.रविंद्र इचे, प्रा.ममता साहू, डॉ.चुन्नीलाल साखरवाडे, डॉ.वैशाली देशमुख, प्रा.लिलाधर खरपुरिये, डॉ.प्रतिभा काळमेघ, डॉ.उदय काळे, प्रा. ईश्वर वाघ, डॉ.शंकर सावंत, प्रा.एस.बी.बोढे, प्रा.विठ्ठल घिनमिने, प्रा.सुनिल घुगल, प्रा.आर.एम.वाठ, डॉ. माधुरी लेले, डॉ.रवि सोरते, डॉ.सविता जाधव, प्रा.अरूण चव्हाण, प्रा.जयंत मस्के, प्रा.डी.एच.आडे, प्रा.भगवान देवसरकर, प्रा.अजय तगडपल्लीवार, डॉ.प्रशांत काटोले, डॉ.उषा पाटील व डॉ.सुनिल शिंदे यांचे शोधनिबंध सादर झाले. याविषयाच्या चर्चेमध्ये डॉ.अंजली कुळकर्णी, डॉ.पुष्पा इंदूरकर, डॉ.दि.व्यं.जहागिरदार, डॉ.वनिता चोरे यांनी सहभाग घेतला. दुसऱ्या चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ.एस.एस.नाईक सूत्रसंचालक प्रा.महेंद्र गावंडे होते.

वार्षिक अधिवेशनाच्या निमित्याने घेण्यात येणाऱ्या नाणेकर व पिंपरकर स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख वक्ते ॲड.सत्यनारायण अबोटी, पारनेर यांनी 'पूर्णवादी अर्थशास्त्र' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. व्याख्यानमालेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय धनवटे, प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ.एस.बी.कटमुसरे, डॉ.आर.बी. भांडवलकर होते. प्रास्ताविक डॉ.आर.बी.भांडवलकर यांनी केले तर सदर व्याख्यानमाला आयोजनामागील भूमिका डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार यांनी विशद केली. आभार प्रदर्शन डॉ.एस.बी.कटमुसरे यांनी केले.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रामध्ये अर्थशास्त्रातील जुन्या ग्रंथावर विचारमंथन ह्या उपक्रमाचे दुसरे पुष्प डॉ.अंजली कुळकर्णी यांनी 'An Uncertain Glory India and Its Contradicion' ह्या विषयावर आपले अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संजय धनवटे उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ.एस.बी.कटमुसरे, डॉ.आर.बी.भांडवलकर, प्राचार्य डॉ. वाय.पी.देशपांडे व प्रा.डी.एस.गुर्जर उपस्थित होते. त्यानंतर 'विदर्भातील पशूधन (जिल्हानिहाय) ह्या विषयावरील तिसरे चर्चासत्र संपन्न झाले. ह्या चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ.विनायक देशपांडे होते. सुत्रसंचालक म्हणून डॉ.प्रतिभा काळमेघ आणि वृत्तसंकलनाचे कार्य प्रा.डी.एच.आडे यांनी पार पाडले. या विषयावर प्रा.माधुरी राखुंडे, डॉ.आर.बी. भांडवलकर, डॉ.आर.आर.गव्हाळे, डॉ.सुरेश जगताप, डॉ.संजय धनवटे आणि प्रा.महेंद्र गावंडे यांनी शोधनिबंध सादर केले. याविषयावरील तर चर्चेत प्रा.एन.ए.पिस्तुलकर, डॉ.दि.व्यं.जहागिरदार, डॉ.वाय.पी.देशपांडे, प्रा.कमलाकर हनवंते यांनी सहभाग घेतला.

वार्षिक अधिवेशनाचे निमित्याने ३८ वी वार्षिक आमसभा प्राचार्य डॉ.संजय धनवटे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. आमसभेच्या सुरूवातीला दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण

करण्यात आली. त्यानंतर अध्यक्षाचे परवानगीने सभेचे कामकाज सुरू झाले. मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे, मागील आर्थिक वर्षाचा परिषदेचा आणि अर्थमीमांसाचा हिशोब सादर करणे, पुढील अधिवेशनाकरिता चर्चासत्राचे विषय निश्चित करणे, अकोला व वाशिम जिल्हा प्रतिनिधी आणि नागपूर परिक्षेत्रातून उपाध्यक्षाची निवड करणे, असे महत्त्वाचे विषय होते. ते सर्व विषय मंजूर झालेत. पुढील अधिवेशनाकरिता १) आदान-प्रदान विश्लेषण २) अन्नसुरक्षितता आणि भारत ३) विदर्भातील फळउत्पादन (जिल्हानिहाय) हे विषय निश्चित करण्यात आलेत. अकोला जिल्हा प्रतिनिधी म्हणून डॉ.प्रभाकर आठवले आणि उपाध्यक्ष म्हणून डॉ.सुनिल शिंदे यांची अविरोध निवड करण्यात आली. तसेच डॉ. वनिता चोरे ह्या ३९ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षा म्हणून बहुमताने निवडून आल्या. यावेळी पीएच.डी. प्राप्त आणि विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ.प्रभाकर आठवले, डॉ.वनिता चोरे, डॉ.प्रकाश जवंजाळ, डॉ.प्रशांत घोटेकर, डॉ.एम.एन.पाटील, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह खजिनदार म्हणून निवड झाल्याबद्दल डॉ.आर.बी.भांडवलकर तसेच डॉ.जयराम गायकवाड यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक, डॉ.वनिता चोरे यांना पद्मजा गंधे पारितोषिक आणि डॉ.प्रशांत हरमकर यांना प्रा.ग.प्र.पिंपरकर मराठी अर्थशास्त्र परिषदेचे पारितोषिकाबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. डॉ.स्नेहा देशपांडे यांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अर्थशास्त्र विभागप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला तसेच परिषदेला आर्थिक मदत म्हणून देणगी देणाऱ्या डॉ.अंजली कुळकर्णी, प्रा.राजश्री काशीकर, डॉ.करमसिंग राजपूत, डॉ.उषा पाटील, डॉ.वनिता चोरे, डॉ.प्रतिभा काळमेघ व डॉ.आर.बी.भांडवलकर यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

अधिवेशनाचा समारोप संस्थेचे सदस्य विठ्ठलराव आडे यांचे अध्यक्षतेखाली प्राचार्य डॉ.वाय.पी.देशपांडे, अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय धनवटे, कार्याध्यक्ष डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ.एस.बी.कटमुसरे, डॉ.आर.बी. भांडवलकर यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी परिषदेच्या वतीने डॉ.वाय.पी.देशपांडे, प्रा.डी.एस.गुर्जर आणि श्री.पेंदे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नागपूर व अमरावती महसूल क्षेत्रातील प्रतिनिधींनी दोन दिवसीय आयोजित अधिवेशना बाबत आपले प्रातिनिधीक मनोगत व्यक्त केले. विदर्भातील अर्थशास्त्र अभ्यासक, पत्रकार, विद्यार्थी आणि व्यवस्थापन मंडळ ज्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य लाभले अशा सर्वांचे परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले. तसेच महाविद्यालयाच्या वतीने प्रा.डी.एस.गुर्जर यांनी आभार व्यक्त केले. त्यानंतर परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य संजय धनवटे यांनी अधिवेशनाचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

**डॉ.आर.बी.भांडवलकर**
सचिव

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद

## वार्षिक अधिवेशनांचे अध्यक्ष

| अ.क्र. | अधिवेशनाचे स्थळ | वर्ष | अधिवेशनाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७०-७१ | डॉ. बी.आर. ढेकणे |
| २ | एन.एम.डी. महाविद्यालय, गोंदिया | १९७१-७२ | प्रा.सु.द. बाळ |
| ३ | भारतीय महाविद्यालय, अमरावती | १९७२-७३ | डॉ. के.आर. नाणेकर |
| ४ | श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला | १९७३-७४ | प्रा.ग.प्र. पिंपरकर |
| ५ | यशवंत महाविद्यालय, वर्धा | १९७४-७५ | प्राचार्य रा.ना. खर्चे |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७५-७६ | डॉ. श्री.आ. देशपांडे |
| ७ | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा | १९७६-७७ | प्रा.आर.एम. जोशी |
| ८ | सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर | १९७७-७८ | डॉ.ए.पी. हरदास |
| ९ | एस.पी.एम महाविद्यालय, चिखली,जि. बुलढाणा. | १९७८-७९ | प्रा. ए.एन. लोथे |
| १० | बाबाजी दाते कला वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ | १९७९-८० | प्रा.एस.आर. ओझरकर |
| ११ | धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर | १९८१-८२ | डॉ.एस.एल.लोकरे |
| १२ | आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि.अमरावती. | १९८२-८३ | प्रा.एस.ए.पाटील |
| १३ | सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर. | १९८८-८९ | डॉ. व्ही.एस.शेणवाई |
| १४ | महात्मा फुले महाविद्यालय, वरूड, जि.अमरावती. | १९८९-९० | डॉ.एस.व्ही.खांदेवाले |
| १५ | यशवंत महाविद्यालय, सेलू, जि.वर्धा. | १९९०-९१ | डॉ.एस.व्ही.जांवधिया |
| १६ | फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि.यवतमाळ | १९९१-९२ | प्रा.के.आर.खेरडे |
| १७ | कर्मवीर महाविद्यालय, मूल | १९९२-९३ | डॉ.डी.एस.वखरे |
| १८ | शासकीय ज्ञान विज्ञान संस्था (विदर्भ महाविद्यालय) अमरावती. | १९९३-९४ | डॉ.सौ.सुनंदा सोनारीकर |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्‌ालय, चिमूर. | १९९४-९५ | प्रा.व्ही.एस.कुळकर्णी |
| २० | जगदंबा महाविद्यालय, अचलपूर, जि.अमरावती. | १९९५-९६ | डॉ.सौ.अंजली कुळकर्णी |
| २१ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९६-९७ | प्रा.डी.आर.अग्रवाल |
| २२ | जी.एस.कॉलेज, खामगांव, जि.बुलढाणा. | १९९७-९८ | डॉ.आर.वाय.माहोरे |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९८-९९ | डॉ.दि.व्यं.जहागिरदार |
| २४ | राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगांव (खंडेश्वर), जि.अमरावती. | १९९९-२००० | डॉ.व्ही.एम.वैद्य |
| २५ | सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर. | २०००-०१ | प्रा.एस.एन.अंभोरे |
| २६ | कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अमरावती. | २००१-०२ | प्रा.के.ई.पाटील |
| २७ | लोक महाविद्यालय, वर्धा. | २००२-०३ | प्राचार्य एन.एफ.सुदा |
| २८ | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा. | २००३-०४ | प्राचार्य डॉ.आर.जी.भोयर |
| २९ | एस.एन.मोर महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा. | २००४-०५ | प्रा.एस.एस.देशमुख |
| ३० | श्री.म.द.भारती महाविद्यालय, आर्णी, जि.यवतमाळ. | २००५-०६ | डॉ.सौ.पुष्पा इंदूरकर |
| ३१ | बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा, जि.नागपूर. | २००६-०७ | डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार |
| ३२ | श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती. | २००७-०८ | प्राचार्य डॉ.पुष्पा तायडे |
| ३३ | जनता महाविद्यालय, चंद्रपूर. | २००८-०९ | प्रा.कमलाकर हनवंते |
| ३४ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव, जि.यवतमाळ | २००९-१० | डॉ.एस.पी.कुळकर्णी |
| ३५ | न्यु आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, वर्धा. | २०१०-११ | प्रा.एन.ए.पिस्तुलकर |
| ३६ | आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (अढाव), जि. वाशिम. | २०११-१२ | प्राचार्य डॉ.आर.जी.टाले |
| ३७ | वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर. | २०१२-१३ | डॉ.आर.आर.गव्हाळे |
| ३८ | इंदिरा गांधी कला विज्ञान महाविद्यालय, राळेगाव, जि.यवतमाळ | २०१३-१४ | प्राचार्य डॉ.संजय धनवटे |
| ३९. | शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी/मोर, जि.गोंदिया. | २०१४-१५ | प्राचार्य डॉ. वनिता चोरे |

**डॉ.आर.बी.भांडवलकर**
सचिव
विदर्भ अर्थशास्त्र परिषद